
# मातृदेवता

## प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके

लेखक : अरुण फडके



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मातृदेवता

## प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके

लेखक

अरुण फडके

# मातृदेवता: प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके

## लेखक... अरुण फडके

पत्ता- अरुण फडके, १९, अमिता सोसायटी, चवथा मजला, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९.
M: 7400173637M: ७४००१७३६३७,
arunphadke7@gmail.com
मुखपृष्ठ: श्री शैलेश तेंडोलकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : ४ नोव्हेंबर २०२१ (लक्ष्मीपूजन शके १९४३)**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अरुण फडके



अरुण फडके हे एक अभ्यासू लेखक म्हणून सुपरिचित आहेत. फ्रीमेसनरी या प्राचीन जागतिक संघटनेचे सदस्य व संघटनेच्या भारतातील इतिहासाचे अभ्यासक, एक इंटरनॅशनल कॉफी टेबल बुक प्रकाशित आहे. ते विस्मृतीत गेलेल्या मराठी म्हणी - वाक्प्रचार याचे अभ्यासक असून ६० लेखांची लेखमाला तरुण भारत मधे प्रकाशित झाली आहे.


त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय आहे सिंबॉल-सिंबॉलिझम-ॲलिगरी, अर्थात रूपकशास्त्र – प्रतीकशास्त्र -- चिन्ह – चिन्हसंकेत - चिन्हार्थ. याही विषयावर दैनिक मुंबई तरुण भारतमधे ६० लेखांची लेखमाला प्रकाशित झाली. चिह्न निमित्त – निमित्त चिह्न हे पुस्तक लवकरच येत आहे. विलेपारल्यातील बलुतेदार ही मासिक २४ लेखांची लेखमाला अभूतपूर्व या मासिकात प्रकाशित. सध्या लोकमान्य सेवा संघाच्या शताब्दी इतिहास खंडाचे लेखन सुरू. बालनाट्य चळवळ, प्रायोगिक-व्यवसायिक नाट्य चळवळींचा इतिहास व विलेपार्ल्यातील रंगकर्मी यांचा परीचय करून देणाऱ्या पुस्तकाचे संकलन-लेखन सुरु आहे.


अनेक नामवंत संस्थांच्या कार्यात त्यांचा सहभाग असतो. लोकमान्य सेवा संघ, पारले. गॉसिप ग्रुप ही प्रायोगिक रंगभूमीवरील संस्था, नाट्यसंपदा प्रतिष्ठान, कै मो ग रांगणेकर जन्मशताब्दी महोत्सव, जागतिक चित्पावन महासंमेलन, म ल डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना आदींचे ते आघाडीचे कार्यकर्ते विश्वस्त आहेत. तसेच ते मोठ्या उत्सवी कार्यक्रमांचे अनुभवी संघटक (Event designer) व Heritage Structure Rehabilitation & Restoration या विषयातील अनेक यंत्र-तंत्रांचे विशेषज्ञ आहेत.


विलेपारल्यातील बलुतेदार - भाग एक आणि भाग दोन आणि देवी दुर्गा प्राचीन संकल्पना आणि संकेत ही तीन E book ईसाहित्य प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली आहेत. “आता मी पारल्यात रहात नाही” आणि मातृदेवता- प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके, ही दोन ई पुस्तक या वर्षी ईसाहित्य प्रकाशनातर्फे प्रकाशित होत आहेत.

**श्री. अरुण फडके यांची ई साहित्यवरील पुस्तके**

**कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल.**



# लेखकाचे मनोगत

**अरुण फडके**

अलीकडच्या काळांत प्रतिथयश लेखिका आणि मान्यवर संपादक श्रीमती मंगलाताई गोडबोले यांचा विस्तारीत परिचय, माझ्या एक लेखमालेच्या निमित्ताने लिहिला होता. मंगलाताईंच्या परिचयासाठी, त्यांनी संशोधन आणि अभ्यासाने लिहिलेल्या; वयात येताना, दत्तक घेण्यापूर्वी, काय तुझ्या मनात, आई तुझ्याच ठायी, सती ते सरोगसी आणि वार्धक्यविचार या सहा पुस्तकांचे वाचन झाले. स्वातंत्र्यानंतरच्या काळातील, भारतीय स्त्रीजीवनातील अनेक आधुनिक समस्यांचा आणि त्यावरील उपायांचा दीर्घ अभ्यास, मंगलाताईंनी या सर्व पुस्तकातून मांडला आहे. विनोदी कथा लिखाणासाठी लोकप्रिय असलेल्या मंगलाताई, या सहा पुस्तकांत त्यांच्या गंभीर शैलीत व्यक्त झालेल्या आहेत. स्त्रीजीवनातील मोकळेपणाने व्यक्त होऊ शकत नसलेल्या, तिच्या चित्त-वृत्तींवर तणाव निर्माण करणाऱ्या, बहुधा तिला एकटीला सहन कराव्या लागणाऱ्या समस्यांना, मंगलाताई स्पष्ट करतांना, त्या प्रांजळ आहेत आणि त्यांनी अनुभवलेल्या वास्तवावर प्रसंगी त्या कठोर भाष्य करतात.

मंगलाताईंनी माझ्या या पुस्तकावर दिलेला अभिप्राय, या पुस्तकाच्या सुरुवातीला समाविष्ट केला आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर .. .. मातृत्वातले देवत्व आणि माणूसपण ह्यांचा सामाजिक संदर्भात अभ्यास करणारं मीही काही प्रमाणांत लिहिलं आहे. अरुण फडके त्याचं सांस्कृतिक संचित तपासत आहेत. मंगलाताईंच्या या सर्व

पुस्तकांतील स्त्रीजीवनातील मातृत्व संदर्भात त्यांनी नोंदलेले अनुभव, मला अस्वस्थ करणारे होते.

प्राचीन भारतीय श्रद्धा आणि भक्ति यातिल देव-देवता संकल्पना आणि त्यांची प्रतीके – रुपके – चिह्न – चिह्नसंकेत हा माझ्या अभ्यासाचा मूळ विषय आहे. त्या अभ्यासात मागे वळून पहातांना, मंगलाताईंच्या उल्लेखातील मातृत्वातले देवत्व आणि माणूसपण यांचे प्राचीन भारतीय संकल्पनातील सांस्कृतिक संचित, मला या पुस्तकांत मांडता आले. मंगलाताईंच्या लिखाणातून, मला एक प्रेरणा आणि व्यक्त होण्यासाठी दिशा मिळाली. यासाठी मी त्यांचा ऋणी आहे.

पुस्तकाच्या अखेरच्या पानावर संदर्भासाठी मी वापरलेल्या पुस्तकांची सूची दिली आहे. मात्र गेल्या काही वर्षांच्या अभ्यासात, प्राचीन भारतीय संहितांचे (हिन्दी आणि इंग्लिश भाषांतरे) आणि अनेक देशी – विदेशी लेखकांच्या पुस्तकांचे वाचन झाले आहे. तत्वज्ञान – विज्ञान – प्रज्ञता या पायावर रचलेल्या, काही हजार वर्षांपूर्वीच्या भारतीय संहितांमधील नाट्यमय घटना आणि व्यक्तिचित्रण, आजच्या वाचकाला अतार्किक – अतिरंजित – अवास्तव वाटण्याची शक्यता आहे. अशा तत्कालीन शैलीतील अन्योक्ति – श्लेष – उपमा – अतिशयोक्ति – दृष्टान्त – विरोधाभास अशा अलंकारांनी समृद्ध दीर्घ वर्णनातील, प्रतीके – रुपके – चिन्ह यांचा शोध - अभ्यास आणि विश्लेषण हे आनंदाचे क्षण होते.

माझ्या स्नेही, ज्ञानेश्वरीच्या अभ्यासक, माननीय डॉ मनीषा फडके यांनी या पुस्तकांची प्रस्तावना लिहिली आहे. या काळांत त्यांच्याशी झालेला संवाद माझा उत्साह द्विगुणित करून गेला. माझे स्नेही, अनुभवी वरिष्ठ ग्राफीक आर्टिस्ट श्री शैलेश

तेंडोलकर यांनी या पुस्तकाचे उचित आणि आकर्षक मुखपृष्ठ रेखांकित केले आहे. या दोघांना शतशत धन्यवाद..!

ईसाहित्य प्रतिष्ठान तर्फे, वर्ष २०२१ च्या दीपावलीतिल लक्ष्मीपूजनाच्या शुभ मुहूर्तावर प्रकाशित होणारे हे माझे चवथे E Book. श्री सुनीळ सामंत आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या तत्पर – वेगवान – अनुभवी कार्यप्रणालीचे मला फार कौतुक वाटते. आज पर्यन्त त्यांनी काही हजार विनाशुल्क E Book वाचकांसाठी सिद्ध आणि उपलब्ध केली आहेत. त्यासर्वांना शतशत धन्यवाद..!

अंतिमतः या सर्व ई पुस्तकांचे, मराठी भाषेवर प्रेम करणारे जगभरांतिल मराठी वाचक यांना शतशत धन्यवाद..!.. तुम्ही वाचता म्हणून प्रत्येक लेखकाला लिहिण्यासाठी ऊर्जा मिळते..!..

धन्यवाद...!

अरुण फडके,

४ नोव्हेंबर २०२१ (लक्ष्मीपूजन शके १९४३)

विलेपारले, पूर्व, मुंबई.

M: ७४००१७३६३७

## अर्पण पत्रिका

माझ्या वडिलांची मोठी बहीण, माझी आत्या श्रीमती सिताबाई रामचंद्र गांगल, यांनी आम्हा फडके – गांगल कुटुंबियांवर मातृभावनेने प्रेम केले. त्यांना अपत्यप्राप्ती झाली नाही. मात्र आपल्या आईच्या मृत्यूनंतर, सतरा वर्षांनी लहान असलेल्या आपल्या धाकट्या भावाची आणि आपल्या धाकट्या बहिणीच्या बाळंतपणातील मृत्यूनंतर तिच्या तान्ह्या मुलीची त्या आई झाल्या. आपल्या सर्व भावंडांना आणि नंतरच्या पिढीतील आम्हा भाचे – पुतणे यांच्या त्या आधार होत्या. एकत्र कुटुंबात असल्यामुळे, माझे वडील, माझी आते बहीण आणि मी, त्यांच्या अविस्मरणीय मातृवत मायेचा अनुभव घेतला आहे. प्राचीन भारतीय सांस्कृतीतिल मातृदेवतेचा अभ्यास मांडणारे हे पुस्तक, माझ्या कुटुंबातील या मातृदेवतेला मी अर्पण करतो आहे.

अरुण फडके,<br>
लक्ष्मीपूजन,<br>
४ नोव्हेंबर, २०२१,<br>
विलेपारले, मुंबई.

## वाचक अभिप्राय १

श्री अरुण फडके हे माझे जुने परिचित स्नेही आहेत. २००८ सालापासून ते विविध परंपरांचा, संस्कृतींचा, त्यातील प्रतीकं, रुपकं, चिह्नं, चिह्नसंकेत यांचा अभ्यासपूर्ण ऊहापोह करत आहेत. आपल्या सांस्कृतिक समृद्धीचा आणि विविधतेतील एकतेचा मागोवा घेण्याची त्यांची धडपड निश्चितच गौरवास्पद आहे.

अलीकडेच त्यांनी मातृदेवता: प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके ही वीस लेखांची लेखमाला पूर्ण केली आणि ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे ई पुस्तकाच्या रूपात लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर तिचे संकलन वाचकांच्या भेटीला येत आहे.

हा विषय व्यामिश्र वाचनाची, विवेचनाची अपेक्षा करणारा आहे. तेवढं मजजवळ नाही. म्हणून या लेखनप्रयत्नांचे मूल्यमापन मी करू शकणार नाही. पण याचं मानवी जिवनातलं सनातन स्थान आणि महत्व मला नक्कीच कळतं. मातृत्वातले देवत्व आणि माणूसपण ह्यांचा सामाजिक संदर्भात अभ्यास करणारं मीही काही प्रमाणांत लिहिलं आहे. अरुण फडके त्याचं सांस्कृतिक संचित तपासत आहेत. त्यासाठी अनेक धर्मांमधले, निसर्गातले, देशोदेशांच्या परंपरांमधले संदर्भ प्रयत्नपूर्वक मिळवताहेत, मांडताहेत. एक सांस्कृतिक दस्तावेजच जणू तयार करताहेत. मी त्यांच्या या प्रयत्नाला मनःपूर्वक शुभेच्छा देते आणि आणि वाचक याला चांगला प्रतिसाद देतील अशी खात्री बाळगते..!

**मंगला गोडबोले,**
**पुणे,**
**१३ ऑक्टोबर, २०२१.**

--००--

# वाचक अभिप्राय २

प्रिय अरूण,

अत्यंत अभ्यासू व माहितीपूर्ण लेख वाचले. घरची मातृदेवता जशी असेल व संस्कार करते तशी नविन पिढी तयार होते.

हे सगळे लेख नविन पिढी वाचेल का? हा मोठा प्रश्न आहे. ह्या सगळ्या लेखांचा सारांश मराठी व इंग्रजीत काही वाक्यात करून, तोपण प्रसिध्द करावा.

नविन पिढीला ऊत्सुकता वाटेल असे लिहिल्यास ते अधिक वाचले जाईल व त्यांच्यावर संस्कार पण होतील.

**डॉ श्रीश उपाध्ये,**
**माटुंगा,**
**१० ऑक्टोबर, २०२१.**

--००--

# वाचक अभिप्राय ३

मातृदेवता- प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके ही श्री अरुण फडके यांची लेखमाला श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्ये पासून विजयादशमी पर्यंत या कालावधीत वीस भागात वाचली. लेखकाचा व्यासंग, संबंधित काल वाचकासमोर साकारणारी प्रवाही भाषा यामुळे प्रत्येक भाग वाढत्या उत्सुकतेने वाचला. निसर्गचक्राशी अनुरूप अशी दैनंदिन जीवनशैली जगत असताना, सहजपणे रुढ झालेली मातृसत्ताक पध्दत यांचा फार अभ्यासपूर्ण ऊहापोह लेखकाने घेतला आहे. पुढे कुटुंब व्यवस्था व समाज रचना यांची बांधणी होऊ लागल्यावर आचारविचार, पूजाविधी यांचा धर्माशी संबंध जोडला गेला आणि धार्मिक रितीरिवाज अस्तित्वात आले असावेत याचा दाखला विद्वान अभ्यासकांच्या संशोधनातून लेखक देतात.

बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची देवी अदिती, हिचे विश्वजननी पार्वतीचे रुप, तिचे मातृदेवता म्हणून असलेले अग्रीम स्थान, लेखक आकर्षक रुपात मांडतात आणि ओघातच मूर्तीपूजेमुळे सामान्य जनांची देवदेवतांप्रत निर्माण होणारी निस्सीम श्रद्धा तर्कशुद्ध वाटू लागते.

पृथ्वीदेवी अर्थात भूदेवी ही साक्षात लक्ष्मी आहे, या मांडणीला पूरक असलेल्या लोकश्रद्धा आपल्याला चकित करतात. कला, साहित्य, संस्कृती या संचितातून देवीस्वरुपाचा वेध घेताना चित्रकला, शिल्पकला यातून अर्थवाही झालेल्या या प्रतिमा दाखल्यानिशी आपण अनुभवतो!

संस्कृती, चिन्हे, प्रतिमा याबाबतचा लेखकाचा सखोल अभ्यास येथेही अनुभवास येतो. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या देवी पार्वतीच्या तीन प्रमुख प्रतिमा, तामस-राजस-सत्व गुणांची रुपके असलेल्या मातृदेवतांबद्दलच्या जनसामान्यांतील आख्यायिका, ऋग्वेदातील सप्तशती संहितेतील मांडणी यांचे अभ्यासपूर्ण विवरण प्रत्ययास येते.

संबंधित लेखांसमवेत असलेले फोटो, चित्रे यामुळे केवळ आकर्षकतेत भर पडली आहे इतकेच नसून त्यातून काही अनोखी, रोचक माहितीही वाचकाला मिळते. उदा. देवी सरस्वती समवेत असलेले मोर आणि हंस यांच्या बद्दलची तर्कशुद्ध टिपण्णी.

खरोखरच मातृदेवतांची ही लेखमाला म्हणजे अभ्यासकांसाठी आदर्श वस्तुपाठ आहे! सूक्ष्मातीसूक्ष्म संदर्भ, सुरेख फोटोंची जोड, आजच्या काळाशी जोडलेली नाळ हे सारे लेखकाचा व्यासंग तर दर्शवितेच पण ती रुक्ष, कंटाळवाणी होत नाही...उलटपक्षी उत्सुकता आणि रंजकता कायम टिकवते!...हे पुस्तक स्वरूपात घरोघरी संग्रहात व्हावे हीच अपेक्षा!...

वर्षा ओक, ठाणे,
२० ऑक्टोबर, २०२१.

--००--

# वाचक अभिप्राय ४

स्नेही श्री अरुण फडके यांची मातृदेवता: प्राचीन भारतीय संकल्पना आणि रूपके ही २० लेखांची लेखमाला, संकलित स्वरूपात ई पुस्तक रुपाने प्रकाशित होत आहे. त्याबद्दल सर्वप्रथम त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

मातृदेवता, त्यांचा उगम, त्यांच्या संदर्भातील रूपके, त्या रूपकांमागे असणारा आशय आणि वर्तमानाशी त्यांचा संबंध हे लेखकानेअतिशय नेटक्या आणि ओघवत्या शैलीत मांडले आहे. त्यामुळे ते कुठेही कंटाळवाणे होत नाही तसेच या लेखमालेतील मजकूर हा आबालवृद्धांचे शंका समाधान किंवा त्यांच्या माहितीत भर घालणारा आहे. ही लेखमाला लिहिण्याकरिता त्यांनी बरेच संशोधन आणि संदर्भांचा उपयोग केला आहे .त्यामुळे ही सर्व माहिती अत्यंत अभ्यासपूर्ण झाली आहे. ही सर्व माहिती (माझ्या माहितीप्रमाणे) प्रथमच एकत्रितपणे उपलब्ध होत आहे. म्हणूनच त्यांची ही मेहनत बहुसंख्य वाचकांना उपयोगी पडावी हीच सदिच्छा!!

**प्राचार्य डॉ गीताली पुंडे,**
**अकोला,**
**२० ऑक्टोबर, २०२१.**

--००--

## प्रस्तावना

निर्गुण निराकारे आदिमाते मूळाधारे वो |
अलक्ष सर्वेश्वरी चिदानंद अपरंपार वो |
संत एकनाथ –

आदिमातेचं आनंददायी रूपवर्णन संत करतात. ही निराकार आदिमाता अनेक प्रतिमांच्या रूपात साकार होते. विश्व प्रसवणारी आदिमाता आपल्या जिज्ञासू, भक्त, साधकांना अनेक रूपात प्रतीत होतं. हे तिचं रूप शब्द, चित्र, मूर्ती, चिन्ह अशा माध्यमांतून प्रगटतं.

आदिम काळापासून ऐंद्रिय अनुभव आणि मानसिक घटना यांचा मेळ साधताना ह्या प्रतिमा निर्माण होत गेल्या. संवेदना आणि संकल्पना ह्यांचा एकत्रित आविष्कार ह्या प्रतिमांच्या माध्यमातून साकार झाला.पिढ्यांपिढ्या ह्या प्रतिमा समाजात, खरंतर समाजमनात रुजत जातात. व्यक्ती-समूह-समाज-संस्कृती असा प्रवास ह्या प्रतिमा प्रतीकांच्या रूपानं साकारत जातो. त्यामुळे भौतिक, सामाजिक, अध्यात्मिक विकासाची अंग ह्या प्रतीकांत आणि त्यांच्या कथांत सामावलेली असतात.

ही प्रतीकं काहीवेळा ठराविक समाजाच्या समजुती, चालीरीती, परंपरा ह्यांचे निर्देशन करतात तर काही प्रतीकं साऱ्या विश्वातील मानसिकतेला कवेत घेतात. सृष्टीचे गूढ उलगडून विश्वनिर्मितीच्या मुळापर्यंत जाताना ह्या प्रतीकांचे संकेत जाणण्याचा प्रयत्न अविरतपणे सुरू असतो.

मातृदेवता हा असाच एक आदिबंध,मातृसत्ताक ते पितृसत्ताक अशा समाज स्थित्यंतरात कायम राहिलेला!! जन्मदात्री, पालनपोषण करणारी, ज्ञान देणारी, संरक्षण करणारी, दुर्जनांचा नाश करणारी अशी तिची अनेक रूपं विविध प्रतिमांतून

साकारली. सौम्य, प्रेमळ, सौंदर्यपूर्ण ते भयावह संहारक प्रतिमा त्या त्या भावनेचं प्रतीक होऊन सामोऱ्या येतात.

प्रस्तुत पुस्तकात लेखकाने मातृदेवता संदर्भांतील प्राचीन भारतीय संकल्पना आणि रूपके यांचा विचार मांडला आहे. आदिम काळापासून लोकमानसात रुजत गेलेल्या मातृदेवतेची विविध रूपे मूर्ती, चित्रं माध्यमातून साकारली गेली, ह्या प्रतीकांचा अर्थ इथे समजून सांगितला आहे.मातृदेवता अदिती पासून सुरुवात करून तिच्या तेजस्वी, जगाला उपकारक अशा पुत्रांची ओळख होते. ह्याच अदितीची रूपं म्हणजे महालक्ष्मी, तुळजापूर भवानी असं आताच्या काळाशी त्या रूपाचं अनुसंधान दाखविलं जातं.

देवीची नऊ रूपं, त्यांचं पंच महाभूतं आणि अंतःकरण चातुष्ट्याशी साधर्म्य त्यांच्या साकार प्रतिमांच्या रूपातून स्पष्ट करून सांगितलं आहे. प्रकृती ही साऱ्या विश्वाची जननी, त्रिगुणात्मिका आहे. म्हणूनच सात्त्विक, राजस, तामस अशा तिन्ही गुणाचं प्रकाशन करणारी महासरस्वती, महालक्ष्मी, महाकाली ह्या रूपाचं महत्त्व आणि तरीही त्यांचं मातृस्वरूप कायम रहाणं हा विशेष भावतो. काही देवतांच्या प्रतिमा भयावह असल्या तरी त्या असुर, राक्षस तसेच सृष्टीचे अहित करणाऱ्यासाठी संहारक रूपात प्रगट होतात. ही देवता प्रत्येक रूपात आपल्या भक्तांचं, साधकांचं हित साधणारी, संरक्षण करणारी आहे.

ह्या मातृदेवातांच्या प्रतिमा, मूर्ती, चित्रं साधकाला काही सांगू पहातात. त्यांच्या हातातील आयुध किंवा वस्तू कशाचं प्रतीक आहेत, कोणत्या हातात त्यांनी ती आयुधं धारण केली आहे त्यानुसार त्याचे संकेत बदलतात.कोणत्या वाहनावर देवी विराजमान आहे ह्यातूनही काही संकेत दिले जातात. म्हणजेच त्या प्रतिमेच्या सर्वांगीण विचारातून त्याची प्रतीकात्मकता सिद्ध होत असते. चित्रातील रंगही काही सांगत असतात. विशेषतः पांढरा रंग शुद्धतेचं प्रतीक म्हणून विश्वमनात रुजलं आहे. मूर्तीचं, चित्राचं सौंदर्य जसं आखीव-रेखीवतेत आहे तितकंच ह्या संकेतांतही आहे.

जेव्हा शिल्प, मूर्ती, चित्रातील भाव मनाला भिडतो तेव्हा कलात्मक सौंदर्याची अनुभूती आनंददायक होते, सुखावह होते ह्याची प्रचिती येते.

देवी सरस्वती विद्येचं प्रतीक म्हणून साऱ्या जगाने स्वीकारले आहे. सरस्वतीची प्रतीकात्मता ह्या लेखांतून विस्तृतपणे मांडली गेली आहे. ही सरस्वती व्यासांच्या आवाहनाचा स्वीकार करून शारदेच्या रूपात प्रगट झाली. विश्वाचा खेळ मांडणारी शारदा मातृदेवतेच प्रतीक आहे.शृंगेरी मठातील शारदा न्बेच्या म्हणजे देवी सरस्वतीच्या, अक्षमाला धारण केलेल्या उजव्या हातावर पोपट बसला आहे आणि साध्वी अंडाल जी महालक्ष्मीचे रूप मानलीजाते तिच्या डाव्या हातावर पोपट आहे. पोपटाची प्रतिमा अशी दोन देवींच्या प्रतिमेत मानवाच्या अज्ञानाचं प्रतीक म्हणून येते, हे साधर्म्य महत्त्वपूर्ण आहे. अशी प्रतिमा प्रतीकांची उकल ह्या लेखमालेचे वैशिष्ट्य आहे.

देवीची स्तोत्रही अनेक पातळ्यांवर समृद्ध करणारी ठरतात. देवीचं गुणगान, वर्णन सगुण रूपासोबत निर्गुणाची जाणीव करून देते, शब्द-भाषा सौंदर्याची ओळख होते, उच्चार-वाणी शुद्ध होऊन स्मरणशक्ती वाढते.

अदिती ह्या मातृदेवतेपासून सुरुवात करून सप्तमातृका, देवीची नऊ रूपं, त्रिगुणात्मक रूपं, रौद्र प्रतिमा, शाक्त संप्रदायातील चौसष्ट योगिनी अशी मातृदेवतेची अनेक रूपं त्यांच्या प्रतीकात्मकतेसह स्पष्ट करून सांगितली आहेत. जगत्जननी रूपापासून सुरू झालेला हा प्रतीक प्रवास शिव-शक्ती समावेशान सांगणाऱ्या नटराजाच्या मूर्तीपर्यंत येऊन पोचतो. ह्या नटराजाच्या प्रतिमेचा सर्वांगीण विचार मांडला आहे. शिवाशिवाय शक्तीचं अस्तित्व नाही आणि शक्तीशिवाय शिव अपूर्ण आहे. शक्तीचा अंगिकार शिवाने केला की सृष्टी निर्माण होते. हे शिवाचं शक्तिरूप मातृदेवतेच्या रूपात स्वीकारलं गेलं आहे.

माता जशी आपल्या बालकाच्या हितासाठी कटिबद्ध असते तशीच साऱ्या विश्वाची माता असलेली शक्ती विश्वाच्या सुखासाठी त्याचे योग्य पालनपोषण करणारी

आहे. ती असुर, राक्षसांचा वध करते. असुर, राक्षस हे बाहेरच नाहीत तर ते मनामधेही दडलेले असतात. ह्या दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठी ती महाकालीचं रूप धारण करते. व्यवहारात स्थैर्य देण्यासाठी महालक्ष्मीचं रूप घेते आणि कला, विद्येच्या माध्यमातून अंतिम ज्ञानापर्यंत घेऊन जाण्यासाठी सरस्वतीच्या रूपात प्रगट होते. असुर प्रवृत्तींचा पराभव करून विश्वाचा पसारा सांभाळत सुखाचा मार्ग दाखविणारी ती मातृदेवता.

अशा मातृदेवतेची साधना कशी करावी ह्याचं निर्देशन मूर्ती, प्रतिमा, शिल्प, चित्रं, साहित्य ह्या माध्यमांतून हजारो वर्षं केलं गेलं. त्यातूनच जनमानसात प्रतीकं रुजली. ह्या प्रतीकांनी मानव वंशाची संस्कृती साकार झाली.

भारतीय संस्कृतीतील मातृदेवतेच्या प्रतीकांचा अभ्यास ह्या लेखांतून मांडण्यात आला आहे. ह्या मूर्तींची साधना ही निव्वळ मूर्ती पूजेपुरती मर्यादित नसून त्यातून ज्या शक्तीचं प्रगटीकरण आहे त्या शक्तीची पूजा आहे. ह्या शक्तीची उपासना करणारे साधक आणि त्यांच्या साधनेचा विचारही केला गेला आहे.

मूर्ती, शिल्प, चित्रं बघताना ती प्रमाणबद्ध आहेत का एवढ्यावरच त्यांचं सौंदर्य अवलंबून नाही, तर त्यातून संक्रमित होणारा भाव काय आहे हे जाणून घेणंही जास्त महत्त्वाचं आहे. ह्या कलाकृती आपल्याशी काही बोलू पहातात, आणि त्यांचे बोल मनाच्या कानांनी ऐकावे लागतात, बुद्धीच्या सहाय्याने जाणावे लागतात. मन आणि बुद्धीची एकाग्रता झाली की वैश्विक संकल्पना उलगडू लागतात. एकात्मतेचा प्रवास सुरू होतो.

अनेक कारणांनी नजरेआड होत चाललेल्या ह्या प्रतीकांचा मागोवा अरुण फडके लिखित ‘मातृदेवता : प्राचीन भारतीय संकल्पना आणि रूपके’, ह्या प्रस्तुत लेखांतून आपल्या समोर उलगडत जातो.सोबत असलेली छायाचित्रं प्रतीकांची समर्पकता समजून घ्यायला मदत करतात. असा अर्थ समजून घेणं हे आपल्या भावविश्वाला समृद्ध करणारं ठरतं...

ही शिवरूप शक्ती अनेक अवतार घेऊन येते... दशावतारांचं मर्म सांगताना एकनाथ म्हणतात.....

**एकचि माउली दहा अवतार खेळली वो |**
**पाहता गुरुवचनी मज माजीच बिंबली वो |**
**हरुनी त्रिविधताप साधुजनाला उद्धरी वो |**
**एका जनार्दनी सहजी सहजे ऐक्या आली वो |**
**उदो म्हणा उदो दसविध माउलीचा वो ||**

डॉ मनीषा फडके,
मुंबई,
२१ ऑक्टोबर, २०२१.

--००--

# मातृसत्ताक कुटुंब

श्रावण महिन्यातील दर्श अमावस्या – सोमवती अमावस्या अर्थातच पिठोरी अमावस्या हा दिवस भारतीय परंपरेत मातृदिन म्हणून संबोधित केला गेला आहे. आपल्याला जन्म देणाऱ्या मातेप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा दिवस. मात्र आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीत, जन्म देणाऱ्या आईबरोबरच पृथ्वी – जन्मभूमी – पालनकर्ती – रक्षणकर्ती – शिक्षण देणारी अशा प्रत्येक स्त्रीला मातेसमान मानले गेले आहे. पिठोरी अमावस्या अर्थात यावर्षीच्या ६ सप्टेंबर २०२१ पासून, मातृदेवता – प्राचीन भारतीय संकल्पना आणि रुपके ही नवी लेखमाला वाचकांसाठी सादर करतो आहे. विजयादशमी म्हणजे १५ ऑक्टोबर २०२१ पर्यन्त ही लेखमाला संपन्न होईल. त्याच दिवशी **E Book** स्वरूपात ही लेखमाला प्रकाशित होईल. हे **E Book** सर्व वाचकांसाठी विनामूल्य उपलब्ध होईल.

मातृदेवता ही संकल्पना आणि त्यांची असंख्य रुपके आणि प्रतीके, कित्येक सहस्त्र वर्षांपासून प्राचीन भारतीय संस्कृतीत खोल वर रूजली आहेत. यातील सूर्याची जन्मदात्री अदिती .. पृथ्वी .. सरस्वती .. श्री लक्ष्मी .. महाकाली .. रात्री .. अंबिका .. उमा .. दुर्गा .. जन्मभूमी भारतमाता अशा मातृदेवता - शक्तितत्व तत्वज्ञान - वैष्णव आणि शैव संप्रदायातील मातृदेवता - शिव आणि शक्ति संयोग - पुराणातील चंडी सप्तशती – सप्तमातृका – चौसष्ट योगिनी – वैदिक आणि तांत्रिक संप्रदायातील मातृदेवता - शाक्त संप्रदायातील महत्वाचे मातृदेवता साधक..... असा मातृदेवता आणि मातृभक्ति संदर्भातील विस्तृत अभ्यास, या लेखमालेत मांडला आहे.

काही सहस्त्र वर्षांपासून निसर्गचक्राशी जोडलेल्या भारतीय दैनंदिन जीवनशैलीमधे भारतीय तत्वज्ञान – भारतीय लिखित साहित्य – चित्रकला – शिल्पकला – मूर्तिकला – नृत्य – नाट्य – संगीत – स्थापत्य या सर्व अभिजात कला निर्मितीत, मातृदेवता ही मूळ प्राचीन भारतीय संकल्पना, असंख्य माध्यमे – रुपके – प्रतीके आणि संकेत यातून, काही सहस्त्र वर्षांपासून उन्नत आणि विकसित होऊन व्यक्त झालेली दिसते.



**^** सूर्याची जन्मदात्री अदिती



**^** पृथ्वी देवता

कुटुंब आणि समाज या प्राथमिक व्यवस्थांची मांडणी होत होती अशा अगदी आदिम काळांत, मातृसत्ताक कुटुंब व्यवस्था प्रामुख्याने प्रचलित होती. त्या काळांतील व्यवस्थेत, जन्म देणारी स्त्री केंद्रस्थानी होती. पुढच्या काळांत, जन्म देणाऱ्या मातेचे महत्व आणि नेतृत्व, दोन कारणांमुळे कुटुंबात स्वीकृत झाले होते. प्रथमतः कुठल्याही विवाह संस्थेची निर्मिती झालेली नव्हती आणि त्यामुळे पर्यायाने कुटुंबातील पुरुषप्रधान संस्कृतिचा उगम झालेला नव्हता. यामुळे कासवाच्या गतीने होणाऱ्या समाज व्यवस्थेच्या बांधणीमध्ये, पुरुषांचा परिचय, अमुक एका स्त्रीचा मुलगा किंवा अमुक एका स्त्रीच्या कुटुंबाचा सदस्य असाच होत असे. दुसरे कारण असे की

अशा कुटुंबाचे पालन – पोषण – रक्षण – शेती याची जबाबदारी या स्त्रीचीच होती. कुटुंबातील तिचे स्थान अद्वितीय होते. त्यामुळेच प्रत्येक कुटुंबातील पुरुष, विधी आणि समारंभ याच्या माध्यमातून आपल्या जन्मदात्रीचे महत्व आणि तिच्या नेतृत्वाचा स्वीकार, समाजात व्यक्त करत होते. या आदिम काळांतील मातृसत्ताक कुटुंबव्यवस्थेत, मातृदेवता या संकल्पनेचे बीज आपल्याला गवसते.

नंतरच्या काळांत पुराणिक परंपरेतील या मातृदेवता संकल्पनेला, वेगळे घटक असलेल्या, काहीशा तर्कावर आधारित रिवाज आणि कथा जोडल्या गेल्या होत्या. मूल्यप्रधान नैतिक सल्ला देणारे हे रिवाज आणि कथा, तत्वज्ञाननिष्ठे पेक्षाही धर्मशास्त्रीय विचार धारणेला जास्त जवळच्या वाटल्या असाव्या. **कुटुंब आणि समाज या व्यवस्था याची प्राथमिक बांधणी सुरू झाली तेंव्हा पासूनच विश्वाची निर्मिती – निसर्गचक्र – आरोग्य – मूल्य विचार – कुटुंब या गोष्टींची सांगड, उपासना – पूजा – विधी – समारंभ या माध्यमातून धर्माशी घातली गेली होती असे आधुनिक मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्राचे अभ्यासक स्पष्ट करतात.** लिपि आणि लेखन याचा शोध लागण्याच्या आधीच्या काळातल्या अनेक घडामोडी, नोंदवून ठेवता येत नव्हत्या. मग अशा घटनांच्या आठवणी एखाद्या रिवाजातून, कथेतून जपल्या जात होत्या. मातेवरच्या आंतरिक श्रद्धेमुळं आणि पूजनीय भावनेमुळं अशा रिवाजांना, कथांना नंतरच्या काळांत धार्मिक स्वरूप येत गेलं आणि मग अशा धार्मिक रिती पाळल्या गेल्या नाहीत, तर देवतेचा कोप होईल, अशा काल्पनिक भीतीतून हे रिवाज बंधनकारक होऊन गेले.

**या रिवाज आणि कथा याच्या कल्पना वेगळ्या असल्या तरी जनमानसाचा त्यावरील विश्वास, यामुळे जन्मदात्री माता आणि तिची सर्व रुपके – प्रतीके याला परंपरेने मिळालेली मान्यता निरंतर होती आणि रहाणार आहे. नेमके यामुळेच**

**मातृदेवता भक्ति आणि मातृभक्त साधक यांची भारतीय लोकजीवनातील या संकल्पनांवरील श्रद्धा, काही सहस्त्र वर्षांपासून अढळ आणि चिरंतन राहिली आहे.**

सेमिटीक अथवा यहुदी संस्कृति – हेलिनिक अथवा ग्रीक संस्कृति – ट्यूटनिक अथवा जर्मन वंश संस्कृति – नॉर्डीक अथवा स्कॅनडीनेवियन संस्कृति अशा जगभरातील प्राचीन समाज संस्कृतींमध्ये, मातृदेवता भक्ति आणि मातृभक्त साधक प्रचलित होतेच. मात्र परंपरेने भारतीय लोकमानस – लोकश्रुती – लोकश्रद्धा यामध्ये मातृदेवता आणि मातृभक्ति या प्रत्येक व्यक्तीच्या धारणा आणि भावना, धर्मनिष्ठेशी - धर्मकर्तव्याशी आणि कुटुंबकल्याण कर्तव्याशी जोडल्या गेल्या आहेत. अन्य संस्कृतिशी तुलना करता, आणि भारतीय समाजमनातील मातृदेवता संकल्पना दृढ होण्यात नेमका हाच मूलभूत फरक आहे. आपला जन्म – आपले अस्तित्व याविषयी आपल्याला वाटणारे आश्चर्य, विस्मय, प्रसंगी निसर्गाचा धाक, दरारा अशा आदिम भावना असोत - तोकडी समजूत किंवा साक्षर बुद्धी असो, मानववंशशास्त्रज्ञांच्या मते, व्यक्तीच्या अशा धारणा आणि भावना या अनुवंशीकतेने त्याला जन्मतः मिळालेल्या असतात.

आजच्या काळांत आर्यांचे भारतातील आगमन या संकल्पनेवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. अनेक भारताचार्यांनी, आर्य बाहेरून भारतात आले या संकल्पनेला फेटाळून लावले आहे. मात्र आधी उल्लेख केलेल्या आदिम काळांतील मातृसत्ताक कुटुंब व्यवस्थेचे परिवर्तन कालांतराने झालेच होते मात्र या परिवर्तनाला काही शतकांचा काळ निश्चितच लागला असावा. यांचे कारण आपल्या खंडप्राय देशातील भिन्न आणि विषम पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील चालीरीती संदर्भात, एकमेकांशी संपर्क – संघर्ष – समझोता या प्रक्रिया नियमित घडत होत्या आणि त्यातूनच **विधी-**

**समारंभांच्या माध्यमातून मातृदेवता आणि मातृभक्ति या परिवर्तीत संकल्पना, धर्म आचरणाशी आणि कुटुंब कर्तव्याप्रती जोडल्या गेल्या असाव्या.**

याला दुसरा संदर्भ असा की आदिम काळानंतर भारतात वैदिक संस्कृतीचा प्रभाव वाढला. प्राचीन भारतीय पौराणिक इतिहासाचे नामवंत संशोधक श्री नीलेश ओक यांच्या अभ्यासानुसार, **ख्रिस्तपूर्व चोवीस हजार वर्षांपूर्वी, उत्तर भारतातल्या मैदानी प्रदेशात, म्हणजेच सिंधु आणि सरस्वती नदीच्या खोऱ्यात वैदिक संस्कृतीचा उगम झाला होता.** (पुढच्या काही लेखांत त्यांच्या पुस्तकांचा संदर्भ दिला आहे.) आदिम काळातील मातृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत, वैदिक संस्कृतीच्या प्रभावानंतर मोठाच बदल झाला होता. कुटुंबात आणि समाजात विवाह संस्थेच्या स्वीकृती नंतर, ही वैदिक संस्कृति पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक झाली होती. देवतांच्या मुर्ती आणि शिल्प यातून आपल्याला या पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाचा नेमका अभ्यास करता येतो. वैदिक संस्कृतीच्या देवतांमध्ये पुरुष देवतांचा प्रभाव मोठा आहे असे काही अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे बहुतांशी स्त्री देवता या पुरुष देवतांच्या पत्नी या स्वरूपात दिसतात. मात्र वैदिक संस्कृतीचे सर्वच अभ्यासक या निष्कर्ष मांडणीशी सहमत नसतात.

--००--

# देवी अदिती

ऋग्वेद संहितेमध्ये **देवी अदिती** अशी एकमेव देवता आहे जीचा उल्लेख **देवमाता** असा केला गेला आहे. मात्र तिचे बहुआयामी व्यक्तिमत्व सहज वर्णन करता येईल असे सोपे नाही. देवी अदितीच्या गुणवत्तेचे गुणगान केले जाते तितकेच तिच्याबद्दल विपरीत आणि असंगत उल्लेखही केले गेले. इथे देवी अदितीच्या रुपक अथवा प्रतिकाचे दोन अर्थ अथवा संकेत अभिप्रेत आहेत. **असीम .. अनंत .. अपार .. अगणित अशा कुठलीही सीमा – बंधन नसलेल्या विश्वाची – निसर्गाची आणि अर्थातच  विश्वाच्या अस्तित्वाची, देवी अदिती रुपक आणि प्रतीक मानली गेली आहे** हा पहिला संकेत आहे. याच वेळी **विश्वातील निसर्गाच्या प्राकृतिक आणि भौतिक अस्तित्वाची ग्वाही** देणारा देवी अदितीच्या प्रतिकाचा दुसरा संकेत आहे.

हिंदू श्रद्धेनुसार, स्वर्गात रहाणारे आणि तिथून विश्वाचे व्यवहार नियंत्रित करणारे देवी अदितीचे सर्व पुत्र, ज्यांना आदित्य असे संबोधित केले गेले. **देवी अदिती, देवमाता आणि मातृदेवता म्हणून सन्मानित केले जाण्यामागे तशीच काही कारणे आहेत. शतपथ ब्राह्मण** संहितेमधे याचा स्पष्ट उल्लेख केला गेला आहे. **अग्नि देवता – प्रकाशाची आणि ऊर्जेची देवता सूर्य – पावसाची देवता इंद्र** हे तिघे अदितीचे प्रमुख पुत्र आहेत. हे तीन आणि अदितीचे अन्य पुत्र असीम .. अनंत .. अपार .. अगणित अशा कुठलीही सीमा – बंधन नसलेल्या विश्वाचे नियंत्रक आहेत. मानव – प्राणीसृष्टि – वनस्पति – निसर्ग यांच्यासाठी अदितीच्या या सर्व पुत्रांचे अस्तित्व पवित्र आहे कारण ते अविनाशी – जीवनदाई – उपकारक आहे.

देवी अदितीच्या उदरातून अनेक पुत्र जन्माला आले. मित्र, वरुण, धाता, अर्यमा, अंश, भग, विवस्वान्, आदित्य, रुद्र, इन्द्र ही काही प्रमुख नावे आहेत. खगोलीय दृष्टिने अंतरिक्षात बारा सूर्य भ्रमण करत असतात. हे सर्व देवी अदितीचे पुत्र मानले गेले आहेत. या मातेमुळेच सर्व पुत्रांना देवत्व प्राप्त झाले आहे. देवी अदितीने जेव्हा राक्षस आणि दैत्यांपासून रक्षण करण्यासाठी भगवान विष्णूची आराधना केली त्यावेळी त्यांच्या स्तुतीने श्री विष्णु प्रसन्न झाले. देवी अदितीला त्यांनी आश्वासन दिले की मी अंशरूपाने तुझ्यापोटी जन्म घेणार आहे. देवी अदितीने वामनावतारात श्री विष्णुला जन्म दिला, असाही उल्लेख काही संहितांमधे उपलब्ध आहे.

आपल्या चतुर आणि बुद्धिमान पूर्वजांनी विश्वाच्या निर्मितीचे वर्णन करतांना प्रतीके – रुपके – चिह्न – चिह्नसंकेत यांचा चपखल वापर केला आहे. मानवी स्त्री आणि पुरुष यांच्या मैथुन क्रियेतून संतती निर्माण होते याची त्यांना जाणीव होती. वैदिक संस्कृतीच्या काळांत देवी आणि देवतांच्या संकल्पना निर्माण करतांना त्यांनी देवी-देवतांना मानवी स्वरूपात सादर केले. शिल्प – मुर्ती – चित्र या माध्यमांतून कुशल शिल्पकार आणि मूर्तिकारांनी या संकल्पना सगुण साकार केल्या. विश्वाची निर्माती म्हणून त्यांनी तो मान अर्थातच सृजनशील स्त्रीला दिला. या एकाच स्त्री देवतेची, तिच्या व्यष्टीनुसार, अलौकिक गुण वैशिष्ट्यानुसार, असंख्य प्रतीके – रुपके – चिह्न निर्माण केली. **देवमाता अदिती** हे जन्मदात्री स्त्रीचे असेच सुंदर आणि संपूर्ण **मातृदेवता** रुपक आणि प्रतीक आहे. देवी अदितीच्या वेगळ्या मुर्ती आणि चित्र उपलब्ध नाहीत. मात्र देवी अदिती, **विश्वजननी देवी पार्वतीचेच** एक रूप आहे.

चित्र क्र. १ मधील हे देवी अदितीचे चित्र, गेल्या शतकात छापलेल्या काही संहितांमध्ये उपलब्ध आहे. देवी अदिती या चित्रात ब्रह्मा – विष्णु – महेश यांची आराधना करते आहे असा देखावा चित्रित केला आहे. माहुरगड निवासिनी श्री रेणुका

माता – करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी देवी – तुळजापूर निवासिनी श्री तुळजाभवानीमाता – वणी नाशिक येथीक श्री सप्तशृंगीदेवी या देवता, देवी अदितीचे अर्थात देवी पार्वतीचे स्थूल मुर्ती स्वरूपात प्रतीक मानल्या गेल्या आहेत.



^ सूर्याची जन्मदात्री अदिती

**प्रत्येक स्त्रीच्या जन्मापासून वृद्धत्वापर्यंत, वयानुसार - स्वभावधर्मानुसार होणारे शारीरिक आणि मानसिक बदल - परिवर्तन म्हणजेच सांकेतिक स्वरूपात मांडलेले आणि वर्णन केलेले देवी दुर्गेचे नऊ अवतार किंवा तिची नऊ विग्रह रूपे, हे प्रथम समजून घ्यायला हवे. श्रीदुर्गा सप्तशती** आणि **दुर्गा कल्पतरू** या दोन्ही प्राचीन संहितांमधे, देवी दुर्गेच्या या नऊ अवतारांचे सांकेतिक अर्थ सांगून त्याचे विश्लेषण, विस्ताराने केले आहे. एकाच वेळी स्त्रीच्या व्यक्तिमत्वातील शरीरधर्म – मानसिकता – बुद्धिमत्ता या तीन पातळ्यांवर, हे विश्लेषण वैश्विक तत्वांशी तुलना करताना, त्यातील साधर्म्य स्पष्ट करते. **शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा आणि स्कंदमाता** ही देवीची पहिली पाच रूपे, स्त्रीच्या शारीरिक वयानुसार तिच्या क्षमतेचे साधर्म्य अनुक्रमे **पृथ्वी – जल – अग्नी – वायू आणि आकाश** या पंचमहाभूत

स्वरूपातील वैश्विक तत्वांशी करतानाच तिच्या मानसिक वृत्तीचा संदर्भ देतात. **कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धीदात्री** ही देवीची शेवटची चार रूपे अनुक्रमे **मन – बुद्धी – चित्त आणि अहंकार** या स्त्रीच्या वास्तवातील **अंतःकरण चतुष्ट्य** गुणवत्तांचे सांकेतिक विश्लेषण करतात.

देवी पार्वतीचे अर्थातच देवी दुर्गेचे यातले चवथे गूढ असे रूप म्हणजे **देवी कुष्मांडा**. **गोरखपुरच्या गीता प्रेसच्या श्री दुर्गा सप्तशती हिंदी आवृत्तीत (१९८०) तिचे गर्भवती स्त्री असे वर्णन केले गेले आहे. देवीच्या गर्भात तापयुक्त विश्वाची रचना आहे *(तापयुक्त संसार जिनके उदरमे स्थित है)* असा उल्लेख आहे. ही गर्भवती देवी तेजस्वी प्रकाशग्रह असून ती विश्वाला जन्म देण्याच्या तयारीत आहे असे वर्णन विस्ताराने केले आहे. हीच सूर्यमाता देवी अदिती.**

मूर्तिपूजा ही धार्मिक रिवाजातील उपासना – पूजा पद्धती जगातील प्राचीन संस्कृतींमध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलित होती. भारतात मोहें-जो-दडो व हडप्पा येथे सिंधू संस्कृतीचे राष्ट्र भरभराटीस आले होते. त्यात शिवासारखा देव आणि दुर्गादेवीसारखी देवी वा मातृदेवता यांची मूर्तिपूजा, लिंगपूजाही प्रचलित होती, असे आज सापडणाऱ्या अवशेषांवरून निश्चित करता येते. आज हिंदू धर्मात या मूर्तिपूजेला सार्वत्रिक स्वीकृती प्राप्त झाली. याचे कारण सामान्य जनांना समाविष्ट करणारी व कलेला प्रोत्साहन देणारी सिंधू संस्कृतीपासून वारसाक्रमाने चालत आलेली मूर्तिपूजाच होय.

देवी आणि देवतांची शिल्प - विशेषतः मुर्ती आणि चित्र म्हणजे त्यात त्यांची वैशिष्ट्ये, गुणवत्ता आणि चेतना यांचे अधिष्ठान असते, त्या मूर्तित त्यांचा अंशतः निवास असतो अशी हिंदू धर्मीय उपासकांची निस्सीम श्रद्धा आहे. याच

सिद्धांततत्वावर आधारित, या देवता सर्वव्यापी आहेत म्हणून त्यांची उपस्थिती, मूर्ती आणि प्रतिमेच्या केंद्रस्थानी बिंदू स्वरूपात आहे. या चेतना स्वरूप उपस्थित असलेल्या देवता, सर्वज्ञानी आणि सर्वशक्तिमान आहेत. पूर्णांवशाने हीच, हिंदू उपासना संकल्पनेची मुलभूत बांधणी आहे. योग्य ध्यानधारणेने ज्ञानप्राप्ती साठी केलेल्या उपासना आणि प्रार्थनेचा अंतिम परिणाम, देवतांच्या या चेतनेद्वारे ज्ञानप्राप्तीमधे होतो.

प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्र आणि त्याच्या चिह्नसंकेतांचा अभ्यास करताना एका गमतीच्या वास्तवाकडे लक्ष वेधले गेले. ब्रह्मा+विष्णू+महेश या त्रिमूर्तीसह सर्व देव-देवतांच्या प्रतीमांकडे आपण सर्व लहान+थोर खूप गंभीर आदरानेच बघतो. मात्र बाळकृष्ण – बाल हनुमान – गणपतीबाप्पा – जेष्ठा आणि कनिष्ठा गौरी अशा काही देवता मात्र, आबाल+वृद्धांच्या लाडक्या  सखा-मित्र-स्नेही आहेत. याला कारणही खास आहे. त्याचा संदर्भ असा आहे. देवतेप्रती असलेल्या उपासक आणि साधकाच्या नात्यानुसार, देवतेच्या व्यष्टीनुसार, अलौकिक गुण वैशिष्ट्यानुसार, प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्रात स्पष्ट विश्लेषणासह मूर्तींचे पांच प्रकार सांगितले गेले. **योगमुर्ती – भोगमूर्ती – वीरमूर्ती – उग्रमूर्ती आणि अभिसारिकामूर्ती** असे हे मूर्तींचे पांच प्रकार. शिल्प – मूर्ति – चित्र या सर्वच माध्यमांतून मातृदेवता सामान्यतः  **शांत – सौम्य रूप, उग्र किंवा प्रचंड रूप, कामप्रधान रूप** अशा तीन रूपात आपल्याला दर्शन देतात. वेदांच्या लिखित साहित्य निर्मिती नंतर, त्यातील उपलब्ध नोंदीवरून मातृदेवता संकल्पनेचा आणि त्याच्या निश्चित तरीही विविध उपासना पद्धतींचा उल्लेख मिळतो.

--००--

# देवी पृथ्वीमाता – आलवार संत – नयनार संत

ऋग्वेदातील १.१६८.३३ या ऋचांमधे, पृथ्वीचा उल्लेख **मातेसमान देवता** असा निश्चितपणे केला आहे. वेद साहित्याच्या निर्मितीत, तिच्या संदर्भातील प्रत्येक उल्लेख, आकाश अथवा स्वर्ग या संकल्पनेला तिचा पती मानून केला गेला आहे. शेतीची सुरक्षा आणि उत्पन्न – अन्न धान्य सुबत्ता आणि पशुधनाची वृद्धी यासाठी, पृथ्वीमाता आणि तिचा पती आकाश अथवा स्वर्ग यांची आराधना केली जात असे. आपल्या कुटुंबाची प्रगती, संपन्नता, शत्रूपासून संरक्षण, संतती प्राप्ती, दीर्घायुष्य यासाठी प्रार्थना करतानाच, शेती करतांना तिच्या शरीरावर होणाऱ्या आघातांसाठी तिची क्षमा याचना केली जात असे. तिचे औदार्य – वत्सलता – सहनशीलता – प्रेम – विशालता – विविधता – साधन संपन्नता या तिच्या व्यक्तिमत्वाचे कौतुक आणि तिच्याप्रती कृतज्ञता, आपल्या वेदकर्त्यांनी समृद्ध साहित्यात व्यक्त केली आहे. नंतरच्या काळांत अथर्ववेदांतील १२.१.१-१८ या ऋचा, पृथ्वीमातेच्या या मातृदेवता स्थानाला पुष्टी देतात.

नंतरच्या काळांत, **ऐतरेय ब्राह्मण** संहितेत केलेल्या विस्तारीत उल्लेखानुसार, पृथ्वीदेवी अन्नधान्याची सुबत्ता देणारी भाग्यविधाती आहे याची जाणीव नागरिकांना झाली. म्हणून कुबेरा नंतर तिची उपासना सुरू झाली. पृथ्वीदेवी म्हणजे भुदेवी. ही जगनियंत्या श्रीविष्णुची पत्नी, समृद्धीची देवता साक्षात श्री लक्ष्मी आहे अशी श्रद्धा, लोकमानसात आणि कालांतराने लोकसाहित्यात स्वीकारली गेली. याला पूरक उल्लेख अन्य साहित्यात उपलब्ध होतेच. जमिनीची नांगरणी करतांना शेतकऱ्याला सापडलेली भूमिकन्या सीता म्हणजे प्रभू रामचंद्रांची भार्या. ही तर साक्षात लक्ष्मी – नारायणची आराध्य आदर्श जोडी होती.




^ भूमीदेवी पृथ्वीमाता ^भूमिकन्या सीतेचा भूमीप्रवेश: चित्रकार राजा रवीवर्मा

गुप्त कालीन (ख्रिस्तपश्चात चवथे शतक ते सहावे शतक) अनेक शिल्पांमध्ये श्रीविष्णु आणि भुदेवी अशी जोडी चित्रित केली गेली आहे. जगनियंता, सृष्टीचा पालनकर्ता श्री विष्णु यांना **प्रकाशदेवता सर्वशक्तिमान सूर्याचे** रुपक मानले गेले आहे. त्यांची सहचारिणी **श्री लक्ष्मी ही भुदेवता** आहे. आकाशातील वृष्टिमुळे पृथ्वीदेवी गर्भधारण करते आणि शेतीच्या बिजाची उपज होते अशी ही सहस्त्र वर्षांपासून धृढ असलेली लोकश्रद्धा, या सर्व मांडणीला पूरक आहे आणि अनंत काळ रहाणार आहे.

**भारतीय पौराणिक इतिहासाचे वरिष्ठ संशोधक माननीय श्री नीलेश ओक यांच्या अभ्यासानुसार, रामायण ख्रिस्तपूर्व १२२०९ या काळांत आणि महाभारत ख्रिस्तपूर्व ५५६१ या काळांत घडले आहे.** आज पर्यंतच्या उपलब्ध साहित्याच्या संदर्भानुसार महाभारत युद्ध ख्रिस्तपूर्व ३०६७ मध्ये झाले होते. यातला वैदिक काळ, **पूर्व वैदिक काळ ख्रिस्तपूर्व १५०० ते १०००** आणि **उत्तर वैदिक काळ ख्रिस्तपूर्व १००० ते ख्रिस्तपश्चात ६००** असा गृहीत धरला गेला होता. श्री नीलेश ओक यांच्या अभ्यासाला प्रमाण मानून, आता हे संदर्भ लेखक या नात्याने मी बदलले आहेत.

यातील पूर्व वैदिक काळांत **इन्द्र, वरुण, प्रजापति, अग्नि, सूर्य** यांची आराधना आणि पूजा प्रामुख्याने केली जात असे. या सर्व देवी देवता, प्रकृती अथवा निसर्गातील बलाढ्य शक्तीचे प्रतीक होत्या. मागील लेखांत, **देवमाता अदितीचे पुत्र असा यांचा परिचय आपल्याला झाला आहे**. पृथ्वीवरील मानवाच्या वास्तव्याला पोषक – उपकारक अशा सर्व निसर्ग आणि प्रकृतीची ही रुपके अविनाशी होती आणि आहेत. नंतरच्या उपनिषद काळांत अर्थात वेदान्त काळांत, **ब्रह्मा – विष्णु – महेश** या त्रिमूर्तीची आराधना विशेषत्वाने सुरू झाली होती. यांच काळांत कर्म – ज्ञान – भक्तिधर्म या जीवन प्रणालींना लोकजीवनात महत्वाचे स्थान मिळाले. मात्र यानंतरच्या उत्तर वैदिक काळांत, धर्म उपासना आणि आराधना पद्धतीत कर्मकांडाला फार महत्व प्राप्त झाले. याच काळांत, वेद रचनांच्या विपरीत व्यवहार करणाऱ्या ढोंगी लोकांचे प्राबल्य वाढले आणि त्याचा मोठा प्रतिकूल प्रभाव लोकजीवनावर पडला होता. काही सहस्त्र वर्षांपासून, देवी देवतांच्या आराधना – साधना – पूजा या श्रद्धा व्यक्तते मध्ये असे नियमित परिवर्तन होत राहिले होते.


या पाखंडी वृत्तीचा आणि कर्मकांड प्रभावाचा समाजजीवनात दिसलेला दृश्य परिणाम म्हणजे **बौद्ध धर्म प्रणाली** आणि **जैन धर्म प्रणाली** या दोन संप्रदायांच्या निर्मितीच्या मांडणीची सुरुवात आणि वेगाने झालेली वृद्धी. जसजसा या दोन धर्म प्रणाली लोकजीवनात स्वीकृत झाल्या तशी यातील साधकांची संख्या वाढली आणि कालांतराने त्या संप्रदायातही सांस्कृतिक रूढी आणि कर्मकांडाचा प्रवेश झालाच.

वैदिक संस्कृतीच्या प्रभाव काळापासून भगवान बुद्ध यांच्या पर्यंतचा भक्तिमार्ग परंपरेचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की भक्तिमार्ग सूत्रांची सुरुवात, महाभारत काळापासून झाली आणि ख्रिस्तपश्चात सहाव्या शतकांत, या भक्तिमार्ग परंपरेचे पुनरुज्जीवन झाले.

सहाव्या शतकांत शैव आणि वैष्णव या दोन्ही प्राचीन हिंदू धर्मप्रणालिंमध्ये, दक्षिण भारतातील संत – महंतांच्या भक्तिप्रवण कीर्तन – प्रवचन – अभंग – श्लोक या साहित्य रचनांमुळे, विशुद्ध प्रेमावर आधारलेली भक्तिमार्ग श्रद्धा परंपरा पुन्हा विकसित झाली. त्याकाळांत दक्षिण भारतात बौद्ध आणि जैन संप्रदायांचा प्रसार, तामिळनाडू आणि आंध्र या विस्तारीत भूभागातील समाजात झाला होता. शैव संप्रदायातील ६३ नयनार संत आणि वैष्णव संप्रदायातील १२ आलवार संत यांनी दक्षिण भारतात, ख्रिस्तपश्चात सहाव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यन्त, भक्तिमार्ग आंदोलन आणि श्रद्धा परंपरेचा प्रचार आणि प्रसार केला. कुठल्याही भौतिक गोष्टींचा संचय न करण्याचा बौद्ध प्रणाली आणि जैन प्रणाली यांचा अपरिग्रह म्हणजे मूलभूत तत्वसिद्धांत, शैव आणि वैष्णव या दोन्ही प्रणालिनां मान्य नव्हता, हे भक्तिमार्ग आंदोलन आणि श्रद्धा परंपरेचा प्रचार आणि प्रसार, याचे मुख्य कारण होते.



^ वैष्णव संप्रदाय आलवार संत



^ शैव संप्रदाय नयनार संत

याच सहाव्या शतकापासून **कृष्ण – राधा – राम – सीता – हनुमान – भैरव – श्रीगणेश** अशा वेदकाळात आराध्य नसलेल्या देवी – देवता, लोकमानसाने

स्वीकारल्या आणि त्यांची मंदिरे निर्माण झाली आणि अर्थातच आराधना – उपासना – पूजा रिवाज प्रचलित झाले. **अशाच दीर्घकालीन प्रथा – परंपरांच्या परिवर्तन प्रक्रियेत, पृथ्वीमातेला, विष्णुपत्नी श्री लक्ष्मी असा थोडा वेगळा परिचय प्राप्त झाला. याच दक्षिण भारतात, आठव्या – नवव्या शतकांत, आदि शंकराचार्यांनी, आत्मा आणि परमात्मा वेगळे नाहीत अशी शिकवण देणाऱ्या अद्वैतवाद या सिद्धांताचा प्रचार आणि प्रसार केला.**

या लेखमालेतील अगदी पहिल्या लेखांत, लेखमालेच्या विषयाचा परिचय आणि विस्तार सांगतांना मी एक उल्लेख केला आहे. **नंतरच्या काळांत पुराणिक परंपरेतील या मातृदेवता संकल्पनेला, वेगळे घटक असलेल्या, काहीशा तर्कावर आधारित रिवाज आणि कथा जोडल्या गेल्या होत्या. वेदांत काळांत, मूल्यप्रधान नैतिक सल्ला देणारे हे रिवाज आणि कथा, तत्वज्ञाननिष्ठे पेक्षाही धर्मशास्त्रीय विचार धारणेला जास्त जवळच्या वाटल्या असाव्या. त्या घटना अशा संथ गतीने लोकजीवनाला शतकानूशतके प्रभावित करत राहिल्या.** आपल्या खंडप्राय देशांत प्रदेशागणिक पृथ्वीदेवीच्या अर्थात मातृदेवतेच्या उपासना – आराधना – पूजा पद्धती भिन्न आहेत मात्र तरीही मातृदेवता संकल्पनेचा मूळ गाभा, निसर्गक्रमाशी त्यांची सांगड आणि लोकधारणा मात्र काही सहस्त्र वर्षांपासून अबाधित राहिली आहे.

**महाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती** या देवी पार्वतीच्या या तीन प्रमुख प्रतिमा आहेत ज्यांची उपासना आणि आराधना केली जाते. देवीच्या या तीन प्रतिमा अनुक्रमे **तामस – राजस – सत्व** या त्रिगुणांची रुपके आहेत. देवतेप्रती असलेल्या उपासक आणि साधकाच्या नात्यानुसार, देवतेच्या व्यष्टीनुसार देवीच्या या तिन्ही प्रतिमांची अलौकिक गुण वैशिष्ट्ये, साधकाला निव्वळ दर्शनाने जाणवतात. पूर्व भारतातील बंगाल –ओडिशा – आसाम या राज्यात आणि पश्चिम भारतातील महाराष्ट्र

– गुजरात – कर्नाटक या राज्यात उत्साहाने साजरे होणारे मातृदेवता देवी पार्वतीचे उपासना उत्सव नेमके शरद ऋतुत साजरे केले जातात हा काही योगायोग नाही. पूर्व भारतातील शारदीय नवरात्रातील **महाकाली पूजा** – अखेरीला पश्चिम आणि दक्षिण भारतील विजयादशमीची **सरस्वती पूजा** आणि दीपावली उत्सवातील **श्रीलक्ष्मी पूजन** हे देवी पार्वतीच्या तीन विग्रह प्रतिमांचे तीन उत्सव, ही हिंदू धर्म प्रणालीतील शरद ऋतुतील आश्विन माहिन्यांत साजरे करण्याची दीर्घ परंपरा आहे.

**भ्रमरी** अर्थात मधमाशी या रूपातील पृथ्वीमातेचा अनोखा परिचय, वराह अवतारातील श्री विष्णु आणि पृथ्वीमातेचे अर्थात भुदेवीचे नाते या बरोबरच आलवार संत साध्वी आंडाल आणि तिरूपति बालाजीचे अर्थात श्री विष्णूचे अलवार नाते याचा परिचय पुढील लेखांत होईल..!

--○○--

# वाराही – भ्रमरी

**गणेश चतुर्थीच्या आधीचा दिवस, म्हणजे भाद्रपद शुक्ल तृतीया हा दिवस, वराह जयंती म्हणून हिंदू पंचांगात मान्यता प्राप्त आहे. श्रीविष्णु यांनी धारण केलेल्या दहा अवतारांच्या वर्णनात, वराह रूप हा श्रीविष्णू यांनी धारण केलेला तिसरा अवतार.** आपल्या विद्वान वेद निर्मात्यांनी आणि अर्थात प्राचीन काळातील अभ्यासकांनी.. .. **ज्यांना ऋषि – मुनि या संबोधनांनी सन्मानित केले गेले** .. .. मानवी स्वभावाचा आणि मनोविज्ञानाचा सखोल अभ्यास निश्चितच केला होता. आता आपण ज्याला पुराणकथा म्हणतो त्या प्रत्येक साहित्यात, त्यांनी **काळी-गोरी, सत्य-असत्य, विवेक-अविवेक, पालन-संहार** अशा परीस्थितीच्या आणि मानवी प्रवृत्तीच्या भिन्न बाजूंची रचना फार कौशल्याने केली होती. उदाहरणादाखल श्रीविष्णूच्या सर्व अवतार कथनात वापरलेली प्रतीके – रुपके – संकेत हे अनेक पातळ्यांवर मानवी प्रगतीचा आलेख मांडतात.

एका बाजूला सजीव सृष्टीची उत्क्रांती – विकास – वृद्धी यांचे विज्ञाननिष्ठ वास्तव वर्णन करणाऱ्या या कथांतून त्याच वेळी विरुद्ध मानसिकता असलेल्या मानवी प्रवृत्तीचा संघर्ष रेखटतात. श्रीविष्णूच्या प्रत्येक अवताराआधी सजीवसृष्टि साठी एक समस्या निर्माण केली जाते. त्या समस्येचे निवारण करण्यासाठी सर्वव्यापी – सर्वशक्तिमान देवता उपाय योजना करतात. **विलक्षण रंजकता** हे प्राथमिक वैशिष्ट्य असलेल्या या कथा त्याच वेळी दोन विरोधी मानवी प्रवृत्तींचा संघर्ष रंगवतात आणि प्रयत्नवादाचे आणि आत्मविश्वासाचे महत्व अधोरेखित करतात. मानवी स्वरूपातील हे सर्व देवी – देवता – दैत्य यांना पृथ्वीवरील सजीव आणि मानवी शरीरधर्म आणि

मानस – अहंकार यांचे काही नियम पाळणे अनिवार्य असते यातील रंजकता, आपल्या लक्षात येते.

हिरण्याक्ष आणि हिरण्यकश्यपू या दितीच्या पोटी जन्माला आलेल्या दैत्य भावांनी ब्रह्मदेवाची तपश्चर्या करून अजेयतेच आणि अमरत्वाचा वर मागितला. दिती ही देवमाता अदितीची बहीण. अदितीचे सर्व बलाढ्य आणि शक्तिमान पुत्र आदित्य, सृष्टीसाठी कल्याणकारी होते. या उलट दितीचे सर्व तितकेच बलाढ्य आणि शक्तिमान पुत्र दैत्य, सृष्टीचे संहारक होते. आपल्याला श्रीविष्णु यांच्याशिवाय कोणीही पराभूत करू शकत नाही अथवा मारू शकत नाही हे दोन दैत्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी श्रीविष्णूचा शोध सुरू केला. आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी त्यांनी पृथ्वीचे म्हणजे भूमातेचे अपहरण केले आणि तिला खोल समुद्रात लपवून ठेवले. श्रीविष्णू यांनी वराह अवतार धारण केला, त्या दोन्ही दैत्य भावांचा पराभव केला आणि खोल समुद्रातून भुदेवीला आपल्या दोन सुळयांवर तोलून तिची सुटका केली आणि तिच्याशी विवाह केला. मंगळ ग्रह हा या दाम्पत्याचा पुत्र समजला जातो.

या सर्व अवतार कथनात वापरलेली प्रतीके – रुपके – संकेत, आधुनिक दैनंदिन जीवनाच्या अनुभवाशी ताडून पहातांना वाचकाला निश्चितच अतार्किक वाटतील. विविध कालखंडातील लिखित साहित्याचे वाचन आणि अभ्यास करतांना, प्रतीके – रुपके – संकेत यांच्या मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही पातळ्यांवरील मथितार्थ – भावार्थ – गुढार्थ – सूक्ष्मार्थ याचा अनुभव घेणे आणि सांगणे हा या लेखमालेचा प्राथमिक उद्देश आहे. भारतातील आणि जगभरातील प्रत्येक धर्मप्रणाली, पंथ, संप्रदाय आणि त्यातील उपासक या सर्वांप्रती सौजन्य – सन्मान – आदर भावना निश्चितच आहे. लेख लिहितांना; धर्मप्रणाली, पंथ, संप्रदाय यांचा उल्लेख, निव्वळ उपलब्ध सत्याधारीत आणि प्रमाणित लिखित इतिहासाचा संदर्भ, इतकाच आहे. **मातृदेवता**

**या प्राचीन संकल्पनेचा आणि त्यातील संकेतांचा अभ्यास** या मूळ धोरण आणि धारणे व्यतिरिक्त कुठल्याही धर्मप्रणाली, पंथ, संप्रदाय याचा प्रचार अथवा प्रसार करण्याच्या अथवा तुलना करण्याच्या उद्देशाने ही लेखमाला लिहिलेली नाही.





**^** वराह अवतारात श्री विष्णूच्या मांडीवर पृथ्वीमाता भुदेवी **^** वराह अवतारात श्री विष्णु पृथ्वीदेवीचा तारणहार

या प्राचीन साहित्यात आपल्या पूर्वजांनी; मानवी जीवनशैली, मनोव्यापार, स्वभावधर्म, कुटुंब आणि समाज व्यवस्था यांची मूल्यनिश्चिती केली. अशा बहुउद्देशी-बहुआयामी अभ्यासाचा वापर त्यांनी दृष्टांत, उपमा, रूपक, तुलना, भेद, साधर्म्य, अन्योक्ती अशा माध्यमातून प्रगती, आनंद, श्रद्धा-भक्ती आणि मानवी मूल्यवृद्धीसाठी केला. संशोधन, व्यासंग आणि अभ्यासाने प्राचीन ग्रंथात नोंदवलेली देवी-देवतांची श्राव्य आणि अक्षरव्यष्टि (फक्त त्यांची) वैशिष्ट्ये, त्यांचा महिमा, चित्र+शिल्प+मूर्ती अशा वास्तव आणि भौतिक माध्यमातून अगदी संक्षिप्त नोंद सूचित करताना, सूक्ष्मार्थाचा वापर आपल्या विद्वान पूर्वजांनी निश्चितपणे केला. अशा वास्तव आणि

भौतिक माध्यमांच्या निर्मितीमुळेच, हे ज्ञान, ही विद्या, हे कौशल्य ... एका पिढीतून पुढच्या पिढीकडे संक्रमित होत राहिले.

पतंजली योगसूत्रातील चित्त आणि वृत्ती यावर भाष्य करताना स्वामी विवेकानंद म्हणतात...**You are the only sentient being; mind is only the instrument through which you catch the external world.** इथे त्यांनी **only sentient being** अशी शब्दावली किंवा अर्थपूर्ण शब्दसमूह वापरलाय तो फार महत्वाचा आहे. याचा अर्थ आहे **ज्ञानेंद्रियांचा उपयोग करू शकणारा सजीव**...!!..ऐकलेले आणि वाचलेले शब्द आपल्या प्रत्येकाशी मनातल्या मनात बोलतात. मात्र जे अर्थ लिहिता किंवा सांगता येत नाहीत ते मनाच्या म्हणजे अर्थातच हृदयाच्या भाषेला समजतात. अक्षर – दृश्य – श्राव्य नसूनही जे संकेत आपल्याला अभ्यासाने उमजतात ती असते **चिन्हांची – प्रतीकांची – रुपकांची – Symbol** ची भाषा.

असीम – अपरिमित – अनंत – अगणित अशा वैश्विक संकल्पना कुठल्याही लिपीत किंवा शब्दांत लिहिता येत नाहीत...त्यांना शब्दार्थात सीमित करता येत नाही... कुठल्याही परिमाणात मांडता येत नाहीत. अशा संकल्पना पार्थिव म्हणजे मर्त्य मानवाच्या समजुतीसाठी चिह्न – प्रतीकात मांडल्या गेल्या. समृद्ध शिल्पशैलीत, मूर्तिकलेत आणि अर्थवाही चित्रशैलीत चिरंतन झाल्या. अशी वैश्विक – चिरंतन चिह्न, अशी प्रतीके कधीही शब्दांसारखी (अर्थ समजल्यावर) नि:शेष होत नाहीत...!!..चिह्ने आणि प्रतीके...सतत - कायम आपल्याला आव्हान देत रहातात. “**तू समजतोयस तो अर्थ ठीक आहे पण माझ्यात अजूनही खूप काही समजण्यासारखे शिल्लक आहे”**...असा इशारा देत रहातात...!!..





^ पृथ्वीमाता–भुदेवी

चार हत्तींनी धारण केलेल्या अंबारीत आसनस्थ भुदेवीची प्रतिमा, चतुर्भुज आणि द्वीभूज अशा दोन्ही हस्तमुद्रांमधे अंकित केली जाते. (वरील दोन चित्रं फक्त सूचक आहेत. खालील वर्णनाशी जुळणारी नाहीत). हे चार हत्ती, चार दिशांची प्रतीके आहेत. चतुर्भुज हस्तमुद्रेत पुढच्या डाव्या हातात देवी पाण्याचा कलश धारण करते तर पुढच्या उजव्या हातात धान्य आणि औषधी वानस्पतींनी समृद्ध कलश धारण करते. वरच्या उजव्या हातात देवी निळया रंगाचे कमलपुष्प धारण करते. हे रात्री उगवणारे निळे कमळ **कौमुदी** अथवा **उत्पला** अशा सुंदर संबोधानांनी परिचित आहे. मूलतः कमळ हे ज्ञानाच्या प्रकाशाचे प्रतीक आहे. देवीचा वरचा डावा हात वरदमुद्रा धारण करतो. **मी आहे .. निश्चिंत रहा** असे आश्वासन देणारी देवीची ही हस्तमुद्रा. साधकांना प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्र संकेतांनुसार, सामान्यतः चतुर्भुज देव अथवा देवतेचे वरचे दोन हात तिच्या अलौकिक दैवी शक्तीचे सूचक असतात. पुढचे दोन हात नेहेमीच देवतेच्या लौकिक – भौतिक अस्तित्वाचे सूचक असतात. म्हणूनच देवीच्या पुढच्या दोन हातांत

पाण्याचा कलश आणि धान्य – औषधी वनस्पतिनी समृद्ध कलश ती धारण करते. तिचे असे कल्याणकारी उत्पादन, लौकिक – भौतिक जगात संजीवांच्या विनियोगासाठी उपलब्ध असते.

प्रतीकांचा – रुपकांचा –चिह्नांचा अभ्यास करताना एखाद्या चिह्नाचे, विचारमग्न-चिंतनशील धारणेने सतत निरीक्षण केले जाते. चित्त आणि वृत्ती एका तालात, एका लयीत काम करू लागल्या की मन म्हणजेच हृदयाला अशा चिंतनशील अवस्थेत चिह्नांचे अगणित अर्थसंकेत उलगडायला लागतात. असे चिह्नसंकेत उलगडणे याला निश्चितच खूप अर्थ आहे. अशा चिंतन-मननात, जुन्या चुकीच्या संदर्भांना स्मृतींच्या पाटीवरून पुसून टाकावे लागते **(to unlearn)** आणि नव्याने जाणवलेले संदर्भ आणि संकेत, स्मरणपटलावर नव्याने लिहिता येतात. **(to relearn)**. मात्र चित्त+वृत्ती दोन्हींच्या एका लयीत येण्यासाठी, असा अनुभव घेण्यासाठी, निष्ठेने काही ध्यास धारण करावे लागतात...!!.. अशा चिंतन-मनन अनुभवाअंती चिह्नांचे संकेत; रूपकं, दृष्टांत, अन्योक्ती म्हणजेच लपलेले सूक्ष्मार्थ – गूढार्थ जाणवू लागतात आणि असे गूढार्थ, दडवून ठेवण्यातले आणि त्याबरोबरच ते अभ्यासू विद्यार्थ्याला प्रकट करण्यातील आपल्या पूर्वजांचे नैपुण्य, कौशल्य लक्षात येते...!!..खरे सांगायचे तर हे सर्व श्रेय चिह्नांच्या त्या अनामिक निर्मात्यांना द्यायला हवे...!!..

देवी-देवतांच्या मूर्ती आणि शिल्प हे नेहमीच परंपरांची प्रतीके असतात आणि परंपरा अशाच निर्माण होत नसतात. त्यांच्या मागे अनेक पिढ्यांचे, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनशैलीचे निश्चित अनुभव असतात. असे निश्चित अनुभव सर्जनशील शिल्पकार आणि चित्रकारांच्या अद्भुत कालाविष्कारातून मूर्त स्वरूप धारण करतात. समाजाची अनेक पिढ्यांची निश्चित जीवनशैली संस्कृतीचे रूप घेते. अशी जीवनशैली आणि संस्कृतीची अभिव्यक्ती शिल्प – चित्र – मुर्ती या वास्तव माध्यमातून व्यक्त होते.

भुवती – भुवनी – भुवनेश्वरी – अवनी – वाराही – धरती – धात्री – धरणी – वसुधा – वसुंधरा – वैष्णवी – कश्यपी – उर्वी – इरा – मही – इला – मेदिनी – वसुमती – धनशिका – हेम – हिरणमयी – सत्यभामा – पुहूमी – वासंतीदेवी – धान्यरूपा – शाकंबरी आणि भ्रमरी अथवा भ्रामरी अशा असंख्य नावांनी **पृथ्वीमाता अथवा भुदेवी** आपल्याला परिचित आहे. यातले **भ्रमरी** हे संबोधन तिची विशेष ओळख आहे. तैत्तरिय ब्राह्मण संहितेत **भ्रमरी** म्हणजे **मधमाशी** असा तिचा परिचय दिला आहे. **पृथ्वीमातेचे हे रुपक खूप तर्कसंगत – सुंदर – स्वाभाविक आहे. तिच्या तनुवरची सृष्टि: वनस्पति – झाडे – फळे – फुले आणि पाणी याने समृद्ध आहे. मधमाशी निरपेक्ष वृत्तीने अविरत मधाचा संचय करते, ज्याला हवा त्याला सहज देते, अगदी तशीच आपली पृथ्वीमाता, तिच्या समृद्ध सृष्टीतील सर्व निर्मिती, सजीवांना निरपेक्ष वृत्तीने देत रहाते म्हणून ती भ्रमरी या सुंदर संबोधनाने परिचित आहे.** सृष्टीतील किटकांपैकी मधमाशी हा समाज जीवन असलेला आणि मानवाला कल्याणकारी एकमेव बुद्धिमान कीटक आहे, अशी आधुनिक विज्ञान संशोधन आपल्याला ग्वाही देते.

तमिळ साध्वी संत अंडाल + तिरूपति वेंकटेश्वर आणि दुर्गा देवीच्या सातव्या रूपातील मातृदेवता देवी कालरात्रीचा परिचय पुढच्या लेखांत नक्की वाचावा...!

--○○--

# साध्वी अंडाल – देवी कालरात्री

**महाकाली – महालक्ष्मी – महासरस्वती** या मातृदेवता, देवी पार्वतीच्या या तीन प्रमुख प्रतिमा आहेत ज्यांची मातृदेवता म्हणून उपासना आणि आराधना केली जाते. देवीच्या या तीन प्रतिमा अनुक्रमे **तामस – राजस – सत्व** या त्रिगुणांची रुपके आहेत. विश्वजननी **देवी महालक्ष्मी** आणि जगनियंत्या **श्रीविष्णु** या सर्वसाक्षी – सर्वशक्तिमान, विश्वाच्या पालनकर्त्या दंपतीला आपल्या पूर्वजांनी अनेक रूपांमधे सादर केले. लोकश्रुती – लोकश्रद्धा – आख्यायिका आणि दंतकथा याच्या शिवाय कुठलाही इतिहास पूर्ण होत नाही असे म्हटले जाते. मध्य भारत आणि उत्तर भारतात राधा आणि मीरा या दोघींना कृष्णभक्ती परंपरेतील आदर्श मानले गेले आहे. या दोघींची निरपेक्ष कृष्णभक्ती, श्रद्धा आणि भक्तीमार्ग परंपरेत आख्यायिका बनली आहे. तामिळनाडू मधील भक्ती परंपरेत तेच स्थान साध्वी संत अंडाल हिला आहे. आठवे वैष्णव आलवर संत विष्णुचित्त यांना तुळशीच्या बागेत सापडल्यामुळे बालपणात तिचे नांव गोदाई असे ठेवले गेले. यामुळे साध्वी अंडाल हिला **भूमिजा – भूमिकन्या सीतेचे** रुपक मानले गेले होते.

आलवर या तमिळ शब्दाचा अर्थ आहे ईश्वराच्या भक्तिमधे दंग झालेले वैष्णव साधक आणि साधिका. ईश्वराची नित्य उपासना – आराधना – भजन – कीर्तन – अर्चना असा दिनक्रम असलेले हे वैष्णव भक्तिमार्गी आलवार एका ठिकाणी कधीच स्थिरावले नाहीत. दक्षिणेतली तीर्थस्थाने – देवालये असा या फिरस्त्यांचा प्रवास अविरत सुरू राहीला. यासर्व बारा वैष्णव भक्तिमार्गी आलवार संतांची प्रतिभा अद्वितीय होती. तरुण वयातील साध्वी अंडाल हिची तिरूपति वेंकटेश्वर रूपातील श्रीकृष्णाप्रती भक्ति भावना इतकी असीम होती की मनोमन तिने त्याला आपला पती मानले होते.

स्वतः बनवलेला फुलांचा हार वेंकटेश्वराला अर्पण करण्याआधी ती तो हार स्वतः घालून बघायची. तमिळ लोकसाहित्यामध्ये साध्वी संत अंडाल आणि तिरूपति वेंकटेश्वर, अर्थात लक्ष्मी नारायणाची ही जोडी चिरंतन झाली आहे. कालांतराने **नाथ मुनि – श्री संप्रदायाचे आचार्य रामानुज आणि आचार्य रामानंद** यांच्या मुळे **गोदांबा** अर्थात **साध्वी संत अंडाल** आणि या **द्रविडी भक्तिमार्ग परंपरेचा** परिचय जनसामान्यांना झाला. खालील डावीकडच्या चित्रात, साध्वी संत अंडाल हिच्या डाव्या हातांवर पोपट बसला आहे. श्री शृंगेरी मठातील देवी शारदाम्बेच्या चित्रातील अक्षमाला धरलेल्या उजव्या हातावर असाच एक पोपट बसला आहे. हा पोपट, मानवाच्या अविद्या आणि अज्ञानाचे प्रतीक मानला गेला आहे. भारतातील अन्य कुठल्याही देवतेच्या संयुक्त प्रतिमेमधे असा पोपट दिसत नाही. यांत समजून घेण्याचा मुद्दा इतकाच की देवी शारदाम्बेच्या रूपात देवी सरस्वती आहे आणि साध्वी संत अंडाल हिला श्री महालक्ष्मीचे रूप मानले गेले आहे.





**^** वैष्णव आलवार साध्वी संत अंडाल

शिल्प – मूर्ति – चित्र या सर्वच माध्यमांतून मातृदेवता सामान्यतः आपल्याला कधी **शांत – सौम्य रूपात,** कधी **उग्र किंवा प्रचंड रूपात, तर** कधी **कामप्रधान रूपात** आपल्याला दर्शन देतात. आलवार साध्वी संत अंडाल ही राजस गुणधारिणी श्री महालक्ष्मीचे रुपक आहे. या अवतारात साध्वी संत अंडाल, श्री महालक्ष्मीच्या शांत – सौम्य या रुपापेक्षा वेगळ्या, एका प्रेयसीच्या थोड्याशा कामप्रधान रूपात दर्शन देते. दक्षिणेतील वैष्णव भक्ती परंपरेत, सातव्या - आठव्या शतकात बारा आलवार संत होऊन गेले. त्या बारा संतांच्या मध्ये, साध्वी संत अंडाल ही एकच स्त्री होती. **थीरुप्पावल** आणि **नचीआर थीरुमोझी** हे साध्वी संत अंडाल हिने रचलेले थीरूमला वेंकटेश्वराच्या आराधना आणि स्तुतीपर भक्तिगीतांचे दोन संग्रह, आजही तमिळ भक्ती आणि लोकसंगीतात गायले जातात. मराठी भक्ती काव्य परंपरेतील संत जनाबाई आणि संत कान्होपात्रा, त्यांच्या अभंगांसाठी आपल्या महाराष्ट्राला अशाच परिचित आहेत.





^ शंख – वैष्णव त्रिपुंड्रा गंध – सुदर्शन चक्र अंकित थीरुमाला आलवार कोलम रांगोळी

साध्वी संत अंडाल हिला देवी महालक्ष्मीचा अवतार मानले आहे. मार्गशीर्ष महिन्यात तिचा श्रीविष्णू यांच्याशी विवाह झाला अशी आख्यायिका आहे. या

महिन्यात तमिळ संस्कृतीत कुमारिका पहाटे उठून, घराच्या अंगणात रांगोळी (कोलम) रंगवतात. ही रांगोळी तांदूळाच्या ओल्या पिठीने रंगवली जाते. ही थीरूमाला वेंकटेश्वराच्या रूपातील श्रीविष्णूच्या स्वागताची तयारी असते. आपल्यालाही असाच सुयोग्य नवरा मिळावा यासाठी मार्गशीर्ष महिन्यात यावेळी मुली, साध्वी संत अंडाल हिच्या **थीरुप्पावल** आणि **नचीआर थीरुमोझी** या थीरूमला वेंकटेश्वराच्या आराधना आणि स्तुतीपर गीतांचे गायन करतात.

कालानुरूप **मातृदेवता – पृथ्वीमाता – भुदेवी – देवी लक्ष्मी – श्री – देवी – रात्रीदेवी** अशा अनेक नावांनी ही मूळ **मातृदेवता** संकल्पना उत्क्रांत आणि विकसित होत राहिली. विशेषतः श्रीविष्णुपत्नी लक्ष्मी हिच्या उपासना – आराधने साठी स्तुतिपर रचना लिहिल्या गेल्या. **श्री** या संबोधनाने सन्मानित ही **देवी लक्ष्मी** समृद्धी आणि सौंदर्याचे रुपक म्हणून स्वीकारली गेली. ऋग्वेद संहितेतील पाचव्या मंडलात **श्री सूक्त** या नावाने पंधरा श्लोकांची ही **श्रीची** म्हणजे **श्री लक्ष्मीची** श्रवणीय संस्कृत आराधना रचना आजही लोकप्रिय आहे.

ऋग्वेद संहितेतील दहाव्या मंडलात, **देवी सूक्त** किंवा **वाक सूक्त** या मातृदेवतेच्या आराधना आणि स्तुतिपर श्लोकांची रचना केली गेली. आपण जे शब्द उच्चारतो त्याला आणि आपल्या वाणीला (वाचेला) ऋग्वेदात मातृदेवते समान मानले गेले आहे. वाक ऋषींची मुलगी अम्भूणा, म्हणून तिचे नांव **वागम्भरणी** असे झाले. हिने रचलेले हे श्लोक याच नावाच्या देवतेसाठी तिने रचले. या रचनेत आपल्या वाणीचे महत्व, उच्चारांचे वैशिष्टय आणि त्याच्या पद्धती सांगितल्या आहेत. आपल्याला बोलायला शिकवणारी – वाणी आणि भाषेचा परिचय करून देणारी – योग्य मार्गदर्शन करणारी ही मातृदेवता **देवी वागम्भरणी** आणि **देवी सूक्त** किंवा **वाक सूक्त** यांचा मला झालेला निव्वळ परिचय सुद्धा निखळ आनंदाचा होता. या नितांत सुंदर आणि श्राव्य देवी सूक्तातील मातृदेवता, **शांत – सौम्य रूपात** आपल्याला दर्शन देते.

ऋग्वेद संहितेतील याच दहाव्या मंडलात आणि **दुर्गा सप्तशती** या संहितेत, रात्री देवीची आराधना – स्तुति करणारी रचना केली गेली. दिवसा उगवणारा सूर्य, पुरुष आणि शिवतत्वाचे प्रतीक मानला गेला आहे तर रात्रीच उगवणारा चंद्र, स्त्री आणि शक्तितत्वाचे प्रतीक मानले गेले आहे. याच शक्ति स्वरूप **रात्री देवीला** आदराने **मातृदेवता** म्हटले गेले त्याला कारणही तसेच आहे. **देवी दुर्गेचे सातवे रूप देवी म्हणजे देवी कालरात्री**. खरे म्हणजे हिचे दर्शनच भयकारी आहे. काळोखाशी साधर्म्य सांगणारी कृष्णवर्णी कांती, अस्ताव्यस्त विखुरलेले केस, अशा देवीच्या गळ्यामध्ये विजेसारखी चमकणारी माळ आहे. देवीला प्रखर आणि भेदक नजर असलेले तीन डोळे आहेत. **देवीचा तिसरा डोळा तिच्या अतींद्रिय – अलौकिक दृष्टीचा संकेत आहे.** नाकातून श्वास – निःश्वास होताना अग्नीच्या प्रखर ज्वाळा फेकल्या जात आहेत. गर्दभ हे देवीचे वाहन आहे. चतुर्भुज शरीरमुद्रेतील देवीचा वरचा उजवा हात, अभय मुद्रेत आणि पुढचा उजवा हात, वरद मुद्रेत आहे. **ही देवीची शरीर मुद्रा अन्य देवतांच्या मुर्तीपेक्षा खूप वेगळी आहे.** देवीने वरच्या डाव्या हातात खड्ग धारण केले आहे आणि पुढच्या डाव्या हातात देवीने काटा शस्त्र धारण केले आहे. देवीची मुद्रा भयकारी असली तरी दर्शक आणि उपासकासाठी ती नेहेमीच कल्याणकारी – परोपकारी आणि शुभसूचक असते.

प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्राच्या मांडणीनुसार, कुठल्याही चतुर्भुज देवी अथवा देवतेचे वरचे दोन हात नेहेमीच तिच्या अलौकिक - अतींद्रिय शक्ती आणि क्षमतेचे संकेत असतात. पुढील दोन हात आणि त्या हातात धारण केलेली आयुधे – शस्त्रे – अवजारे – वाद्य ही नेहेमीच लौकिक – वास्तव – भौतिक – पार्थिव संदर्भाची सूचक असतात. या मुद्रेत देवीचा वरचा उजवा हात अभय मुद्रेत आहे. सामान्यतः बहुतांशी देवी-देवतांच्या पुढच्या उजव्या हाताने अभय मुद्रा धारण केली जाते. देवी

कालरात्रीच्या वरच्या उजव्या हाताची अभय मुद्रा, ही तिच्या **बुद्धी तत्त्वाचे नियंत्रण करणारी देवता** या वैशिष्ट्याशी जोडलेली आहे.






^ देवी कालरात्री

**देवी कालरात्री,** प्रत्येक मानवाच्या **मन – बुद्धी – चित्त आणि अहंकार** या **अंतःकरण चतुष्ट्या** पैकी **बुद्धी तत्त्वाचे** नियंत्रण करते आणि **आपली बुद्धी, आपल्यासाठी काळ आणि वेळेचे नियोजन करते. कालगणना आणि वेळेचे भान हे सजीवांच्या बुद्धीचे काम आहे.** त्यामुळे रात्रीच्या अंधाराची भीती आणि मृत्यू रात्रीच येतो या समजुतीचा पगडा, हे सजीवांच्या बुद्धीचे खेळ आहेत. वेळेचे योग्य नियोजन आणि वेळेचा योग्य परिचय आणि नेमका अंदाज हे सुद्धा आपली बुद्धीच नियंत्रित करते. एखादी क्रिया करण्यासाठी योग्य वेळ कुठली ते ठरवणे आणि ती वेळ निर्माण करणे हे सुद्धा आपल्या बुद्धीचेच नियंत्रण. **मात्र, आपल्या बुद्धीच्या मार्फत नियंत्रित होणाऱ्या आपल्या आणि भोवतालच्या काळाचे भान आणि वेळेचे नियंत्रण या सर्व वेगवान क्रिया पूर्ण होण्यासाठी, सजीवांच्या क्षमतेत, त्याचे अज्ञान आणि अविद्या ही एकच कमतरता असते. देवीच्या गर्दभ वाहनाचा रूपक संकेत इथे फारच**

**महत्वाचा आहे.** गर्दभ म्हणजे गाढव हा प्राणी निरुपद्रवी - मेहनती आहे मात्र **देवीच्या सन्निध असलेला हा गर्दभ अज्ञान आणि अविद्येचे रूपक आहे.** याला समीप घेऊन, देवी साधक – उपासक -- दर्शकाला सांगते...**योग्य निर्णय घेण्यासाठी अभ्यास करा – अनुभव घ्या, काळ-वेळेचे भान ठेवा. मग तुमच्या बुद्धीचे नियंत्रण तुम्ही स्वतःच करू शकाल. या गर्दभासारखे माझ्यावर अवलंबून रहावे लागणार नाही.**

देवीची वरच्या उजव्या हाताची अभय मुद्रा, अभ्यास आणि अनुभवाने विद्या प्राप्त होऊन तुमचे अज्ञान दूर होईल असा संकेत देते आणि पुढच्या उजव्या हाताच्या वरद मुद्रेने देवी तसा आशीर्वाद देते. काळ आणि वेळेचे बुद्धीनिष्ठ उत्तम नियोजन म्हणजे काय... त्याचे नेमके उदाहरण म्हणजे अलीकडे निवृत्त झालेला आपला आवडता क्रिकेटपटू, श्री महेंद्रसिंग धोणी. यष्टीरक्षक म्हणून यष्टीमागे उभा असताना चपळाईने घेतलेले बळी आणि फलंदाजी करताना केलेल्या अद्भुत खेळी या दोन्ही वेळी, चेंडूच्या वेगाच्या - दिशेच्या – सीमारेषेच्या अंतराच्या वेळेचे त्याचे गणित हे सारे विलक्षण होते. **देवी कालरात्रीचे बुद्धी तत्त्वाचे नियंत्रण असेच काही असावे**..!!

प्रतीकशास्त्र – रूपकशास्त्र – चिह्नसंकेत याच्या अभ्यासानुसार, सामान्यतः कुठल्याही स्त्री देवतेच्य मूर्तितील तिचे डावे शरीर, साधक – उपासक – दर्शकाच्या बुद्धीचे म्हणजे वृत्तीचे नियंत्रण करते आणि उजवे शरीर मन म्हणजे चित्ताचे नियंत्रण करते. **देवी कालरात्री** ही तर उपासक – साधक – दर्शकाच्या बुद्धीची नियंत्रक देवता आहे. देवीच्या वरच्या डाव्या हातात खड्ग आहे. आपल्या अलौकिक क्षमतेने बुद्धीनिष्ठ उपासकाचे देवी रक्षण करते असा हा रूपक संकेत आहे. पुढच्या डाव्या हातातील काटा वापरून, देवी बुद्धीच्या अयोग्य निर्णयावर अंकुश ठेवते. आपल्या प्राचीन हिंदू संस्कृतीतिल देवी – देवतांच्या संकल्पनांचा आणि त्यांच्या प्रतीके – रुपके – चिह्न – वाहने यांचा असा अभ्यास फार आनंददायी असतो...!

# उपासना – मूर्तिशास्त्र

मातृदेवता संकल्पना, त्यात समाविष्ट स्त्री देवता, त्यांची विविध व्यक्तिमत्व, दृश्यमान होणारी त्यांची शिल्प – मुर्ती – चित्र, त्यांच्या उपासना – आराधना – स्तुतिपर रचना या सर्वांचा संक्षिप्त परिचय आत्तापर्यंतच्या सर्व लेखांतून आपण करून घेतला. यातले **उपासना – शिल्प – मुर्ती – चित्र प्रतीमा** हे शब्द वारंवार वापरले गेले हे चाणाक्ष वाचकांच्या नक्कीच लक्षांत आले असेल. सुरुवातीला यातील **उपासना** या शब्दाचा, या लेखमालेतील तर्कसंगत – विज्ञाननिष्ठ संदर्भ नक्की काय आहे आणि तो किती परिपूर्ण आहे ते समजून घेणे आवश्यक आहे. मूर्ती – प्रतिमा आणि दर्शक यांच्यामधील मनोव्यापार, यातील आत्मिक प्रगतीचा संदर्भ, यासाठी दर्शकाला आवश्यक असे कौशल्य, मूर्ती आणि प्रतिमेतील दर्शनी आणि अव्यक्त संकेतमूल्य याचा विचार आणि विस्ताराने चर्चा, **पतंजली योगसूत्र** आणि **तैत्तरीय उपनिषदामधे** केली गेली. **उप+आसन = उपासना**, याचा शब्दशः अर्थ (आराधना – प्रार्थना करण्यासाठी) जवळ बसणे. श्रद्धा, भक्ती, चिंतन, मनन, अभ्यास अशा मनाच्या सर्व व्यापारांसाठी, चित्त आणि वृत्ती यांना एकाचे वेळी चैतन्यप्राप्ती होण्यासाठी, मूर्ती आणि प्रतिमेसमोर बसून केलेली **उपासना – आराधना – साधना** हे महत्वाचे कौशल्य मानले गेले.

**मातृदेवता आणि अन्य देवतांच्या उपासना – आराधने – साधनेसाठी, शिल्प – मुर्ती – चित्र प्रतिमा असे दृश्य माध्यम आवश्यक आणि अनिवार्य होते आणि कायमच असणार आहे.** प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्रात, श्रद्धाळू दर्शकाच्या अशा प्रत्येक मानवी भावना आणि धारणांचा विचार झाला. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने बहुआयामी – बहुउद्देशी आणि सूक्ष्म संदर्भ लक्षात घेऊन मूर्तिशास्त्र फार प्रगत-प्रगल्भ झाले. प्रत्येक आराध्य देवी-देवतेच्या शरीरमुद्रेचे लक्षपूर्वक निरीक्षण

करताना त्यात दर्शकसापेक्ष चिह्नसंकेतांचा निश्चित परिचय होतो. दर्शकाच्या आणि साधकाच्या चित्त आणि वृत्तिंना या मूर्ती आणि प्रतिमा, प्रेरणा आणि चेतनेचा अखंडित पुरवठा करत असतात. अशा प्रतिमा माध्यमातून, उपासना आणि साधना मार्गाने देवी-देवतांची मूर्ती आणि दर्शक यांच्यातील निःशब्द संवाद आणि वात्सल्य – करुणा – अभय – वरद अशा भावनांतून मानसशास्त्रीयदृष्ट्या नाते निर्माण करणारे हे प्रगत-प्रगल्भ प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्र, विलक्षण आणि म्हणूनच वंदनीय आहे....!!

चित्रांमध्ये देवी किंवा देवता कधी एकट्या चित्रित केल्या जात नाहीत. त्या चित्रांत असंख्य अन्य गोष्टी अंकित केलेल्या असतात, म्हणून त्या चित्राला **संयुक्त प्रतिमा - Composite image** असे संबोधित केले जाते. प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्राच्या अभ्यासात आणि प्रत्यक्ष मूर्तिकला निर्मितीच्या वेळी संयुक्त प्रतिमेतील देवी-देवतांची आसने - वाहने - सजीव प्राणी आणि पक्षी - शरीरमुद्रा - हस्तमुद्रा - मुखमुद्रा - चरणमुद्रा - आयुधे - शस्त्रे - वाद्ये - अवजारे – वस्त्र परीधानाचे रंग – पार्श्वभूमी या सर्वाचा फार सूक्ष्म विचार झाला होता. प्रतिमेतील देवता आणि तिच्या सानिध्यातील अशा सजीव अथवा निर्जीव प्रत्येक चिह्नाला निश्चित संकेत आहे आणि चिह्नार्थमूल्यही आहे.



< देवी सरस्वती – संयुक्त प्रतिमा

प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र – चिह्नसंस्कृति या ज्ञानशाखेचा अभ्यास करताना प्रथम याचा एक विश्वमान्यता प्राप्त प्राथमिक दृष्टीकोन समजून घ्यायला हवा. जगातील कुठल्याही प्राचीन आणि प्रगत संस्कृतीमधील चिह्न आणि चिह्नसंकेतांचा अभ्यास हा नेहमीच **तात्त्विक आणि सैधान्तिक** (speculative) स्वरूपाचाच असतो**.** यालाही काही निश्चित धोरण आणि कारण आहे**.** अशी प्रतीके – रुपके – चिह्नं आणि चिह्नसंकेत, कुठल्याही निश्चित नियमात बांधलेले नसतात. हिंदू धर्म मान्यताप्राप्त उपनिषदांमधे आणि जैनधर्म मान्यताप्राप्त जीनागोम अथवा लिखित साहित्यामधे, देवी-देवतांच्या या सर्व प्रतिमांच्या चिह्नसंकेत आणि चिह्नार्थमूल्यामधे वैविध्य आणि भिन्नता दिसते. विविध धर्म अथवा संप्रदायनिष्ठ समाजाचा याकडे पाहण्याचा दृष्टीकोन निश्चितपणे वेगळा असतो. या बरोबरच भिन्न व्यक्तिमत्वाच्या - भिन्न संस्कृतीतून आलेल्या दोन विद्वान अभ्यासकांचा दृष्टीकोन सुद्धा वेगळा असू शकतो.

अनेक देव-देवता, पद्मासनावर आसनस्थ झालेल्या दिसतात. अशुद्ध चिखलातून निर्माण होऊन स्वच्छ पवित्रतेकडे, अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे, असे संकेत देणारे कमळाचे फुल आणि त्याचे पद्मासन, देवतेच्या संपूर्ण ज्ञानाची बैठक म्हणूनच स्वीकृत झाले. अशा आसनावर बसलेल्या देवी – देवतांच्या तीन शरीरमुद्रा अविर्भाव, तीन वेगवेगळ्या अभिव्यक्ती आहेत. मांडी घालून पद्मासन मुद्रेतील मूर्ती, ती देवता सर्वश्रेष्ठ असण्याच्या अभिव्यक्तीचा संकेत आहेत. भूमीला स्पर्श करणारा मूर्तीचा खाली सोडलेला एक पाय, दर्शकाप्रती संवेदना व्यक्त करतो. अशा मुद्रेतील वात्सल्यभाव असलेली करुणामय मूर्ती, भक्ताच्या दु:ख आणि अडचणीचे निवारण करण्यासाठी नेहमी पटकन धावून येईल अशा अभिव्यक्तीचा संकेत देत असते.

उभ्या शरीर मुद्रेतील मूर्ती, ती देवी-देवता, विश्वातील तिच्या अगणित - अनंत श्रेष्ठत्त्वाचे संकेत देते. साधकाची साधना आणि भक्ताच्या उपासनेचं पूर्ण आकलन करू शकत असल्याची क्षमता, ही या शरीरमुद्रेची अभिव्यक्ती आहे. अंतिमत: विश्वातील श्रेष्ठत्वाचे संकेत देतानाच कुठल्याही देवी–देवतेच्या उभ्या शरीरमुद्रेमधे दर्शकाच्या मनातील **आत्मसन्मानाची** (**self-esteem**) आणि **आत्मविश्वासाची** (**self-respect**) भावना जागृत करून त्याला कार्यप्रेरणा देते. माऊली विठ्ठलाची अशी उभी शरीरमुद्रा म्हणूनच चेतनादायी असते. मुर्ती आणि संयुक्त चित्र प्रतिमेतील प्रत्येक गोष्टीला, प्रतीके – रुपके यांच्या संकेतांनी असे समृद्ध केले गेले.



**<** माउली विठ्ठल – उभी शरीर मुद्रा

धर्मप्रणालींच्या चिह्नाविषयी जगप्रसिद्ध मनोविज्ञान विश्लेषक डॉ कार्ल गुस्ताव युंग यांच्या मते, देव- देवतां अथवा दानव-पिशाच्च अथवा मनुष्यप्राणी यांच्या संदर्भात सर्जनशील – निर्मितीक्षम असा कल्पनाविलास ज्या संस्कृतीत मुक्तपणे व्यक्त झाला त्या प्रत्येक कल्पनेची नोंद इतिहासाने केली. **म्हणूनच प्रत्येक पुराणकथा-दंतकथा-मिथके आणि त्यांची व्यक्त चिह्ने आणि रूपके यामधे आपल्याला तत्कालीन**

**व्यक्ति आणि समाजाची मनोभूमिका, दैव, विधिलिखित, प्राक्तन या संबोधनांशी जोडल्या गेलेल्या धारणा – आनंद आणि दुखः असे अनुभव आजही निरखून पहाता येतात.** प्राचीन भारतीय दशावताराच्या कहाण्या हे यांचे सर्वोत्तम उदाहरण म्हणायला हवे.

डॉ कार्ल गुस्ताव युंग यांनी पतंजली योगसूत्र या ग्रंथाचा अभ्यास करण्यासाठी वाराणसी शहरातील संस्कृत पाठशाळेला नऊ वेळा भेट दिली होती. अनेक निबंधातून, पतंजली योगसूत्राच्या दुसऱ्या अध्यायातील **प्रतिमा उपासना** या मूळ प्राचीन भारतीय संकल्पनेचे मानसशास्त्रीय महत्व जगाला सांगण्याचे काम डॉ युंग यांनी निश्चितपणे केले. मूर्तिपूजा ही भारतीय संकल्पना म्हणजे मागासल्या वृत्तीची **Idol worship** नसून, त्याला **प्रतिमा उपासना** म्हणावे असे विश्लेषण त्यांनी सतत आग्रहाने जगासमोर मांडले. या पतंजली योगसूत्राच्या मूळ संस्कृत संहितेचे, **माननीय कै कृष्णाजी केशव कोल्हटकर** यांनी शतकांपूर्वी केलेले मराठी भाषांतर **भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पतंजल योगदर्शन** या नावाने लोकप्रिय आहे.

प्राचीन भारतीय पतंजली योगसूत्रानुसार, देवी-देवतांच्या मूर्ती आणि प्रतिमा हे विद्यार्थी आणि उपासकांसाठी, एखाद्या विषयातील अभ्यासासाठी ध्यानधारणा करताना, चित्त आणि वृत्ती केंद्रित करण्याचे एक पूर्ण प्रगत साधन आहे. दर्शक आणि मूर्ती यांचे अनोखे नाते, दर्शकाची (**beholder**) मानसिकता, मूर्तिच्या विविध शरीरमुद्रांमधून स्पष्ट होते. मूर्ती आणि प्रतिमेच्या समोर योग्य त्या गांभीर्याने उपासना करताना, देवतेच्या अलौकिक-दैवी-पवित्र-अपूर्व उर्जेची अनुभूती दर्शकाला अनुभवता येते. मूर्ती-प्रतिमा आणि दर्शकाची उपासना याचा चिह्नसंकेत असा की ज्या विषयातील अभ्यासाठी विद्यार्थी वाग्देवीची उपासना म्हणजेच त्या विषयाची

ज्ञानसाधना करतो आहे, त्यात त्याला चित्त-वृत्ती केंद्रित करून निश्चित प्रगती करता येते.



**^** लहान मोठ्यांची उपासना मुद्रा

उपासक – साधक – श्रद्धाळूसाठी, मातृदेवतेची उपासना आणि आराधना करण्यासाठी आवश्यक ते दृश्य परिमाण मुर्ती आणि प्रतिमा या माध्यमातून आपल्या चतुर पूर्वजांनी उपलब्ध करून दिले. **पण मूलतः उपासना शास्त्र आणि उपासना पद्धतीला श्राव्य परिमाण जोडले गेल्यामुळे पूर्णत्व प्राप्त झाले.** आधीच्या लेखांत वर्णन केलेली मातृदेवतेची स्तुतिपर **श्री सूक्त – देवी सूक्त – वाक सूक्त आणि अशी अगणित स्तोत्र आणि सूक्त रचली गेली.** यातल्या तीन – चार पातळ्यांवर काम करणाऱ्या संस्कृत भाषेतील **देवी सूक्त** अर्थात **वाक सूक्ताचे** उदाहरण घेऊया.

**प्रथम उद्देश** - अत्यंत प्रगत संस्कृत भाषा. **दुसरा उद्देश** - देवीची स्तुति करणे, तिच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करणे. **तिसरा उद्देश** - आपल्या वाणीचे महत्व, उच्चारांचे वैशिष्ट्य आणि त्याच्या पद्धती या विषयी उपासकाला मार्गदर्शन करणे. **चवथा आणि पाचवा उद्देश** - उत्तम गेयता असलेले हे सूक्त मुखोद्गत करतांना आपली वाचा शुद्ध आणि उच्चार स्वच्छ करणारे संस्कार आणि सरते शेवटी उत्तम स्मरणशक्तीची प्राप्ती.

यासर्व दृश्य - श्राव्य आणि वाचिक परिमाणांमुळे मातृदेवता आणि देवी देवता यांच्या उपासनेचे शास्त्र आणि पद्धती आपल्या प्राचीन संस्कृतीत प्रगल्भ आणि प्रगत झाल्या. आदिम काळापासून झालेले हे स्थित्यंतर विलक्षण सुंदर आणि परिणामकारक आहे आणि रहाणार आहे...!


**देवी महासरस्वती अर्थात देवी शारदेच्या शिल्प – मुर्ती – प्रतिमेचे हेच वैशिष्टय आहे. पुढील लेखांत या विषयाचा विस्तार केला जाईल...!**

--○○--

# आकड्यांची देवी सरस्वती

देवी सरस्वती बहुधा अशी एकच मातृदेवता आहे जिचा परिचय आपल्याला अगदी पहिल्या दुसऱ्या इयत्तेत, पाटीवर रेखाटलेल्या आकड्यांच्या चिह्नामुळे होतो. प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र – चिह्नं – चिह्नसंकेत या विषयाच्या अभ्यासात माझी उत्सुकता वाढली त्याचे कारण शाळेपासून स्मरणांत राहिलेले आकड्यांच्या देवी सरस्वतीचे चिह्नं आणि प्रतीक. देवी महालक्ष्मी आणि देवी महाकाली या देवी पार्वतीच्या दोन मातृदेवता रुपांपेक्षा, सत्वगुणधारिणी देवी सरस्वतीचे मोर आणि हंसासह दर्शन आणि शाळेतील तिची प्रार्थना हे लहानपणीच मनापासून आवडलेले अनुभव होते. नंतरच्या वाचनातील देवी सरस्वतीच्या मुर्ती आणि प्रतिमेतील अभ्यास अधिकच आनंददायी होता.

प्रतिकशास्त्र - रुपकशास्त्र - चिह्नसंस्कृतीचा अभ्यास हे सातत्याने बदललेल्या सामाजिक परिस्थितीच्या अभ्यासाचे उत्तम साधन आणि माध्यम आहे. प्राचीन भारतातील मूर्तिशास्त्र, मूर्तिकला या काही हजार वर्षांपासून खूप प्रगत झाल्या होत्या, त्याचा अनुभव आजही आपण घेऊ शकतो. विख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ कार्ल गुस्ताव युंग यांनी भारतीय देवतांच्या मूर्ती, प्रतिमा आणि भक्ती उपासना या संदर्भात फार सूक्ष्मपणे निरीक्षण आणि विश्लेषण नोंदवले आहे. त्यांच्या मते मुर्ती, प्रतिमा यांचा मानवाच्या मन, मानसिकता, मनोव्यापार यावर फार सखोल दीर्घकालीन परिणाम होत असतो याचा वेध प्राचीन भारतीय विद्वानांनी निदान तीन हजार वर्षांपूर्वीच निश्चितपणे घेतला आहे.



< आकड्यांची देवी सरस्वती

**आता या सगळ्या पार्श्वभूमीवर प्राचीन भारतीय शील्प-मूर्ती-चित्र यांचे खास महत्व असे की या सगळ्या गोष्टी म्हणजे पाठ्यपुस्तके होती...!!..**समोरच्या प्रतिमेची पूजा आपण  करत असतो हे खरेच मात्र ही त्या चित्राची पूजा नाही, त्या मूर्तीत दिसत असलेल्या मूल्यांची आणि गुणवत्तेची ही पूजा आहे. योग्य साक्षरतेने ही मुल्ये आणि गुणवत्ता उपासकाला आत्मसात करता येतात. मराठी माध्यमात शिकलेल्या विद्यार्थ्यांना पाटीवर काढलेली आकड्यांची सरस्वती आणि दसऱ्याच्या दिवशी तिची केलेली पूजा नक्कीच आठवत असेल. **ज्ञानप्राप्तीसाठी अभ्यास करतांना चित्त आणि वृत्ती म्हणेच आपले मन आणि बुद्धी केंद्रित करायला शिकवणारी ही सत्व गुणधारिणी देवी सरस्वती, आपली शिक्षिका स्वरूप मातृदेवता आहे.**

जपान – इंडनेशिया – मलेशिया – थायलंड या पौर्वात्य देशांत, आणि उत्तरेकडील आत्ताचा पाकिस्तान – अफगाणिस्तान – बलुचिस्तान इथपर्यंत, गुप्तकाळापासून म्हणजे साधारण ख्रिस्तपश्चात तिसऱ्या शतकापासून, **श्री गणेश – देवी  सरस्वती – श्री विष्णु – देवी लक्ष्मी – श्री राम – सीता – बुद्ध** या देवतांच्या मुर्ती आणि त्यांची मंदिरे स्थापित आहेत. त्या त्या देशांतील नागरिकांना, आपली प्राचीन संस्कृति म्हणून त्यांचा सार्थ अभिमान आहे. आपल्या लेखमालेच्या विषयातील मातृदेवता स्वरूपातील स्त्री देवतांच्या मुर्ती ही या पौर्वात्य देशांची

स्थानिक  संस्कृति आहे. आपल्या विद्वान पूर्वजांनी आपले ज्ञानप्रसाराचे प्रयत्न करतांना प्रथम या सुंदर मुर्ती त्या त्या प्रदेशात स्थापित केल्या. **भाषा भिन्नते मुळे आपले विचार आणि तत्वज्ञान याचा प्रचार आणि प्रसार या मूर्तिरूपातील पुस्तकांच्या माध्यमातून केला गेला असावा.** मूर्तिविधानाची भाषा त्या मूर्तितील प्रतीके – रुपके – चिह्न याच लिपीत लिहिली होती. म्हणूनच प्रत्येक मुर्ती एक पुस्तक मानले गेले होते. माझ्या या अभ्यासात मला गुरुस्थानी असलेले श्री आनंद के कुमारस्वामी म्हणतात **सतराव्या शतकाअखेरपर्यंत सर्व संस्कृतीतील मानव, प्रतीके – रूपके – चिह्नं याची लिपि आणि भाषा जाणून होता. अठराव्या शतकांत सुरू झालेल्या औद्योगिक प्रगती नंतर आपण ही भाषा विसरलो.**

अमेरिकेची राजधानी वॉशिंगटन डीसी या शहरातल्या मॅसेच्युसेटस् अव्हेन्यू या विशाल मार्गावर बहुतेक देशांच्या एम्बसी वसलेल्या आहेत. इंडोनेशियन एम्बसीच्या समोरच देवी सरस्वतीची पांढऱ्या संगमरवरातील सोळा फुट ऊंच मुर्ती नागरिकांचे लक्ष वेधून घेते. **ही आमची विद्या आणि बुद्धीची देवता आहे म्हणून अभिमानाने मुस्लिम बहुल इंडोनेशियन सरकारने ही मुर्ती अमेरिकन नागरिकांना भेट म्हणून दिली आहे.**





^ देवी सरस्वती - इंडोनेशियन एम्बसी – वॉशिंगटन डीसी – अमेरिका

देवी – देवतांच्या चतुर्भुज शरीरमुद्रेसंदर्भात, भारतीय मूर्तिशास्त्र एक सल्ला निश्चितपणे देते. मूर्ती कोणाची आहे, त्या देवी – देवतेची व्यष्टी वैशिष्ट्य काय आहेत, तिची उपासना कशासाठी केली जाते आहे, मूर्तीची स्थापना कुठे केली आहे, तिची शरीरमुद्रा कशी आहे, मूर्तीचे मुखदर्शन कुठल्या दिशेने आहे अशा अनेक गोष्टींचा संदर्भ घेऊनच, मूर्तीच्या हातांच्या चिह्नार्थ संकेतांचे विश्लेषण केले जाते. यातील प्रत्येक प्रतिमेत वेगळी आयुधे असल्यामुळे मूर्तीसापेक्ष अभ्यासाची इथे आवश्यकता असते. मूर्तीच्या अशा वैशिष्ट्यांमुळे मुर्तींना वेगवेगळी संबोधने प्राचीन भारतीय मूर्तिशास्त्रामधे दिली गेली. योगमूर्ती – भोगमुर्ती – वीरमुर्ती – उग्रमुर्ती – अभिसारिकामुर्ती अशी मूर्तिच्या व्यक्तिमत्वानुसार दिलेली संबोधने. **देवी सरस्वतीची मातृदेवता आणि शिक्षिका या संकल्पनेतील व्यक्तिमत्वाला इतके आयाम आहेत की त्याची नोंद विस्ताराने घेणे आवश्यक आहे.** पुढील लेखांत आकड्यांच्या सरस्वतीचा परिचय होईलच.



< देवी सरस्वती संयुक्त प्रतिमा

इतके विविध भावदर्शन आणि शरीरमुद्रा असणाऱ्या मूर्तींचे चार हात निश्चितपणे खूप भिन्न चिह्नसंकेत देत असतात. **ब्रह्मदेवापासून निर्माण झालेली ब्रम्हदेवाची सहचारिणीदेवी सरस्वती,** पृथ्वीवरील सजीव+निर्जीव+वनस्पती+खनिजे यांचे

वास्तव जीवन संतुलित ठेवणाऱ्या चार शक्तींचा संकेत तिच्या चार हातामधून देत असते. पहिल्या हातात सर्व सृष्टीचा निर्माता ब्रम्हाचा संकेत, दुसऱ्या हातांत पालनकर्त्या ईश्वराचा संकेत. तिसऱ्या हातात, प्रत्येक सजीवाला जन्मत: प्राप्त होणाऱ्या, या पृथ्वीलोकात जगण्यासाठी आवश्यक अशी मुलतत्व निसर्गत: आपल्याला देणाऱ्या हिरण्यगर्भाचा म्हणे सूर्याचा संकेत. प्रकाशाचे ज्ञान हे विज्ञानरूप असून, प्रत्येक सजीवाला निसर्गतःच प्राप्त होणारे ज्ञानस्वरूप आहे (जन्मदात्या पालकांकडून मिळणारा **DNA**). देवीचा चवथा हात आपल्या पृथ्वीच्या पलीकडच्या विराट विश्वाच्या अस्तित्वाचा परिचय करून देतो. देवीच्या मूर्तीत चार हातांच्या संकेतातून, सजीवाला समजेल असा या अफाट विश्वाचा परिचय, आपल्या विद्वान पूर्वजांनी काही सहस्त्र वर्षांपूर्वी आपल्याला करून दिला.

उपनिषदांमधे देवी सरस्वतीच्या चार हातांचे अन्य संकेतही उपलब्ध आहेत. **जागृतावस्था – स्वप्नावस्था – सुशूप्तवस्था – तुर्यावस्था** अशा सजीवांच्या जीवन – ज्ञान – वास्तव अशा जागृतीच्या चार अवस्था, असे या चार हातांचे संकेत आहेत. सजीवांच्या चार प्रवृत्ती किंवा मनोधारणा, **सत्य – तप – दया – दान**, असेही या चार हातांचे चार संकेत आहेत. हेच चार हात, **मैत्री – करूणा – मुदिता (हर्ष – आनंद) – उपेक्षा (तिरस्कार – अवहेलना)** अशा चार महत्वाच्या मनोभावनांचे संकेत देत आहेत. सर्वांच्या परिचित पुरुषार्थांचे, **अर्थ – काम – धर्म – मोक्ष** या कुटुंबवत्सल गृहस्थाची आणि गृहिणीची चार कर्तव्ये म्हणजे हेच चार हात, असाही संकेत उपलब्ध आहे. **प्रतीके, रुपके, चिह्नं, चिह्नसंकेत, चिह्नार्थ विषयातील आपल्या पूर्वजांचा अचंबित करणारा प्रगल्भ अभ्यास, असाच आणि इतकाच या सर्व वर्णनाचा अंतिम निष्कर्ष काढायला हवा...!!**



< देवी सरस्वतीची द्विभुज मूर्ती – बाली, इंडोनेशिया.

देवीचे चार हात, भौतिक जगातील तिच्या सर्वव्यापक उपस्थितीचे आणि **ज्ञान** या आभासी – काल्पनिक तरीही वास्तविक अशा वैश्विक संकल्पनेतील तिच्या सर्वशक्तिमान – सार्वभौमित्वाचे संकेत प्रतीक आहेत. वीणा धारण केलेले देवीचे पुढचे दोन हात तिच्या भौतिक – वास्तव जगातील अस्तित्वाचे संकेत देतात. देवीचे मागचे किंवा वरचे दोन हात...तर्कसंगत-आत्मिक-अध्यात्मिक-पारलौकिक अशा देवीच्या वैश्विक अस्तित्वाचा - ज्ञानाचा संकेत संदर्भ आहेत. देवीचे हे चार हात, प्रत्येक सजीवाच्या मूलतत्व किंवा मूळ घटकांची प्रतीके आहेत आणि यांचा सूक्ष्मार्थ खूप प्रगल्भ आहे. वीणा धारण करणारा पुढचा उजवा हात हे सजीवांच्या मनाचे (मानस) प्रतिक आहे आणि हा हात प्रत्येक सजीवाच्या मन आणि बुद्धी या दोन्हीच्या क्रियाशील सातत्याचे संकेत देतो. वीणा धारण करणारा तिचा पुढचा डावा हात सजीवांच्या बुद्धिमत्तेचे प्रतिक आहे आणि हा हात तिच्या सहृदयतेचे आणि सजीवसृष्टीतील प्राणीमात्रांवरील असलेल्या तिच्या प्रेमाचे संकेत देतो.

प्रत्येकाच्या वैयक्तीक – कौटुंबिक – सामाजिक व्यवहारामधे सुसंगती असावी हि आपल्या सर्वांची स्वाभाविक अपेक्षा आहे. मन आणि बुद्धीला म्हणजे...स्वामी विवेकानंदांनी सांगितलेल्या चित्त आणि वृत्तीनां एका तालात-एका लयीत येण्यासाठी,

प्राप्त झालेल्या विद्या-ज्ञान-कला यांचा उपयोग मुक्तहस्ते करण्याचा संकेत देवीच्या हातातील वीणा सतत देत असते.

ओंजळीत पुस्तक घेतलेला देवीचा वरचा डावा हात, प्रत्येक सजीवाच्या – विशेषकरून मानवाच्या संस्कारक्षम आणि संस्कारित चेतना अथवा चित्त संवेदनेचे प्रतिक आहे. प्राप्त झालेले ज्ञान, प्रेम-कारुण्य आणि वत्सल भावनेने सर्व सजीवांच्या भौतिक आणि आत्मिक प्रगतीसाठी वापरावे असा संकेत, देवीच्या वरच्या डाव्या हातातील ओंजळीत धरलेले पुस्तक सूचीत करत असते.

अंगठा आणि चाफेकळी या दोन बोटांत धरलेली जपमाळ धारण केलेला देवीचा वरचा उजवा हात हे प्रत्येक सजीवाच्या अहंकाराचे आणि अस्तित्वाचे **(म्हणजे English Ego नव्हे)** प्रतिक मानले गेले. ज्ञानसाधनेसाठी मानवसृष्टीला आवश्यक अशी एकाग्रता, चिंतन-मनन आणि ध्यानमग्न वृत्तीचे संकेत देवीच्या जपमाळ घेतलेल्या वरच्या उजव्या हातातून प्रसारित होतात. प्रत्येक सजीवाने, श्रद्धेने आणि समर्पित भावनेने मिळवलेले सत्य, योग्य आणि वास्तव ज्ञान, स्वतःचा अहंकार विसर्जित करून त्याला अंतिम मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवते असा अचंबित करणारा सूक्ष्मसंकेत देवीच्या हातातील जपमाळ देत असते.

देवीच्या सन्निध असलेल्या सजीव आणि निर्जीव आयुधे यांचा विस्तारीत परिचय पुढील लेखात अवश्य वाचावा…!

--००--

# देवी सरस्वती संयुक्त प्रतिमा

संस्कृत व्याकरणात **सरस्वती** हा शब्द ‘बहुविकल्पी’ म्हणजेच अनेक अर्थ असलेला शब्द म्हणून ओळखला जातो. मूळ संस्कृत ‘सृ’ या धातूपासून या शब्दाची व्युत्पत्ती झाली आहे. ‘सृ’ म्हणजे वाहणे – हलणे असा गतिमानतेचा संकेत **सरस्वती** या शब्दांत दिला जातो. **लुप्त झालेली सरस्वती नदी, जिचा विग्रह स्वरूप स्थूलदेह प्रतिमा म्हणून देवी सरस्वतीचा उल्लेख केला जातो.** काही शतकांपूर्वी नदीच्या उगमस्थान प्रदेशात (आज पाकिस्तानातील) प्रचलित आणि उपलब्ध असलेल्या सरस्वतीच्या एका प्रतिमेत देवीच्या डाव्या हातात पाण्याचा कलश तिने धारण केला आहे आणि उजव्या हातात पुस्तक आहे. समृद्धी, औदार्य, निर्मितीक्षम जमिनीची सुपीकता, पाण्याची निर्मलता, पावित्र्य आणि रोगप्रतिकारक गुणवत्ता यासर्व वैशिष्ट्यासाठी ही नदी लोकमानसात परिचित होती. याच समृद्ध भूमीत, सरस्वती नदीच्या काठावर वेदांची निर्मिती झाली. म्हणूनच प्राचीन साहित्यात तिला **वेदगर्भा** असेही संबोधित केले गेले. (चित्र क्र २)



**<** चित्र क्र १ देवी महासरस्वती

**तामस गुण धारिणी देवी महाकाली रक्षणकरती मातृदेवता आहे – राजस गुण धारिणी देवी महालक्ष्मी**

**पालनकरती मातृदेवता आहे तर सत्व गुण धारिणी मातृदेवता देवी महासरस्वती शिक्षिकेच्या भूमिकेत आहे. प्रसन्न – शांत – सौम्य – वत्सल मुद्रेतील, मोर आणि हंस सन्निध असलेली देवी सरस्वती, प्रत्येकाने शाळेतील मुर्ती अथवा चित्र प्रतिमेत नक्की पाहिलेली असते. (चित्र क्र १).**

प्राचीन संस्कृत साहित्यातील देवी सरस्वतीच्या यथार्थ वर्णनावरून तीला नदीदेवता – वाग्देवता – विद्यादेवता अशा तीन प्रमुख भूमिकांमधे सादर केले गेले. अशा लिखीत शब्दातील वर्णनावरून देवी-देवतांना मानवी रूपांत निर्माण करण्यासाठी शिल्पकार-चित्रकार आणि मूर्तिकारांनी जो अभ्यास-चिंतन-मनन केले असेल त्याला **मूर्तिविधान** असे सुंदर संबोधन वापरले गेले. आपल्या विद्वान पूर्वजांमुळेच, या मूर्तिविधानावर म्हणजेच चित्र-शिल्प-मुर्ती या सर्व भौतिक-वास्तव स्वरुपातील देवी-देवतांच्या प्रतिमांचा आपण निश्चित अभ्यास करू शकतो. अशी **मूर्तिविधाने** म्हणजे वैदिक संस्कृतीतून श्रेष्ठ-शास्त्रीय-निश्चित वैज्ञानिक असा हिंदूधर्म संस्कृतीकडे झालेल्या प्रवासाचा आलेख आहे. या बरोबरच, भटके जीवन सोडून, शेती व्यवसाय आणि समाजरचनेच्या प्राथमिक मांडणीची सुरुवात आहे.



< चित्र क्रमांक २. जलकलशधारी देवी सरस्वती.

नदीदेवता स्वरूप जलकलशधारी देवी सरस्वतीची प्रतिमा (चित्र क्रमांक २). या प्रतिमेतील पार्श्वभूमी बर्फाने आच्छादित पर्वतरांगेची आहे. देवीचे वस्त्र पिवळ्या रंगाचे आहे. वसंत ऋतूचे आगमन आणि देवी सरस्वतीची पूजा हे वसंत पंचमी या दिवसाचे महत्व. आजही देशभर, माघ महिन्यातील शुक्ल पंचमीच्या दिवशी वसंत पंचमी साजरी केली जाते. या दिवशी महिला पिवळ्या रंगाची वस्त्र-परिधान वापरतात, देवीला पिवळी फुले वहातात.

पारंपारिक भारतीय शिल्पकला अथवा चित्रशैली, धार्मिक विषयाची, श्रद्धा आणि भक्तीरसपूर्ण मांडणी करताना **intuitive** अर्थात अंत:प्रेरणेवर अथवा सहजज्ञान प्रवृत्तीवर आधारित असते. देवी सरस्वतीच्या विविध प्रतिमांमधे, देवी प्रत्यक्ष मोरावर अथवा हंसावर स्वार झालेली किंवा बसलेली आपण जरी पहात असलो तरी ती एक चित्रशैली आहे, ते चित्रकर्त्याने घेतलेले स्वातंत्र्य आहे हे वाचक आणि प्रेक्षकांनी समजून-जाणून घ्यायला हवे. याचे कारण असे की अशा सजीव पक्षी-प्राण्यांची अथवा निर्जीव वस्तूंची संयुक्त चित्रातील मांडणी, देवी-देवतांशी त्यांचे सानिध्य आणि सुसंगती सुचवत असते आणि अनेक चिह्नसंकेतांचा संदर्भ देत असते...!! आपण जसे सायकल वर अथवा घोड्यावर बसतो तशी देवी सरस्वती, या वाहनांवर बसत नाही.



< मोर



< हंस

देवी सरस्वतीच्या या प्रतिमेतील मयूर किंवा मोर या पक्षाच्या चिह्नसंकेतांचे संदर्भ विलक्षण आहेत. ज्ञान, कला आणि विद्येची देवता देवी सरस्वती ही संकल्पना आणि तिचे शिल्प अथवा चित्र ही जशी मूळ प्राचीन भारतातील वैदिक काळातील आहे तसाच हा मोर सुद्धा मूळ या भारतभूमीतला पक्षी आहे. सौंदर्य आणि बुद्धिमत्ता या नर मोराच्या व्यक्तिमत्वातील प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या बाह्य सौंदर्याविषयी नव्याने काही लिहिण्याची गरज नाही. मात्र या सौंदर्यामुळेच तो सजीवांच्या गर्वभावनेचे प्रतीक मानला गेला. अनेक राज्यकर्त्यांच्या अभिमानाचा मानदंड झाला म्हणून सामर्थ्यवान राजे मयूरासनावर बसतात. मोराच्या आजूबाजूला नेहमी खुप साऱ्या लांडोरी फिरत असतात. हे त्याचे बहुपत्नीत्वाचे लक्षण आहे. या बरोबरच तो फार चंचल स्वभावाचा आहे. हिरवळीवर दाणे टिपणाऱ्या मोराचे चंचल विभ्रम आपण अनेकदा पहिले असतीलच.

त्याची तल्लख बुद्धी आणि जागरूकता अशी की जंगलातील उंच झाडावर बसलेल्या मोराला एखादा शिकारी प्राणी भक्ष शोधण्यासाठी झुडुपातून बाहेर पडलेला दिसला की सावधगिरीचा पहिला इशारा मोर देतो. तो रहातो त्या वातावरणात थोडासा जरी बदल झाला तरी या मोराच्या वागणुकीत पटकन फरक होतो कारण तो संवेदनशील असूनही फार संशयी वृत्तीचा आहे.



< श्वेतपद्म

या मोराचे आणि हंसाचे देवी सरस्वतीशी असलेले सानिध्य याची मूळ संकल्पना, हे फारच विलक्षण चिह्नसंकेत आहेत. मोराचे पहिले नैसर्गिक वैशिष्ट्य त्याचे बहुपत्नीत्व आणि दुसरे वैशिष्ट्य दाणे टिपताना दिसणारी त्याची चंचल वृत्ती. देवी सरस्वती या मोराला आपल्या जवळ घेऊन दर्शकाला आणि उपासकाला सांगते की अभ्यास करताना याच्यासारखे चंचल होऊ नका, एकाच अभ्यासवर तुमचे लक्ष केंद्रित करा. मोर अनेक लांडोरींना बाळगतो त्याप्रमाणे एकदा निवडलेल्या तुमच्या ज्ञानशाखा बदलू नका. मोर निसर्गतः संशयी वृत्तीचा आहे. देवी सरस्वती आपल्याला सांगते की तुमचा संशय, तुमच्या अभ्यासाप्रती जिज्ञासा, उत्सुकता आणि उत्कंठे मधे परावर्तीत करा. मोरासारखे गर्विष्ठ होऊ नका, ज्ञानसाधना करताना विद्यार्थ्याने नम्र असावे आणि तरच तुम्हाला तुमचे चित्त (मन), तुमच्या वृत्तीबरोबर (बुद्धी बरोबर) एकरूप करता येईल.

देवी सरस्वतीचे दुसरे वाहन मानला गेलेला पक्षी हंस याचे व्यक्तिमत्व असेच विलक्षण प्रभावी आणि मोराच्या अगदी विरुद्ध आहे. मोर विविध रंगी आहे तर देवी सरस्वतीच्या शुभ्र वस्त्राशी स्पर्धा करणारा हंसाचा शुभ्र रंग हे त्याचे प्रथम वैशिष्ट्य आहे. मोरासारखीच बाकदार आणि लवचिक मान आणि शुभ्र वर्ण यामुळे देवी सरस्वतीचा हंस सुद्धा तितकाच सुंदर दिसतो. पाण्यात आणि जमिनीवर, दोन्हीकडे हंस तितक्याच डौलाने वावरताना दिसतो. केवड्याच्या पानाला हलक्या काटेरी कडा असतात, अगदी तशाच हलक्याशा दातेरी कडा हंसाला चोचीच्या आतल्या वरच्या - खालच्या बाजूला असतात. चोचीच्या अशा नैसर्गिक अंतर्गत रचनेमुळे तो अर्धी मान पाण्याखाली घालून पाणवनस्पतीची मुळे, कंद, देठ, तंतू असे खाद्य चोचीने पाण्यातून ओढून बाहेर काढून खाऊ शकतो.

हंसाच्या या चोचीचे दुसरे वैशिष्ट्य असे की पाण्याखालच्या कमळाच्या देठाला छेद करून त्या पाण्याने भरलेल्या देठातील पांढऱ्या रंगाचे एक प्रकारचे तंतू, ज्याला **मृणाल** असे सुंदर संबोधन आहे, किंवा दुधी रंगाचा चीक, तो सहजपणे पाण्यातून वेगळे काढून खाऊ शकतो. (प्रत्यक्षात आपली पिसे पांढरी शुभ्र ठेवण्यासाठी त्याला आवश्यक असे हे कॅल्शियम आहे). आपल्या अभ्यासू, विद्वान आणि चतूर पूर्वजांनी, या देठातील पांढरे तंतू पाण्यापासून वेगळे काढण्याच्या हंसाच्या खास नैसर्गिक गुणवत्तेला, **नीर-क्षीर विवेकाचे** प्रतीक (पाण्यातून दूध वेगळे करण्याची क्षमता) मानून जणू त्याचा सन्मान केला...!!..हंस कुळातील या पक्षांचे तिसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यातिल नर हंसाचे एकपत्नीत्व. तरुण वयात जमलेली हंसाची नर-मादीची जोडी, सहसा मृत्युपर्यंत अविभक्त रहाते.

हंसाला सन्निध घेऊन देवी सरस्वती विद्यार्थ्याला सांगते की हंसाच्या नीरक्षीर विवेकाप्रमाणे तुमची ज्ञानशाखा काळजी पूर्वक निवडा. तुमच्या निवडलेल्या ज्ञानशाखेशी तुम्ही हंसासारखे एकनिष्ठ रहा, मोरासारखे चंचल राहू नका. हंसाच्या पांढऱ्याशुभ्र कांतीसारखे तुमचे ज्ञान पवित्र, शुद्ध, स्वछ आणि योग्य मार्गाने प्राप्त केलेले असावे.

कमळाचे फूल आणि देवी सरस्वतीचे पद्मासन हा या संयुक्त प्रतिमेतील महत्वाचा दुवा. जसा मोर या भारतभूमितला पक्षी तसेच कमळाचे फूल सुद्धा या भारतभूमीतलेच. या कमळाच्या फुलाचे चिह्नसंकेत असेच फार अर्थवाही आहेत. प्राचीन भारतीय साहित्य आणि संस्कृतीमधे या कमळाच्या फुलाला फार महत्वाचे मंगलचिह्न मानले गेले. गोड्या पाण्याच्या तळ्यातल्या तीन-चार हात खाली दडलेल्या चिखलातून नैसर्गिक बीजारोपण आणि बीजधारणा होऊन या कमळाचा जन्म होतो. गावातल्या तळ्यात छत्राकृती दोन पानाच्या मधे उगवलेले, पांढऱ्या किंवा गुलाबी

रंगाचे कमळाचे फूल फार सुंदर दिसते. हेच ते देवी सरस्वतीचे आसन…आठ पाकळ्या असलेले शुभ्रकमलासन अर्थात शाळेत मुखोद्गत केलेल्या श्लोकातील **श्वेतपद्मासन**…!!..

पांढरा रंग हे सामन्यत: ज्ञान, विचार-आचार यांचे पावित्र्य, उच्च नीतिमत्ता, शुचिता, निर्मळता, शुद्धता, निष्कपट निरागसता या सर्व मानवी भावना-धारणा-गुणवत्तांचे प्रतीक मानले जाते. पांढऱ्या रंगाच्या संदर्भातली ही संकल्पना वैश्विक आहे. भारतासह जगभरातील अन्य सर्व संस्कृतींमधे स्वीकृत आहे. हंस पक्षाचा पांढरा रंग, देवीचे श्वेतपद्मासन अर्थात पांढरे कमळ आसन आणि देवीचे शुभ्र वस्त्र अर्थात तिची पंढरी साडी या तिन्ही मधे साधर्म्य आहे. अज्ञानरूपी चिखलातून उगवलेले आणि पाण्यावर सहज तरंगणारे शुभ्र कमळ फुल, त्यावर विराजमान संपूर्ण ज्ञानाची देवता, देवी सरस्वती, हे तिचे स्थान निसंशय या भौतिक जगात सर्वश्रेष्ठ आहे.



< देवी सरस्वती – उभी शरीरमुद्रा

कमळ हे उगवलेल्या तेजस्वी सूर्याचे आणि संपूर्ण ज्ञानाचे रूपक आहे. याच संकल्पनेतून भारतीय संस्कृतीतिल प्रत्येक देवी – देवता नेहेमीच कमलासनावर आरूढ झालेल्या दिसतात. अज्ञानरूपी चिखलातून वर येऊन...ज्ञानाच्या प्रकाशाची दिशा दाखवणारे श्वेतपद्म...या कमळाच्या चिह्नसंकेत वैशिष्ट्यामुळेच ...विद्या, कला आणि ज्ञानाची देवी सरस्वती या शुभ्रकमळावर आसनस्थ झाली आहे...!! संयुक्त प्रतिमेतील मोर, हंस आणि कमळ या चिह्नांची स्वाभाविक नैसर्गिक व्यष्टि (फक्त त्यांची) वैशिष्ट्ये आणि देवीबरोबर त्यांचे सानिध्य आणि सुसंगती याचे चिह्नसंकेत आणि चिह्नार्थ याचा परिचय फारच रंजक आहे...!!..

मोर आणि हंस या दोन्ही पक्षांची गुणवत्ता आणि स्वभाव वैशिष्ट्ये, स्वतंत्र अभ्यासात एक दृष्टांत देतात आणि देवी सरस्वतीच्या संयुक्त प्रतिमेतील त्यांचा चिह्नसंकेत संदर्भ खूपच वेगळा असतो. अशी ही संपूर्ण विज्ञाननिष्ठ भारतीय चिह्नसंस्कृती, त्याचे समृद्ध  चिह्नसंकेत आणि सूक्ष्म-गूढ तरीही संपूर्ण प्रतीके – रुपके आणि चिह्नार्थ...!!

पुढील लेखांत देवी सरस्वतीच्या शरीरमुद्रा - हस्तमुद्रा - आयुधे - जैन धर्मप्रणाली - जैन साहित्य यातील वाग्देवी यांचा परिचय करून घेऊया...!

--○○--

# जैन सरस्वती

देवी-देवतांच्या मूर्ती आणि शिल्प हे नेहमीच परंपरांची प्रतीके असतात आणि परंपरा अशाच निर्माण होत नसतात. त्यांच्या मागे अनेक पिढ्यांचे, सामाजिक आणि वैयक्तिक जीवनशैलीचे निश्चित अनुभव असतात. असे निश्चित अनुभव सर्जनशील शिल्पकार आणि चित्रकारांच्या अद्भुत कालाविष्कारातून मूर्त स्वरूप धारण करतात. समाजाची अनेक पिढ्यांची निश्चित जीवनशैली संस्कृतीचे रूप घेते. अशी जीवनशैली आणि संस्कृतीची अभिव्यक्ती, शिल्प-चित्र-मूर्ती या वास्तव माध्यमातून व्यक्त होते. नवव्या-दहाव्या शतकांत राजा भोज यांची मावळ प्रांतातील चंद्रनगरी धारा (आजचे धार शहर) हे दिगंबर जैन धर्मियांचे प्रमुख उपासना केंद्र होते. म्हणूनच राजा भोज परमार याने अनेक जैन मंदिरे आणि उपासना केंद्रांची निर्मिती केली होती. राजा भोज याच्या धारा नगरीतील भोजशाला या मोठ्या जैन धर्म संकुलात, सूत्रधार हिरसुत मणथल याने जैन शिल्पशैली माध्यमात वाग्देवीची अद्भुत शिल्प निर्माण केली.

जैन धर्म प्रणालीमधे श्री गणेश आणि देवी सरस्वती दोन आराध्य दैवते लोकमानसात आणि लोकसाहित्यात श्रद्धास्थाने आहेत. जैन साहित्यामधे देवी सरस्वतीच्या प्रतिमेचे विवेचन खूप विस्ताराने केले गेले. **द्वादशांगवाणी, जिनवाणी, जयदु सुद देवदा, वाग्देवी** किंवा **श्रुतदेवी** आणि **जैन सरस्वती** अशा संबोधनाने अनेक विद्वान जैन साधकांनी, संस्कृत, ब्राम्ही, पाली अशा प्राचीन भारतीय भाषांमधे अनेक शतकांपासून असे देवी सरस्वतीस्तुती संदर्भातील साहित्य निर्माण केले आहे.





^ जैन सरस्वती विग्रह प्रतिमा - मेल सिथामुर मंदिर – तामिळनाडू


जैनमुनी आचार्य नेमिचंद्र सिद्धांतचक्रवर्ती हे ख्रिस्तपश्चात नवव्या शतकातील विद्वान जैन साधक होते. त्यांनी रचलेला **द्रव्यसंग्रह** हा ग्रंथ जैन धर्मबांधवांचा पवित्र ग्रंथ आहे. यांनी देवीच्या **श्रुतदेवी** या विग्रह मूर्तीचे आणि त्यातिल अलंकार, आयुधे आणि रुपके यांचे फार विस्ताराने वर्णन केले आहे. आज अस्तंगत झालेल्या ब्राम्ही-पाली अशा भाषांतील ही स्तुतीवचने आणि रूपके समजायला काहीशी क्लिष्ट असू शकतात. देवीच्या कपाळावरील कुंकवाचे वर्णन **सम्यग्दर्शनचा सौभाग्य तिलक** असे तर वस्त्र-परीधानाचे वर्णन **सम्यव्चारित्र आदि रत्नत्रय रूपी वस्त्र** धारण केलेली देवी असे केले आहे. **सम्यग्दर्शन** आणि **सम्यव्चारित्र** या दोन प्रणाली, जैन धर्म संकल्पनेतील सर्वोत्तम-सर्वोच्च नितीमत्तादर्शक तत्व सिद्धांत आहेत. जैन धर्म संकल्पनेतील अन्य तत्व सिद्धांताची रूपके श्रुतदेवीच्या सर्वांगाचे वर्णन करताना आचार्य नेमिचंद्र यांनी वापरली आहेत. देवीचे आचारांग मस्तक, सूत्रकृतांग मुख मण्डल, स्थानांग सुन्दर कण्ठ, समवायां आणि व्याख्या प्रज्ञप्ति अशा रूपकाचे दोन सुन्दर हात, ज्ञातृकथांग तथा उपासकाध्ययनांग अशाने अलंकृत दोन स्तन युगुलं, अंत:कृतदशांग आणि अनुत्तरोपपादिकांग अशा रुपकांनी अलंकृत सुन्दर

नाभिकमल, प्रश्नव्याकरणांग यांनी अलंकृत दोन सुन्दर नितम्ब आणि जांघ, दृष्टिवाद तत्व सिद्धांताने तिचे दोन्ही पाय अलंकृत आहेत. भगवान जिनेन्द्रांची ती साक्षात वाणी आहे अशी देवी सरस्वतीची सुंदर स्तुती जैन धर्म संकल्पना साहित्यात केली गेली आहे. **दहा बारा शतकांपूर्वीच्या या काळातील अध्ययन-अध्यापन-आवर्तन-ज्ञानोपासना-कलोपासना अशी विद्यावर्धिनी संस्कृती कळसाला गेली होती याचाच परिणाम उत्तम शिल्प-चित्र-मूर्तिकला संवर्धनात झाला असावा.**

बहुविध संबोधनांनी अलंकृत देवी सरस्वती, चवथ्या – पाचव्या शतकापासून जैन धर्म साहित्यात फार महत्वाची देवता मानली गेली. देवीची शिल्पे-चित्रप्रतिमा-मूर्ती या बरोबरच देवीची उपासना-आराधना-प्रार्थना-पूजा विधीच्या अनेक संकल्पना, आरत्या, स्तोत्र, मंत्र, सरस्वती चालीसा असे उत्तम साहित्य, संस्कृतसह, ब्राम्ही-पाली-अर्धमागधी-हिंदी अशा तत्कालीन भाषातून विपुलतेने उपलब्ध झाले. देवीच्या भक्तांसाठी सश्रद्ध प्रार्थना-आरत्या-गीते-स्तोत्र रचली गेली आणि विद्वान कवी आणि लेखकांनी देवीच्या स्तुतीकवनांच्या माध्यमातून तिचा महिमा सांगणाऱ्या रचना सर्व तत्कालीन भाषांमधे लिहिल्या.


देवीच्या संयुक्त प्रतिमेत अंकित केलेल्या अन्य सजीव-निर्जीव वस्तूंचे चिह्नसंकेत आणि सूक्ष्म चिह्नार्थ याची साक्षरता निरक्षर श्रद्धाळूला समजावी म्हणून या आरत्या-गीते-स्तोत्र रचनांमधे, देवीच्या मूर्ती आणि सर्व विग्रह प्रतिमांमधे, देवीने धारण केलेल्या सर्व आयुधे-शस्त्र-चिह्ने-अवजारे यांचा संक्षिप्तरूपाने आणि विस्ताराने सुद्धा उल्लेख केला गेला. देवी महिमा आणि स्तुती रचनांच्या अशा भक्तीमार्गी **श्राव्य** माध्यमातून श्रद्धाळू समाजाला जैन सरस्वती आणि तिच्या सर्व विग्रहांचा योग्य परिचय शतकानुशतके होत राहिला.





^ जैन सरस्वती अरपक्कम - तामिळनाडू ^ जैन सरस्वती पेरुम्पुगयी - तामिळनाडू

जैन साहित्यातील अशाच स्तुतीपर रचनांतून २६ प्रतीके –रुपके–चिह्नं– चिह्न-संकेतांच्या देवी संदर्भातील रूपकमुल्यांचा परिचय होतो. डोक्यापासून पायापर्यंत शरीर अवयवांची व आयुधे-अलंकारांची संकेतमुल्य श्रध्दाळू भक्ताला ऐकता आली. **मात्र एका गोष्टीची जाणीव ठेवायला हवी की जैन साहित्यात आणि वेद-उपनिषदे साहित्यातून उपलब्ध होणारे चिह्नसंकेत आणि चिह्नार्थ, यांत खूप भिन्नता आहे.**







^ चंद्रनगरी धारा येथील भोजशाला वागदेवी विग्रह मुर्ती

हिंदू धर्मातील आराध्य प्रमुख देवी-देवतांच्या शिल्प - मूर्ती आणि प्रतिमांमधे त्यांच्या शरीरमुद्रा चतुर्भज आहेत. या चार हातांचे चिह्नसंकेत आणि चिह्नार्थ प्राचीन जैन साहित्यात आणि संस्कृत उपनिषदांमधे विस्ताराने लिहिलेले आहेत. जैन मुनी आचार्य समन्तभद्र यांच्या सरस्वती देवीच्या स्तुती प्रार्थनेमधे तिच्या चार हातांना **प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग, द्रव्यानुयोग** अशा चार अनुयोगांचे प्रतीक असा चिह्नार्थ संकेत दिला गेला आहे. हे चार अनुयोग म्हणजे जैनधर्म नीतिशास्त्रात वर्णन केल्यानुसार, प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक-कौटुंबिक-सामाजिक पातळीवरील योग्य आचरण आणि सुसंस्कृत-संतुलित जीवनशैलीचे मार्गदर्शन करणाऱ्या चार प्रमुख ज्ञानशाखा आहेत. **मात्र चिह्नार्थ संकेतांची वर उल्लेखित तुलना फक्त देवी सरस्वतीच्या प्रतिमेच्या संदर्भात आहे.**

भारतातील २२ अनुसूचित प्रादेशिक भाषांतील उत्तम साहित्य निर्मितीसाठी, भारतीय ज्ञानपीठ न्यासाद्वारे, ज्ञानपीठ पुरस्कार दिला जातो. अकरा लाख रुपये, मानपत्र आणि **देवी वाग्देवीची प्रतिमा** असे या सर्वोच्च साहित्य पुरस्काराचे स्वरूप आहे. यातील वाग्देवीची ब्रॉंझ धातूतील सुंदर प्रतिमा, मावळ प्रांतातील धार या शहरातील देवी सरस्वती मंदिरातील मूर्तीची प्रतिकृती आहे. ज्ञानपीठ पुरस्कारातील मूर्ती ही मूळ मूर्तिची विग्रह प्रतिमा आहे. महाराजा भोज यांनी इसवीसन १०३५ मधे या मंदिराची निर्मिती केली. मूळ मुर्ती भुऱ्या रंगाच्या स्पटिकापासून बनवलेली असून १९०२ मधे ब्रिटिश अधिकारी मेजर किंकेड याने ही मूर्ती लंडनला नेली, आज ही मूर्ती लंडनच्या वस्तुसंग्रहालयात आहे. शांत - ध्यानस्थ मुद्रेतील ही मुर्ती जगातील काही सुंदर मूर्तिमधील एक आहे असे मानले जाते. देवीच्या पुढल्या उजव्या हातात कमळाचे फुल, पुढच्या डाव्या हातात तिने कमंडलू धारण केला आहे. मागील उजव्या हातात जपमाळ म्हणजेच अक्षमाळ आणि मागील डाव्या हातात पुस्तक धारण केले आहे. ही चार चिह्नं, अध्यात्मिक अनुभूती देतात अशी लोकश्रद्धा आहे. वाग्देवीच्या

मूर्तितील ही चार चिह्नं म्हणजे देवी सरस्वतीच्या मूळ चतुर्भुज प्रतिमेचा विस्तारित विग्रह (**extended form**) आहे. (चित्र क्र २).

जैन धर्म साहित्यात, या कमंडलूला फार छान रूपक मानले आहे. चार पुरुषार्थ – काम - अर्थ – धर्म – मोक्ष या पैकी अर्थ – अर्थार्जन याचे अत्यंत व्यवहारी रूपक म्हणजे देवीच्या डाव्या हातातील कमंडलू. पाणी भरण्यासाठी कमंडलूचे तोंड मोठे असते...मात्र अर्घ्य देण्यासाठीचे तोंड लहान असते. तुमचा आय (उत्पन्न) जास्त-मोठा असावा मात्र तुमचा व्यय (खर्च) मात्र खूप मर्यादित असावा असे अगदी साधे आणि सोपे कमंडलूचे रूपक कुटुंबाच्या अर्थकारणासाठी यात सुचवले आहे. जैनमुनी आचार्य नेमिचंद्र यांनी याचे वर्णन फार विस्ताराने केले आहे.



< चित्र क्रमांक २ देवी वाग्देवी.

देवी सरस्वतीच्या पुढील दोन हातात अन्य प्रतिमांमधे नेहमी दिसते तशी वीणा या प्रतिमेत दिसत नाही. देवीच्या अनेक रूपांपैकी वाग्देवी रूपातील प्रतिमेचे हे खास वैशिष्ट्य आहे. देवीच्या पुढील डाव्या हातातील पाण्याने भरलेला कमंडलू, वाग्देवीचे

हे वेगळे रूप स्पष्ट करते. देवीची उभी शरीरमुद्रा हे या प्रतिमेचे दुसरे वैशिष्ट्य. भारतीय मूर्तिशास्त्रात या देवी-देवतांच्या उभ्या शरीरमुद्रेला विशेष चिह्नसंकेत आहे.

सामान्यतः दोन किंवा तीन प्रकारच्या मूर्ती किंवा प्रतिमा प्रचलित आहेत. हिंदू धर्मीयांच्या मंदिरे आणि देवळात स्थापित मूर्तिना **मूळ विग्रह** मुर्ती असे संबोधले जाते. अशा मुर्ती एका दगडातून कोरून घडवलेल्या असाव्या असा उल्लेख काही मूर्तिशास्त्रांच्या पुस्तकात केला गेला आहे. विधिपूर्वक प्रतिष्ठापना झाल्यानंतर या मूर्तिना कधीच हलवले जात नाही. देवळातील अशा प्रतिमांचा दैनंदिन पूजा विधी नियमित होणे आवश्यक असते. दुसऱ्या प्रकारच्या मुर्ती आणि प्रतिमांना **उत्सव विग्रह** मुर्ती असे संबोधले जाते. गणेशोत्सवातील श्री गणेशाच्या आणि नवरात्री उत्सवातील देवीच्या मुर्ती या प्रकारच्या असतात. पंचधातूपासून बनवलेल्या अशा मूर्तिची उत्सवकाळात विधीपूर्वक स्थापना झाल्यानंतर अशा उत्सव विग्रह मूर्तिमधे मूळ विग्रह मूर्तिची प्रेरणा आणि उर्जा प्रसारित होते अशी लोकश्रद्धा आहे. घरी पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या मूर्तिना प्रतिमा म्हटले जाते. देवघरातील अशा प्रतिमा धातूच्या असाव्या आणि किमान पांच ते सहा इंच उंचीच्या असाव्या (धातूच्या पातळ पत्र्यावर छापलेले देवतांचे ठसे: टांक या नावाने संबोधित) असा संकेत मूर्तिशास्त्राच्या अभ्यासात दिला गेला आहे.

अशा मूर्ती निर्माण करण्यासाठी शिल्पकारांसाठी काही निश्चित मार्गदर्शक सूत्रे फार प्राचीन साहित्यात लिहिली गेली मात्र काळाच्या ओघात ती विस्मृतीत गेली. त्याला शिल्पसूत्र असे संबोधन वापरले आहे. अशी शिल्पसूत्रे साधारणपणे **भूमिती-अंकगणित-खगोलशास्त्र-मानवी शरीरशास्त्र-मानसशास्त्र अशा आणि इतर निवडक ज्ञानशाखांच्या एकत्रित अभ्यासाने बनवली गेली.** नंतरच्या काळांत मंडनसूत्रधार या पंधराव्या शतकातील गुजराती - राजस्थानी स्थापत्यशास्त्र आणि

शिल्पशास्त्र पंडिताने **१.देवतामूर्तिप्रकरणं, २.प्रासादमंडन, ३.राजबल्लभ, ४.रूपमंडन, ५.वास्तुमंडन, ६.वास्तुशास्त्र, ७.वास्तुसार, ८.वास्तुमंजरी ९.आपतत्व** या नऊ संस्कृत ग्रंथात याचे विस्ताराने वर्णन आणि विश्लेषण केले आहे.

--००--


# व्यासांची देवी सरस्वती


देवी पार्वतीच्या तीन रूपांपैकी देवी महाकाली आणि देवी महालक्ष्मी यांनी काही अवतार घेतले आणि त्या त्या अवतारातील त्यांच्या व्यक्तिमत्व व्यष्टिनुसार त्यांच्या मुर्ती – चित्रांसह त्यांच्या निश्चित उपासना पद्धती – स्तोत्रे – व्रत – वैकल्ये निर्माण झाली. याला अनुरूप त्यांची मंदिरेही स्थापन झाली, त्या त्या मंदिरातील विग्रह मूर्तिंची आराधना – पूजा विधी सुरू झाले. मात्र देवी पार्वतीचे तिसरे रूप, देवी महासरस्वतीने कुठलेही अवतार घेतले नाहीत आणि तिची फार मंदिरेही बांधली गेली नाहीत. देवी सरस्वतीचे दुसरे वैशिष्ट्य असे की फक्त तिच्यासाठी, बालकेही चित्रांकीत करू शकतील, असे आकड्यांच्या सरस्वतीचे रुपक चिह्न साकार झाले.

देवी शारदा – देवी सरस्वतीचे तिसरे वैशिष्ट्य असे की फक्त तिच्या मूर्ति भारताबाहेरील अन्य प्रदेशांत पोहोचल्या आणि आज त्या त्या देशांच्या संस्कृतीचा भाग झाल्या. खऱ्या अर्थाने ती वैश्विक देवता झाली. तिचे अन्य वैशिष्ट्य असे की सर्व संतांनी, विशेषतः महाराष्ट्रातील संतपरंपरेतील संतांनी, त्यांच्या भक्तिमार्गी दीर्घ काव्य रचनांच्या सुरुवातीला, या ज्ञानरुपिणी शारदेला - विद्या आणि वाग्देवतेला प्रथम वंदन केले आहे.

**या कुन्देन्दुतुष्घरहारधवला या शुभ्रवस्त्रावृता।**
**या वीणावरदण्डमण्डित करा या श्वेतपद्मासना।**
**या ब्रह्माच्युतशंकर: प्रभृतिभिर्दैवै: सदा वन्दिता।**
**सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेष जाडयापहा।।**

शाळा सुरू होतांना रोज म्हटल्या गेलेल्या या रचनेत तिच्या वैभवाचे, अलंकारांचे, तिच्या आवडीच्या वस्तूंचे, वाहनाचे असे कोणतेही वर्णन नाही. तिच्या आराधना पूजनाने, भक्तीने उपासक – साधकाच्या कोणत्या भौतिक कामनांची पूर्तता होईल अशीही अपेक्षा नाही. हे केवळ तिच्या शुभ्र, धवल तेजाचे शीतल, आल्हादक तसेच विश्वाचे पालन पोषण करणाऱ्या सौम्य शिक्षिका स्वरूपाचे वर्णन आहे. श्वेत वस्त्र व श्वेतकमलासन यांच्याद्वारे तिच्या शुध्द सत्त्वगुणयुक्त स्वरूपाचा उल्लेख यांत केला आहे. वस्तुत: वैश्विक ऊर्जेचा मूलस्रोत असणारी ही **देवी शारदा** म्हणजे कोणी अवतार घेणारी **व्यक्ती** नाही, तर केवळ **शक्ती** आहे. **मानवी मनाला अमूर्त शक्तीवर मन एकाग्र करणे, तशा शक्तीची उपासना, भक्ती, साधना करणे सहज शक्य होत नाही. ते सदैव आकारांकडे धाव घेते, म्हणूनच फक्त तिच्यासाठी, बालकेही रेखाटू शकतील असे आकड्यांच्या सरस्वतीचे रुपक चिह्न साकार झाले.**






देवी शारदा – देवी सरस्वतीच्या या रुपक चिह्नाचा अभ्यास, ही माझ्या प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र - चिह्नशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात होती. **मी प्रथम देवी शारदेला आणि मला गुरुस्थानी असलेले माननीय श्री आनंद के कुमारस्वामी यांना वंदन करतो.** माझ्या अभ्यासाचा हा विस्तार **speculative** म्हणजे तात्विक

अथवा सैद्धांतिक स्वरूपाचा आहे. अन्य अभ्यासकांच्या या विषयाच्या अभ्यासात वेगळे निष्कर्ष असू शकतात.




< मला गुरुस्थानी असलेले श्री आनंद के कुमारस्वामी (१८७७ -१९४७).

मानवाच्या चित्रकलेची सुरुवात टिम्ब अथवा बिंदुपासून झाली हे सर्वमान्य आहे. मध्यप्रदेशातील भोपाळ जवळ असलेल्या भीमबेटका या अश्मयुगातल्या पुरातन गुहांमध्ये असलेली चित्र, किमान तीस हजार वर्ष जुनी आहेत. त्या गुहांमध्ये टिम्बापासून रेषेपर्यन्त प्रगत झालेल्या चित्रकलेचे आलेख उपलब्ध आहेत. **रेषे नंतर प्राचीन मानवाने रेखटलेले सर्वात पहिले भूमितीय चिह्न म्हणजे समभुज त्रिकोण. यांच दोन त्रिकोणांना, निसर्गनिर्मित लिंगभेदाची प्रतीके – रुपके बनवले गेले.** △ शीर्ष वर असलेल्या सुलट त्रिकोणाला पुरुषतत्व म्हणजे शिवतत्वाचे रुपक मानले गेले. ▽ शीर्ष खालील बाजूला असलेल्या उलट त्रिकोणाचा स्त्रीतत्व म्हणजे शक्तितत्वाचे रुपक मानले गेले. शीर्ष खाली असलेल शक्तितत्वाचा त्रिकोण, ▽ भौतिक तत्व, उर्जा आणि चैतन्य, सहज बोध आणि अंतर्ज्ञान, शक्ती, जाणीवा आणि निर्मिती क्षमता अशा सर्व मानवी भावना-क्षमता-विचारांचे नियंत्रण करतो.



^ स्त्री - शक्तितत्वाचे प्रतीक चित्र क्र १



^ पुरुष – शिवतत्वाचे प्रतीक चित्र क्र २

प्राचीन भारतीय इतिहासाचे नामवंत संशोधक श्री नीलेश ओक यांच्या अभ्यासातून केलेल्या नोंदीनुसार, ऋग्वेदाच्या रचनेला चोवीस हजार वर्षांपूर्वीपासून सुरुवात झाली होती. रामायण चवदा हजार वर्षांपूर्वी तर महाभारत साडेसात हजार वर्षांपूर्वी घडले आहे. याचा अर्थ ही शक्तितत्व आणि शिवतत्व रुपके पंचवीस हजार वर्षांपूर्वी निर्माण झाली आहेत.

आता लक्षात घ्या की **चित्र क्र १** मधला त्रिकोण हे स्त्री तत्वाचे अर्थात शक्तितत्वाचे  प्रतीक आहे. ऋग्वेदातील सर्वात प्राचीन मंडलातील सूक्त, सरस्वती नदीचे भरभरून वर्णन करतात. जसे - **अम्बितमे नदीतमे देवितमे सरस्वति ॥२.४१.१६॥ सर्वोत्तम माता, सर्वोत्तम नदी, सर्वोत्तम देवी सरस्वती.! अशी तिची स्तुती आहे.** (संदर्भ सौजन्य डॉ नीलेश ओक मूळ इंग्लिश लेख - श्रीमती दीपाली पाटवदकर यांचे मराठी भाषांतर).

**वेदातील सरस्वती नदी ही वाणी, वाचा, शब्द, भाषा, संगीत, गायन, काव्य, वेद...अशा सर्व कला आणि विद्यांची देवता आहे.** तसेच ही नदी हिमालयापासून सिंधुसागरापर्यंत वाहते असेही वर्णन येते. आपल्या विद्वान प्राचीन पूर्वजांनी या शक्तितत्वाच्या त्रिकोणाला **रेषांचे – भूमितीय चिह्नांचे – संगीतातील स्वरांच्या**

**लिपीचे** लावण्य बहाल केले आणि तिच्या ऋग्वेदातील वर्णनाला सार्थ करणारे हे सुंदर प्रतीक निर्माण केले. थोड्याशा सरावाने हे चिह्न छोट्या मुलांनाही रेखाटता येते. आपल्या पूर्वजांची ही निर्मिती, आपल्याला अचंबित करते.

भारतामध्ये देवी शारदेची अगदी मोजकी दोन मंदिरे आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचे स्थान म्हणजे तेलंगणातील हैदराबादजवळचे, गोदावरी नदीच्या काठावरचे गांव बासर. (देवी शारदेचे दुसरे मंदिर, मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील पर्वतावरील मैहर या ठिकाणी आहे). महर्षी व्यासांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून ती येथे अवतीर्ण झाली म्हणून ही **'बासर'ची - व्यासांची - शारदा.** दक्षिणेतील अनेक पालक आपल्या मुलाच्या विद्याभ्यासाला प्रारंभ करताना, या देवी शारदेचे दर्शन घेऊन, तिच्या प्रसादाची पाटी-लेखणी मस्तकी लावून त्यांना कौतुकाने देतात.





^ बासरची देवी शारदा – देवी सरस्वती

बासर मंदिरातील सरस्वतीची ही मूर्ती अत्यंत सुंदर तर आहेच, पण तीची मुद्रा खूप काही व्यक्त करणारी आहे. विशेष म्हणजे त्यात परिपक्व, प्रौढ स्त्रीत्वापेक्षा एक

बाल्यभाव प्रतीत होतो. तिच्या मुखाची आणि डोळयांची गोलाई, तिची कलती मान अन् तिच्या मुखावरचे मुग्ध हास्य हे सगळे चार-सहा वर्षांच्या बालिकेचे, भातुकलीच्या खेळात रंगलेले रूप असावे तसे आहे. मात्र या हास्यात गमतीबरोबरच एक गूढताही आहे. कारण तिची ही भातुकली म्हणजे एखाद्या घरात, कोपऱ्यात मांडलेली चार बोळक्यांची भातुकली नाही, तर ती अनंत कोटी ब्रह्मांडांची भातुकली आहे. त्या भातुकलीचा खेळ मोठा रंगात आल्याचा तो गूढ तितकाच मुग्ध आनंद तिच्या मुखावर प्रतीत होतो आहे असे वाटते. **अलौकिक अमूर्त आणि तरीही भौतिक मूर्त, अशा ज्ञान आणि विद्या, या संकल्पनेची ही गूढता, हा तिच्या गूढ तरीही मुग्ध मुद्रेचा संकेत आहे.**

जगद्गुरू श्री आदी शंकराचार्यांनी आठव्या शतकांत स्थापन केलेल्या दक्षिणाम्नया श्री शृंगेरी मठातील श्री देवी शारदाम्बा अर्थात देवी सरस्वतीची सुंदर विग्रह प्रतिमा निरखून पाहिले तर देवीची ही संयुक्त प्रतिमा आहे असे लक्षात येईल. देवीच्या संयुक्त प्रतिमांचा उल्लेख करताना आपण तिच्या प्रतिमेतील मोर, हंस, कमळ आणि वीणा यांच्या चिह्नसंकेतांचा संदर्भ आपण मागच्या लेखांत पाहिला. या प्रतिमेत, देवी शारदाम्बेच्या हातांत वीणा धारण केलेली नाही, तिच्या सान्निध मोर आणि हंस नाही. देवीच्या पुढच्या डाव्या हातात पुस्तक, वरच्या डाव्या हातात कमंडलू, पुढचा उजवा हात आशीर्वाद स्वरूप वरदमुद्रेत आहे आणि **अक्षमाला धारण केलेल्या वरच्या उजव्या हातावर एक पोपट बसलेला आहे असे लक्षात येईल. हा पोपट, हे या संयुक्त प्रतिमेचे वैशिष्ठ्य आहे. फक्त शृंगेरी मठातील देवीची प्रतिमा अशा वैशिष्ट्याची आहे. याचे वर्णनाचे कथन करणारा एक संस्कृत श्लोक सुद्धा आहे.**

**तवकरकमलस्थां सफाटिकीमक्षमालां**
**नखकिरणविभिन्नां दाडिमीबीजबुद्धया**

**प्रतिकलमनुकर्षन् येन कीरो निषिद्धः**
**स भवतु ममभूत्यै वाणी ते मन्दहासः।**

प्राचीन हिंदूधर्म तत्वज्ञान आणि वेदांसह सर्व उपनिषदांमधे, चिह्नसंस्कृतीचा, चिह्नसंकेतांचा फार मोठा प्रभाव आहे हे या श्लोक आणि प्रतिमेत अनुभवता येते.




^ शृंगेरी मठातील देवी शारदाम्बा प्रतिमा आणि मुर्ती

देवीच्या या प्रतिमेतील चिह्नसंकेत विलक्षण आहेत. देवीच्या उजव्या हातातील अक्षमालेकडे, त्याच हातावर बसलेला हा पोपट लक्षपूर्वक पहात असतो. **प्रत्यक्षात हा पोपट सजीवांच्या अज्ञानाचे प्रतिक आहे.** देवीच्या बोटांच्या नखांचा गुलाबी वर्ण, त्या सौम्य आवर्तने करणाऱ्या मोत्यांच्या जपमाळेवर परावर्तीत होऊन, पोपटाला ते मोती जणू डाळिंबाचे दाणेच असावेत असा भ्रम होतो. आपण हे दाणे कसे खावे याचा विचार पोपट करतो आहे हे, सर्वशक्तिमान – सर्वज्ञ देवीच्या लक्षांत येते आणि देवी सुहास्य मुद्रेने त्या अज्ञानी पोपटाकडे पहाते. यामुळे, देवीच्या शुभ्र दंतपंक्तीची प्रभा,

त्या पोपटावर पडते. साक्षात देवी सरस्वतीचे सुहास्य मुखदर्शन झाल्यामुळे, त्या पोपटाचे म्हणजेच अज्ञानी सजीवाचे अज्ञान क्षणार्धात नष्ट होते आणि त्याला ज्ञान प्राप्ती होते. यामुळे डाळींबाच्या दाण्यांचा पोपटाचा मोह नष्ट होतो. या प्रतिमेतील पोपटाचे रुपक विलक्षण बोलके आहे. अज्ञान आणि ज्ञानप्राप्ती संदर्भाची ही मूळ संकल्पना, त्याचे हे बोलके रुपक आणि ते साकार करणारे चिह्न, हे सारेच विलक्षण म्हणायला हवे इतके नेमके आहे.

पोपट मण्यांना डाळींब समजतो..!! कारण लाल गुलाबी नखांचे प्रतिबिंब..!! तसाच उल्लेख पातंजल योगसूत्रात स्फटिक मण्यांचा आहे.

**मणे:ग्रहितु ग्रहण ग्राह्येषू तदस्तज्जनता समापत्ती: ।**

तर कालिदासाच्या संस्कृत **विक्रमोर्वशीयम्** या नाटकात या राजहंसाच्या कमलतंतु खेचण्याचे असे वर्णन आहे.

खेचितसें, राजहंसी देठातुनी कमलतंतुला ।
ओढूनी तैसी नेतसे मनमोहिनी ।
माझ्यातुनी ही मला ।

**(विक्रमोर्वशीयम् -- कालिदास )**


--००--

# देवी महाकाली


प्राचीन भारतीय प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र ही फार प्रगत, विज्ञाननिष्ठ आणि तर्कसंगत प्रणाली आहे. **शक्तितत्व** आणि **शिवतत्वाच्या**, त्रिकोणाच्या दोन चिह्नांचा परिचय कालच्या लेखांत आपण करून घेतला. (चित्र क्र १ आणि क्र २). आता या दोन त्रिकोणांच्या एकत्र वापराने तयार झालेला, विज्ञाननिष्ठ आणि तर्कसंगत आविष्कार म्हणजे ✡ भूमितीय तांत्रिक मंडल अर्थात **शिवशक्तीचे** संयुक्त प्रतीक चिह्न. (चित्र क्र ३). या संकल्पनेची मांडणी फार सखोल आणि विस्तृत आहे. उत्तरेपासून दक्षिण आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत भारतातील प्रत्येक प्राचीन शिवालये आणि ज्योतिर्लिंग मंदिरांच्या प्रवेशद्वारात, **भूमितीय तांत्रिक मंडल – शिवशक्तीचे प्रतीकाचे शिल्प** (चित्र क्र ४) मंदिराच्या प्रवेशद्वारातच, अंगणातील जमीनिवर स्थापन झालेले दिसते.

प्रत्येक सजीवाला आहार – निद्रा – भय – मैथुन या चार गरजा अनिवार्य आहेत, जीवनकाळात त्यांतून त्यांची सुटका होत नसते. यातील मैथुन ही जशी नैसर्गिक वंशवृद्धीसाठी आवश्यक गरज आहे तशीच, प्रत्येक सजीवाची ती शारीरिक उपभोगाची आनंद देणारी गरजही आहे. आपले पूर्वज जसे विद्वान होते तसेच ते शास्त्रज्ञही होते. मानवासह प्रत्येक सजीवाच्या दैनंदिन भौतिक गरजा आणि व्यवहारांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. यातील मैथुन ही दोन भिन्न लिंगी सजीवांची शारीरिक गरज योग्य – संपूर्ण – शुद्ध – पवित्र – कल्याणकारी – आरोग्यपूर्ण निरामय आणि सर्जनशील असावी, यासाठी त्यांनी या संकल्पनेची मांडणी देवी – देवतांच्या व्यष्टिना जोडून त्याला धर्म आणि नितीमत्तेच्या चौकटीत बांधले. स्त्रीतत्व आणि पुरुषतत्वाच्या दोन भिन्न त्रिकोणांना, शक्तितत्व + शिवतत्व असे देवी पार्वती आणि महादेवाच्या व्यष्टि व्यक्तीमत्वांना जोडले. हिंदू संस्कृतीत शिव-पार्वती हे युगूलधर्माचे आणि निरामय


कामजीवनाचे प्रतिक आहे. या शिवशक्ति तत्वाच्या संयुक्त प्रतिकाचा परिचय विस्तार अशासाठी की देवी पार्वतीच्या महाकाली या विग्रह प्रतिमेचा परिचय महादेवाबरोबरच होणार आहे.



**^** स्त्री - शक्तितत्वाचे प्रतीक चित्र क्र १



**^** पुरुष – शिवतत्वाचे प्रतीक चित्र क्र २



**<** चित्र क्र ३



**<** चित्र क्र ४

**^** भूमितीय तांत्रिक मंडल — शिवशक्तीचे प्रतीक

आनंद कुमारस्वामी यांनी शंभर वर्षांपूर्वीच **THE DANCE OF SIVA** (Anand K Coomaraswamy, Published year 1918, The Sunwise Turn Inc, New York) या पुस्तकात, नटराजाच्या या नृत्य प्रतिमेतील चिह्नसंकेत आणि चिह्नार्थ याचा सखोल आणि सविस्तर परिचय सामान्य वाचकाला करून दिला होता. कुमारस्वामी लिहितात ... **महादेवाचे किती नृत्यप्रकार त्याच्या अनुयायांना माहित असावे याची कल्पनाही मी करू शकत नाही. मात्र शिवप्रदोष स्तोत्र या संहितेत महादेवाच्या हिमालयातील संध्याकालीन नृत्याचे वर्णन विस्ताराने केले गेले**

**आहे**. कुमारस्वामि यानी निबंधात वर्णन केलेला हा पहिला नृत्यप्रकार, याचे त्यांनी फार सुंदर वर्णन केले आहे.

^ भैरव विग्रहातील शिव आणि देवी महाकाली विग्रहातील देवी पार्वती (चित्रे निव्वळ सूचक आहेत).

**भैरव किंवा वीरभद्र अशा तामसी भावमुद्रेतील महादेवाचे दुसरे नृत्य, तांडवनृत्य म्हणून विश्वमान्य झाले. स्मशानभूमीत सादर होणाऱ्या या नृत्यात भैरव विग्रहातील शिव आणि देवी महाकाली विग्रहातील देवी पार्वती, दशभुज शरीर मुद्रेत आहेत. भैरवाबरोबर भूत आणि पिशाच्चगण नृत्यात तल्लीन झाले आहेत.** दोघांच्या या दशभुज शरीरमुद्रा, त्यांच्या सर्वव्यापी – सर्वश्रेष्ठ – अतींद्रिय क्षमतांचे संकेत आहेत. त्यांच्या नृत्यात सहभागी होणारे भूत आणि पिशाच्चगण म्हणजे प्रत्येक मानवाच्या **मन – बुद्धी – चित्त आणि अहंकार** या **अंतःकरण चतुष्ट्यावर प्रभाव टाकणारे अनावश्यक – नकारात्मक - क्लेशदायी विचार - कामना आणि अपेक्षा यांचे संकेत आहेत.** औरंगाबाद जवळील एलोरा गुंफा, मुंबई जवळील एलीफंटा गुंफा, कर्नाटकातील बदामी येथील गुंफा आणि भुवनेश्वर जवळील गुप्तेश्वर गुंफामधे, भारताच्या जवळपास सर्व प्रदेशांमधे, भैरवाच्या या तांडवनृत्य शैलीतील प्राचीन भित्तीचित्र आणि शिल्प उपलब्ध आहेत.





^ अर्धनारी नटेश्वर नादांतनृत्य मुद्रा नटराज ^आधुनिक नृत्यात शिवशक्ति तत्व मुद्रा

कैलासावरील प्रियकराच्या भूमिकेतील महादेव आणि भैरवाचे तामसी, उग्रभावातील तांडवनृत्य या दोन्ही विग्रहात महादेव, पूर्णपुरुष अवस्थेत आहेत. अर्धनारी नटराजाच्या विग्रहातील शिवाची नादांतनृत्य शैली ही त्याची प्रगत नृत्यशैली, कालांतराने चिदंबरम या दक्षिण भारतातील शिवमंदिराशी जोडली गेली. कुमारस्वामींच्या निबंधातील उल्लेखात आणि आज वर्तमानकाळात सुद्धा नटराजाच्या अद्वैताचा अनुभव निश्चितच सहज उपलब्ध आहे. बंगाल मधील शाक्तपंथीय परंपरेनुसार नटराजाच्या डाव्या शरीरातील मातृभाव अवस्थेतील देवी महाकालीची उपासना आजही मोठ्या उत्साहात केली जाते. भारतातील अन्य शैवपंथीय प्रामुख्याने महादेवाची उपासना करतात. **खरे म्हणजे नटराजाच्या या नादांत नृत्यातून, महादेवाने विश्वासाठी योजलेली स्थिती – सृष्टी – संहार – तीरोभाव – अनुग्रह ही पांच मुलभूत तत्वे व्यक्त होतात. या महादेवाच्या पाच वैश्विक कार्यकक्षा आहेत.**

आर्यांच्या भारतातील आक्रमणा विषयीच्या इतिहासाचे आज नव्याने विचारमंथन सुरु झाले आहे. मात्र कुमारस्वामींच्या शंभर वर्षांपूर्वीच्या निबंधातील

उल्लेखानुसार, तांडवनृत्य शैली ही महादेवाला देवत्व प्राप्त होण्याच्या आधीच्या, आदिमपर्व काळातील असावी. या नंतरच्या काळात शैव आणि शाक्त या दोन्ही पंथाच्या लिखित साहित्यामधे या तांडवनृत्य शैलीचा महत्वाचा संदर्भ उपलब्ध झाला. मातृदेवता देवी महाकाली आणि भैरवाच्या स्मशानभूमीत सादर होणाऱ्या नृत्यामागचे विलक्षण मार्मिक आणि प्रगाढ गांभीर्याने नोंदलेले चिह्नसंकेत काय आहेत ते जाणून घेतले की आपल्या पूर्वजांची विद्वत्ता आणि त्यांचा सर्वंकष अभ्यास आपल्याला चकित करतो.





^स्मशानभूमितील तांडव नृत्यमुद्रेत भैरव आणि देवी महाकाली विग्रहातील
(चित्रे निव्वळ सूचक आहेत).

वरकरणी वाचताना असे वाटते की भैरव आणि महाकाली म्हणजे संहारक शक्ती आहेत. सजीवांचे जीवनव्यवहार संपल्यानंतर त्यांच्या पार्थिवावर अंतिम अग्नीसंस्कार करण्याची जागा स्मशानभूमी, ही भैरव आणि देवी महाकालीला नृत्यासाठी प्रिय आहे. भयचकित होऊन आपण याचा पुढचा संदर्भ घेणे, विचारही करणे टाळतो. प्रत्यक्षात या स्मशानभूमीचा संकेत फार वेगळे दृष्टांत देतो. मृत सजीवांच्या पार्थीवाना इथे अग्नीसंस्कार करून नष्ट केले जाते हे वास्तव आहेच.

**मात्र त्याही पलीकडे या तांडव नृत्याचा सूक्ष्मार्थ– गूढार्थ असा आहे की महादेव आणि देवी महाकाली, तुम्हाला निष्क्रिय बनवणाऱ्या निष्फळ संकल्पना आणि मनोबल उध्वस्त करणारी तुमची नकारात्मक मनस्थिती, (नृत्यात सहभागी भूत आणि पिशाच्चगण हे त्याचे रुपक आहे) इथे अग्नीच्या स्वाधीन करतात, जणू पुनर्जन्म देऊन तुम्हाला पुन्हा उत्साही आणि सक्रीय बनवतात. निरोगी मन - शरीर, निकोप जीवनशैली प्राप्त होण्यासाठी अडसर ठरणारा तुमचा अहंकार, अहंभाव, तुमची गर्वभावना, वासना आणि कामना, इथे अग्नीच्या स्वाधीन करून नष्ट केल्या जातात. म्हणजेच सृष्टी-स्थिती-संहार-विलय-अनुग्रह या सर्वशक्तिमान विश्वनियंता त्रीमुर्तींच्या पंचक्रिया तांडवनृत्यामधे अभिनित झाल्या आहेत.**

महादेव आणि कालीमतेचे संपूर्ण शरीर स्मशानातील चितेतील भस्माने लेपलेले असते. या दोघांची ही अलौकिक – पारलौकिक अशी क्षमता आहे कारण चितेमधे भस्म झालेला मानवी देह हे या विश्वाचे अंतिम वास्तव आहे, प्रत्येक सजीव आणि निर्जीव यांचा अंत निश्चित होणार आहे. चितेतील भस्म शरीराला लेपून घेतले तरी या दोघांवर मात्र त्याचा कुठलाही परिणाम होत नसतो कारण या विश्वाचे हेच दोघे निर्माते आहेत. हे दोघे सर्वशक्तिमान आहेत, सर्वत्र आहेत. या **चितेतील भस्म संदर्भात आधुनिक वैज्ञानिकांनी काही संशोधन केले आहे मात्र याची सत्यता पडताळून पहाता आलेली नाही.**

या दोघांचे वसतीस्थान सर्वात उंच बर्फाळ पर्वतावर, कैलासावर आहे. तिथे अतीनील किरणांचा उत्सर्ग सजीवाच्या शरीराला अपायकारक असतो. वैज्ञानिकांनी केलेल्या प्रयोगात सर्वांगाला लेपलेल्या चितेतील भस्मामधील खनिजांमुळे मानवी त्वचा आणि डोळे यांना अशा अतीनील किरणांचा त्रास होत नाही असा निष्कर्ष

काढला गेला आहे. चितेतील भस्माबद्दल काही सहस्त्र वर्षांपूर्वीच्या या उल्लेखाला असा काही निश्चित विज्ञाननिष्ठ आधार असावा, याचा शोध घेणे आवश्यक आहे.

महादेवाचे भैरव हे रुद्ररूप, त्याच रौद्ररूपातील त्याची सहचारिणी देवी महाकाली या दोघांच्या गळ्यातीलदे कवट्यांच्या माळा, हातातील शस्त्रे या प्रतिमांच्या प्रतिकशास्त्राचा अभ्यास न करताच भूतगणांसह त्यांच्या स्मशानातील नृत्याविषयी भीती निर्माण करणारे वर्णन लिहिले गेले. मानवाच्या मस्तकातील मेंदू, **दृष्टी – श्रवण – गंध – स्पर्श – स्वाद** या त्याच्या पांच इंद्रिय संवेदनांचे नियंत्रण करतो, याचा निश्चित विज्ञाननिष्ठ अभ्यास आपल्या पूर्वजांनी केला होता. म्हणूनच त्यांच्यासाठी मानवी मस्तकाचे महत्व अनन्यसाधारण होते. तत्कालीन मान्यतेनुसार, मनुष्याच्या कवटीचे मृत्यूपश्चातही हेच महत्व होते. म्हणूनच निर्मिती+स्थिती+लय+पुन्हा निर्मिती या वैश्विक क्रियेच्या नियंत्रक देवता, अभिमानाने आपल्या परिपूर्ण निर्मितीचा संकेत देणाऱ्या या मानवी कवट्यांच्या माला धारण करत असाव्या.

सामान्य उपासकाच्या - दर्शकाच्या समजुतीपलीकडे असलेले उत्कर्षाकडे जाणारे विचार आणि सर्वश्रेष्ठ तत्वज्ञान व्यक्त करण्यासाठी, चिह्नांचा वापर फार प्राचीन काळापासून भारतीय विज्ञान – तत्वज्ञान – साहित्यात – कलेत व्यक्त केला गेला आहे. या चिह्नांनाच उपासक आणि देवता यांच्यातील संवादाची निश:ब्द भाषा म्हटले गेले. मोजता येतील अशा संख्यात्मक विचारांसाठी परिमाणाची आणि आकड्यांची भाषा वापरली गेली. बोलून वर्णन करता येईल आणि ऐकता येईल अशा विचारांसाठी शब्दांची निवड आणि अर्थवाही वाक्यांची रचना केली गेली आणि असे श्राव्य विचार मुखोद्गत केले गेले. वाचता यावे म्हणून असे शब्द लिपीच्या माध्यमातून निर्माण झाले, त्यांची अर्थवाही तर्कसंगत वाक्ये बनली आणि हस्तलिखित आणि छापील पुस्तकांची निर्मिती झाली. मात्र, आकड्यात आणि शब्दांत मांडता येणार नाही अशा अगणित,


अपार, वैश्विक, पारलौकिक अशा अमूर्त संकल्पना, उपासक आणि दर्शकांपर्यंत पोहोचाव्या या उद्देशाने चिह्नांचा वापर केला गेला. वैश्विक संकल्पना **(generic concept or thought)** आणि लौकिक जगातील त्यांची वास्तव रचना **(physical form)** किंवा व्यक्त रूप **(expression)** या दोन्हीतील साधर्म्य आणि समानता स्पष्ट करण्याचे काम, प्रतीके, रुपके, चिह्न आणि चिह्नसंकेत करत असतात. चिह्ने आणि त्याचे संकेत, सुप्त मनाची भाषा आहे. प्रथम बघताना – अनुभवताना अशी चिन्हे आणि त्याचे संकेत अनेकदा कदचीत तर्कसंगत वाटणार नाहीत आणि भयाची भावनाही निर्माण करतील.

--○○--

# महिषासुरमर्दिनी – वाहने

देवी महाकाली – देवी महिषासुरमर्दिनी – देवी चामुंडा – देवी दुर्गा ही देवी पार्वतीची सर्व मातृदेवता विग्रह रुपे, तामसगुणधारिणी रक्षक देवता स्वरूपाची आहेत. या विश्वाच्या निर्मितीपासून, सृष्टीत घडणाऱ्या सजीवांच्या अनुभवाच्या पूरक आणि विध्वंसक अशा दोन विरोधी प्रवृत्तींची नोंद आपल्या विद्वान पूर्वजांनी घेतली होती. सुष्ट – दुष्ट, उपकारक – अपायकारक, संवर्धक – विनाशकारक, सूर – असूर, अदित्य – दैत्य अशा विरोधी प्रवृत्तींना शिल्प – मूर्ती – चित्र अशा माध्यमातून देव – दानव या स्वरूपात सगुण-साकार केले गेले आणि शब्द स्वरूपात अक्षर केले गेले. प्राचीन भारतीय इतिहासाचे वरिष्ठ अभ्यासक श्री नीलेश ओक यांच्या संशोधन – अभ्यासात त्यांनी रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यातील वास्तव घटनांची आणि त्यातील युद्धाची कालनिश्चिती केली आहे. ही दोन महाकाव्य आणि श्रीमद भगवतगीता या तीन विश्वसंमत संहितांचा निव्वळ उल्लेख, वरचा मुद्दा पुरेसा स्पष्ट करतो.

श्री नीलेश ओक यांच्या पुस्तकांत त्यांच्या अभ्यासातून केलेल्या नोंदीनुसार, ऋग्वेदाच्या रचनेला चोवीस हजार वर्षांपूर्वीपासून सुरुवात झाली होती. या विशाल कालावधीत विश्वाच्या आणि पृथ्वीच्या निर्मितीच्या – उत्क्रांतीच्या – दैत्य – दानव – राक्षस या असुरांबरोबर झालेल्या तत्कालीन संघर्षाच्या अनेक संहिता लिहिल्या गेल्या होत्या. या विज्ञाननिष्ठ — तर्कसंगत संहिता दोन पातळ्यांवर व्यक्त होत होत्या. यांत देव आणि दानव यांच्या लौकिक – वास्तव लढाया आणि त्यातील क्रौर्य – शौर्य यांच्या बाह्य संघर्षाच्या कथा होत्या.




^ श्री नीलेश ओक यांची पुस्तके

मन, चित्त, बुद्धी आणि अहंकार ही मानवाची चार अंतःकरणे, यांत घडणाऱ्या धारणा – भावना – अपेक्षा – आकांक्षा – स्वार्थ – क्रोध – ममत्व – वात्सल्य – करुणा अशा अंतर्गत संवेदनांचे नाट्यमय वर्णनही त्या संहितातून केले गेले होते. ही संहितेची विज्ञाननिष्ठ तत्वज्ञान पातळी होती. यांत दोन विरोधी प्रवृत्तींची, देव-दानव, सुर-असूर अशी व्यक्तिमत्व चित्रित केली गेली. दोन प्रवृत्तीच्या महत्वाकांक्षेपायी निर्माण झालेले संघर्ष रचले गेले. वरकरणी भयकारक परंतु रक्षणकर्त्या उपकारक स्त्री आणि पुरुष देवतांची व्यक्तिमत्व साकार झाली. सामान्य प्रजेच्या जाणीव – जागृती साठीच हे केले गेले होते.

**सृष्टी-स्थिती-संहार-विलय-अनुग्रह** हे वैश्विक व्यवहार नियंत्रित करणाऱ्या देव – देवता – अदित्य यांचे, असुरांच्या (दैत्य-दानव-राक्षस) बरोबर झालेले संघर्ष आणि लढाया सामान्यतः प्रकृती – पृथ्वी – निसर्गाच्या नियंत्रणाच्या अधिकारासाठी लढल्या गेल्या होत्या असे उल्लेख या संहितांमध्ये नक्कीच वाचता येतात. महाकाली – दुर्गा – महिषासुर मर्दिनी (चामुंडा) या विग्रह रुपांत देवी पार्वतीने, **महिषासुर – शुंभ – निशुंभ – रक्तबीज – हुदूर दुर्गा** या पांच असुरांचा पराभव केला होता. यांचे अगदी साधे संकेत असे की प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीदेवता आणि अर्थातच समाजातल्या स्त्रीयांचा आणि त्यांच्या क्षमतांचा नेहेमीच सन्मान केला गेला होता.

चार वेद – ब्राह्मणके – उपनिषदे – पुराणिक साहित्यात आणि रामायण – महाभारत या दोन्ही महाकाव्यात, असूर या समुदायाचा उल्लेख विस्ताराने केला गेला होता. माता दितीचे पुत्र दैत्य – माता दनूचे पुत्र दानव – माता सुरसाचे पुत्र राक्षस अशा विध्वंसक प्रवृत्तीच्या असुरांच्या तीन ज्ञाती या साहित्यात उल्लेखित आहेत. आपल्या लोकसंख्या अहवालात आजही अस्तित्वात असलेल्या असूर समाजाची नोंद उपलब्ध आहे. झारखंड – मध्यप्रदेश – पश्चिम बंगाल – ओडिशा – छत्तीसगढ या राज्यात, बीर असूर – विजारिया असूर – अगरिया असूर हा समाज स्थायिक आहे.

या समाजात बारा गोत्रांचा उल्लेख केला जातो. काही सहस्त्र वर्षांपासून, जनावरे – पक्षी – धान्य अशा प्रकारची संबोधने या गोत्रांसाठी वापरली गेली आहेत. अइंद आणि छोटी अइंद नावाचे मासे, टोप्पो – छोटा टोप्पो – केरकीटिया – छोटी केरकीटिया नावाचे पक्षी, खुसार म्हणजे घुबड, दारोठे – महतो रोठे – सिंदूरीया रोठे असे बेडूक, कोयबरवा नावाचा जंगली प्राणी .. .. अशी ही गोत्रांची संबोधने आहेत. आदिम काळांत अशी अनेक प्राण्यांची संबोधने या असुरांच्या टोळ्यांना वापरली जात असत, आजहि ही संबोधने प्रचलित आहेत. याच नावाने त्या त्या असूर समुदायाला ओळखले जात असे. त्यातलेच एक संबोधन **महिष** अर्थात रेडा.


**महिषासुर** हा **महिष** या असुरांच्या समुदायाचा राजा होता. त्यांचे चिह्न होते **रेडा**. या **महिष** शब्दाचे दोन अर्थ आहेत. पहिला अर्थ **रेडा**. दूसरा अर्थ **अभिषेक झालेला राजा अथवा सम्राट**. महिषासुराचा पिता रंभ यांचा युगुलसंपर्क एका म्हशी बरोबर झाला आणि महिषासुराचा जन्म झाला. त्यामुळे महिषासुर त्याला हवे तेंव्हा मानव रूप आणि हवे तेंव्हा महिषाचे रूप घेऊ शकत असे. बलाढ्य महिषासुराने ब्रह्माची तपश्चर्या करून वर मिळवला की कुठलाही पुरुष देवता त्याचा पराभव करू शकणार नाही. ब्रह्मा – विष्णु – महेश आणि अन्य देवता एकत्र येऊन त्यांनी देवी पार्वतीला त्यांची एकत्रित चेतना दिली. देवी पार्वतीने महिषासुराशी सतत नऊ दिवस युद्ध केले आणि त्याचा पराभव केला. म्हणून तिला महिषासुरमर्दिनी म्हटले गेले. हे

आश्विन महिन्यातले नऊ दिवस, देवीचे नवरात्र साजरे केले जाते. दहाव्या दिवशी, देवीने माहिषासुरावर मिळवलेल्या विजयासाठी विजयादशमीचा उत्सव साजरा केला जातो. यावेळी प्रथमच सिंहाऐवजी रेडा तिचे वाहन झालेला दिसतो.

अगदी सुरुवातीच्या काळांत, सिंह हा प्राणी देवी महाकालीचे वाहन होता. **महिषासुराच्या वधा नंतरच्या काळांत देवीने, रेडा तिचे वाहन म्हणून स्वीकारला.** त्याचे गूढार्थ संकेत आपण पाहूया. देवतांचे वाहन असा शब्दप्रयोग या लेखमालेत अनेकदा केला गेला आहे. या वाहन शब्दाला इंग्लिशमध्ये **Consort** असा शब्द सामान्यतः वापरला जातो. आपल्या अभ्यासासाठी, याचा अर्थ मुख्य देवी – देवतेच्या सन्निध् असणारा किंवा सुसंगत असणारा प्राणी. देवतेच्या सन्निध् असणाऱ्या या प्राण्यांमुळे दर्शक आणि उपासकाला, देवतेच्या व्यक्तिमत्व आणि क्षमतेविषयी, काही निःशब्द संकेत मिळत असतात. आपण जसे घोड्यावर अथवा सायकलवर बसतो तसे कुठलीही देवी-देवता या प्राण्यावर स्वार होत नाही. देवते जवळ असलेल्या अशा प्राण्यांच्या सानिध्याचे, प्राण्यांच्या गुणवत्तेनुसार विश्लेषण केल्यास, दर्शकाला तीन प्रकारचे संकेत मिळतात.



**^** सिंहारूढ देवी पार्वती



**^** महिषासुर मूर्ती, म्हैसूर

माहिषासुराचा पराभव केल्यानंतर, त्याच्यावरील विजयाचे प्रतीक म्हणून त्याच्या असूर समुदायाचे चिह्न रेडा, देवीने आपले वाहन म्हणून स्वीकारला आहे. हे देवीचे विजयचिह्न (ट्रॉफी) आहे. जेता राजा सामान्यतः पराभूत राजाला मंडलिक हा दुय्यम दर्जा देतो. रेड्याला आपल्या सन्निध् घेऊन, महिषासुरमर्दिनीने तसेच संकेत दिले आहेत. त्या काळांत शिल्प – मूर्ती – चित्र हीच दृश्य संवादाची माध्यमे होती हे लक्षात घेणे आवश्यक आहे. मात्र रेडा वाहन असलेल्या देवीच्या प्रतिमा उपलब्ध नाहीत. **देवीचे व्यक्तिमत्व आणि वाहन असलेल्या प्राण्याचा नेमका परिचय याचा अभ्यास करून, देवीचे वाहन रेडा का..? यांचे हे विश्लेषण, वाहन संदर्भातल्या अभ्यासाचा हा पहिल्या प्रकारचा संकेत आहे.**



^ देवांचा सेनापति कार्तिकेय



^ देवी सरस्वती

आधीच्या लेखांत, देवी सरस्वतीच्या व्यष्टि बरोबरच तिच्या सन्निध् असलेल्या मोर आणि हंस या दोन वाहनांच्या नैसर्गिक गुणवत्ता आणि व्यक्तिमत्वाचा परिचय आपण करून घेतला. आपल्या विज्ञाननिष्ठ विद्वान पूर्वजांनी, देवी-देवतांच्या व्यक्तिमत्व आणि क्षमतांच्या मूळ संकल्पना बनवतांना, सजीव प्राणी - पक्षी, शस्त्रे, आयुधे, अवजारे, वाद्य, वस्तु, फळे-फुले-निसर्ग याचा प्रतीके – रुपके चिह्न यांचा

चतुराईने वापर केला आहे. इथे एक गोष्ट समजून घ्यायला हवी की, मोर आणि हंस याच्या नैसर्गिक प्रवृत्तींचा वापर, देवी सरस्वतीच्या निःशब्द संकेतांत, उपासक आणि दर्शकाशी होणाऱ्या संवादासाठी केला गेला आहे. महादेव आणि देवी पार्वतीचा मोठा पुत्र कार्तिकेय हा देवांचा सेनापति आहे. त्याचेही वाहन मोर त्याच्या सन्निध् आहे. मात्र देवी सरस्वतीच्या प्रतिमेत मोराचे वापरलेले चिह्नमूल्य आणि चिह्नसंकेत या मध्ये खूप फरक आहे. सेनापति कार्तिकेयाच्या सन्निध् असलेला मोर, त्याच्या आणि मोराच्या बुद्धिमत्ता आणि अभिमान आणि गर्वभावनेचे संकेत देते. या मोराच्या आणि कार्तिकेयाच्या व्यक्तिमत्वाच्या - लक्षणांच्या गुणवत्ता **(qualities & attributes)** आहेत, त्यांच्या भौतिक अथवा लौकिक **(physical)** नैसर्गिक शरीरधर्माच्या नाहीत. **या दोघांचे हे विश्लेषण, वाहन संदर्भातल्या अभ्यासाचा दुसऱ्या प्रकारचा संकेत आहे.**



^ कालरात्री वाहन गर्दभ



^ शीतला देवी वाहन गर्दभ

**देवतांच्या वाहनाचा तिसरा संकेत आहे वाहनाच्या** भौतिक अथवा लौकिक **(physical)** नैसर्गिक शरीरधर्माच्या गुणवत्तेचा. देवी कालरात्री आणि देवी शीतला या दोन प्रतिमांमध्ये, त्यांचे वाहन गर्दभ आहे. **अंतःकरण चतुष्ट्यातिल** मानवी बुद्धीचे नियंत्रण करणारी देवी कालरात्रीचे वाहन गर्दभ हा मेहनती तरीही मंद बुद्धीचा प्राणी आहे. याच्या व्यक्तिमत्व लक्षणांच्या या गुणवत्ता **(qualities & attributes)** म्हणजे लोकश्रुती नुसार तो मूर्खपणाचे – अविद्येचे – अज्ञानाचे – समज कमी असलेल्या प्राण्याचे रुपक आहे. त्याचा संदर्भ घेऊन, तुम्ही याच्यासारखे मंद राहू नका काळ आणि वेळेचे भान ठेवा असे देवी आपल्याला सांगते. देवी शीतला ही रोगनिवारक देवता आहे. शारीरिक त्वचेच्या व्याधीवर ती उपचार करते. तिच्या उजव्या हातात झाडू आहे त्याचा उपयोग ती त्वचेवरचे फोड फोडण्यासाठी करते. त्यावर कडूलिंबाचा पाला चोळते. डाव्या हातातील कलशातील औषधी डाळीच्या पाण्याने, ती आपले शरीर स्वच्छ ठेवते. तिच्या वाहन गर्दभाची लीद, त्वचेच्या व्याधीवर रामबाण इलाज आहे. त्याचा उपयोग देवी आपल्या त्वचेच्या इलाजासाठी करते. देवी शीतला हिच्या गर्दभाच्या, भौतिक अथवा लौकिक **(physical)** नैसर्गिक शरीरधर्माच्या गुणवत्ता देवी कालरात्रीच्या गर्दभापेक्षा वेगळ्या आहेत.

देवी – देवतांच्या, विशेषतः मातृदेवतांच्या सन्निध् असलेल्या त्यांचे वाहन असलेल्या प्राणी आणि पक्षी यांची प्रतीकमूल्य - रुपकमूल्य आणि त्यांच्या चिह्नसंकेतांचा अभ्यास खूप आनंददायी असतो.

--○○ --

# भारतमाता – देवी दुर्गा

काही सहस्त्र वर्षांपासून भारतीयांची निसर्गचक्राशी जोडलेली दैनंदिन जीवनशैली – भारतीय तत्वज्ञान – भारतीय लिखित साहित्य – चित्रकला – शिल्पकला – मूर्तिकला – नृत्य – नाट्य – संगीत – स्थापत्य या सर्व अभिजात कला निर्मितीत, **मातृदेवता** ही मूळ प्राचीन भारतीय संकल्पना, असंख्य माध्यमे – रुपके – प्रतीके आणि संकेत यातून, काही सहस्त्र वर्षांपासून उन्नत आणि विकसित होऊन व्यक्त झालेली दिसते. मातेवरच्या आंतरिक श्रद्धेमुळं आणि पूजनीय भावनेमुळं अशा रिवाजांना, कथांना पुढं धार्मिक स्वरूप येत गेलं. कुटुंब आणि समाज या व्यवस्था याची प्राथमिक बांधणी सुरू झाली तेंव्हा पासूनच विश्वाची निर्मिती – निसर्गचक्र – आरोग्य – मूल्य विचार – कुटुंब या गोष्टींची सांगड, उपासना – पूजा – विधी – समारंभ या माध्यमातून धर्माशी घातली गेली होती. पृथ्वीचा आणि जन्मभूमीचा उल्लेख **जननी** अथवा **मातेसमान** देवता असा उल्लेखरामायणात निश्चितपणे केला गेला आहे.

**मित्राणि धन धान्यानि प्रजानां सम्मतानिव |**
**जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ||**

रामायणात, श्रीरामाला उद्देशून भारद्वाज ऋषि सल्ला देतात .. .. मित्र, धनवान आणि अन्न धान्य हे जरी महत्वाचे असले तरी जन्मदात्री आई आणि जन्मभूमी आपल्यासाठी स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहेत.

**अपि स्वर्णमयी लङ्का न मे लक्ष्मण रोचते |**
**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ||**

लंकेवरील विजयानंतर श्रीराम लक्ष्मणाला उद्देशून म्हणाले .. .. लक्ष्मणा, ही लंका सोन्याची असली तरी मला तिचे आकर्षण नाही कारण जन्मदात्री आई आणि जन्मभूमी आपल्यासाठी स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहेत.




चित्र क्र १ नेपाळ देशाचे राज्यचिह्न

चित्र क्र १ मध्ये आपला शेजारी देश नेपाळचे राज्यचिह्न आहे.**(Coat of Arms).** राज्यचिह्नाच्या खालच्या बाजूला असलेल्या बोधफितीवरचे **(Motto scroll ribbon)** सुभाषित, या श्लोकाचा अर्धा भाग आहे. **जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी.** या दोन्ही देशांचा प्राचीन इतिहास एकच आहे. **हिंदू धर्म बांधवांचा हा जगातील एकमेव देश आहे.**

वर्ष १८८२ मध्ये आनंदमठ या कादंबरीत बंकीमचंद्र चट्टोपाध्याय यांनी भावानंद या एका संन्यासी पात्राच्या तोंडी, त्या युगप्रवर्तक **वन्दे मातरम्** या गीताची योजना केली होती. बांग्ला आणि संस्कृत या दोन्ही भाषांच्या संयुक्त वापराने लिहिलेले हे गीत मूळ बंगाली लिपीत लिहिले गेले होते. देशाच्या पारतंत्र्याच्या काळांत, प्रामुख्याने बंगाल – पंजाब – महाराष्ट्र या तत्कालीन तीन प्रदेशांमध्ये देशभक्तीने प्रेरित झालेले क्रांतिकारी नागरिक सक्रिय झाले होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, क्रांतिकारी विचाराच्या प्रत्येक नागरिकाला या गीताने स्पूर्ति आणि चेतना दिली होती.

देशाच्या पारतंत्र्याच्या काळांत, महान बंगाली क्रांतिकारक आणि विचारवंत योगी अरविन्द घोष यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला, आपली **जन्मभूमी भारत** ही आपली माता आहे अशी **भारतमाता** ही संकल्पना आधुनिक स्वरूपात प्रथम मांडली. **खुदिराम बोस** आणि **प्रफुल्लकुमार चाकी** या दोन कुमारवयीन क्रांतिकारकांनी, बंगालच्या फाळणीच्या विरोधात न्यायाधीश किंग्सफोर्डचा वध करण्यासाठी, मुजफ्फरपुर येथे केलेला बॉम्बस्पोट हा भारतीय क्रांतिकारकांच्या इतिहासातला पहिला बॉम्बस्पोट होता. हा बॉम्ब अरविन्द घोष या तरुण जहाल क्रांतिकारकाने बनवला होता. नंतरच्या काळांत **योगी आरोविन्द** हे महान क्रांतिकारक स्वातंत्र्य सेनानी – महायोगी – युगप्रवर्तक तत्वज्ञ लेखक – महाकवी म्हणून ओळखले गेले.

अशा मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या विचारांनी भारलेल्या त्या पिढीतील कवि – लेखक – नाटककार – चित्रकार – शिल्पकार यांनी **मातृभूमी भारतमाता** ही संकल्पना त्यांच्या सर्जनशील प्रतीभेत व्यक्त केली.



^ चित्र क्र २ रविंद्रनाथ टागोरांचे बंधु श्री अवनिंद्रनाथ टागोर याची **भारतमाता** ही चित्रकृती

गुरुदेव टागोर यांचे बंधु श्री अवनिंद्रनाथ टागोर यांची **भारतमाता** ही चित्रकृती त्याकाळात विशेष गाजली होती. तत्कालीन अनेक व्यवसायांच्या जाहिरातीमधे नामवंत **चित्रकार राजा रवीवर्मा** यांनी चित्रित केलेली **भारतमातेची** प्रतिमा (चित्र क्र ३) अभिमानाने चित्रित झाली होती. अनेक नामवंत चित्रकारांनी त्यांच्या शैलीमधे **भारतमाता** चित्रित केली. (चित्र क्र ४ आणि ५).




**^** चित्र क्र ३



**^** चित्र क्र ४



**^** चित्र क्र ५

**जयोस्तुते श्री महन्मंगले शिवास्दे शुभदे** ही स्वातंत्र्यदेवीची आरती आणि **ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला** हे मातृभूमीचे स्मरण करून देणारे गीत या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर या वीरपुरुष महाकवीच्या चिरतरुण रचना लोकस्मृतीत अमर - अक्षर झाल्या आहेत.


मान्यवर मराठी नाट्यलेखक श्री कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांचे **कीचकवध** हे मराठी नाटक वर्ष १९०७ मधे प्रयोगसिद्ध झाले. बंगालच्या फाळणीनंतर उन्मत्त अत्याचारी ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन याच्यावर जहाल टीका करणाऱ्या या नाटकात खाडिलकरांनी, महाभारतातील विलक्षण प्रभावी रुपके वापरली होती. पांडवांच्या अज्ञातवास काळातील **सैरंध्री रूपातील (अर्जुन) ही गुलामगिरीतील मातृदेवता भारतमाता – बल्लवाच्या रूपातील (भीम) हे स्वातंत्र्याची अपेक्षा असलेले भारतीय नागरिक**, **अत्याचारी कीचक म्हणजे**

**अत्याचारी ब्रिटिश राज्यकर्ते** असे हे रुपकसंकेत, तत्कालीन प्रेक्षकांत मोठा असंतोष निर्माण करणारे होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या नाटकावर बंदी घातली होती.

स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीचा तो स्वातंत्र्याच्या तीव्र प्रेरणेचा काळ, **मातृभूमी भारतमाता** या प्रतीकात्मक संकल्पनेने भारलेला होता. तत्कालीन अखंड भारतातील अशा अनेक सर्जनशील प्रतिभावंतांनी आपल्या कृती निर्माण केल्या होत्या. **राष्ट्रीय स्वयंसेवक संघ** आणि **राष्ट्र सेविका समिति** या दोन्ही देशव्यापी आधुनिक संघटना, संस्कृत – हिन्दी – इंग्लिश या तीन भाषांमध्ये **एकात्मता स्तोत्र ही** आधुनिक रचना आपल्या सभा – संमेलनात नियमित सादर करत असतात. **मातृदेवता मातृभूमी भारतमाता** ही प्राचीन भारतीय संकल्पना, अशा **एकात्मता स्तोत्र** गायनातून वृद्धिंगत होत रहाते. एकात्मता स्तोत्र गायनाचे वेळी खालील प्रतिमा व्यासपीठावर प्रदर्शित केली जाते. ही प्रतिमा, भारतमाता या संकल्पनेचे निर्माते महर्षि योगी अरोबिंदो यांच्या सल्ल्यानुसार चित्रित केली गेली आहे हे या प्रतिमेचे वैशिष्ट्य आहे.



^ चित्र क्र ६ एकात्मता स्तोत्र भारतमाता प्रतिमा



^ चित्र क्र ७ महर्षि योगी आरोबिंदो

महात्मा गांधींच्या हस्ते उद्घाटन झालेले, **मातृदेवता भारतमातेचे पहिले मंदिर** वाराणशी शहरात आहे. या मंदिरात अखंड भारताचा नकाशा, देवीच्या प्रतिमा स्वरूपात साकारला आहे.




**^** भारतमाता मंदिर, वाराणशी



**^** अखंड भारत त्रिमीती नकाशा भारतमाता, वाराणशी

भारतमातेचे दुसरे मंदिर इंदूर शहरात आहे. त्याशिवाय हरिद्वार, उज्जैन, भोपाळ आणि मंदसौर या शहरात भारतमातेची मंदिरे आणि विग्रह मुर्ती स्थापित आहेत.



**^** भारतमाता हरिद्वार



**^** भारतमाता उज्जैन



^ भारतमाता भोपाळ



^ भारतमाता मंदसौर

**मातृदेवता देवी पार्वती** देवी महाकाली – देवी महिषासुरमर्दिनी – देवी चामुंडा – देवी दुर्गा अशा **तामसगुणधारिणी विग्रहांमधे** व्यक्त झालेली आपल्याला दिसते. पृथ्वीवरील देवी दुर्गेचे तिचे निवासस्थान वाराणशी (काशी – बनारस) हे शहर आहे. तेथील दुर्गादेवीची नऊ देवळे प्राचीन आहेत. दुर्गा सप्तशती आणि दुर्गा कल्पतरू या दोन मूल संस्कृत संहितांमध्ये देवीच्या या नऊ विग्रहांचा परिचय फार विस्ताराने लिहिलेला आहे. **देवी दुर्गेचे खालील सर्व संक्षिप्त परिचय, शाक्त तात्त्विक परंपरेतील तांत्रिक धोरणाने लिहिलेले, दुर्गा कल्पतरू या संहितेत मांडलेले आहेत**. ही आपल्या कुटुंबातील – समाजातील आपल्याला रोज भेटणारी स्त्रीच आहे. दोन दोन वाक्यात, देवी दुर्गेच्या अर्थात प्रत्येक स्त्रीच्या या नऊ रूपांचा हा धावता परिचय. **यातील पहिल्या पांच दुर्गा पांच महाभूत तत्वांची प्रतीके आहेत. शेवटच्या चार दुर्गा, मन – बुद्धी – चित्त – अहंकार या मानवाच्या अंतःकरण चतूष्ट्याचे नियंत्रण करतात.**

मेरू पर्वताची कन्या मिनावती आणि हिमालयाचा राजा हिमावत यांची कन्या **देवी शैलपुत्री (पृथ्वी तत्व)** ही बालिका स्वरूप दुर्गा आहे. देवी बालिका स्वरूप असूनही सक्षम आणि सबला आहे याचे प्रतीक म्हणजे तिच्या उजव्या हातातील त्रिशूळ. आधुनिक काळातील बालिका आणि स्त्रियांनी यातला चिह्नसंकेत समजून घेणे

आवश्यक आहे. **देवी ब्रह्मचारिणी (जल तत्व)** विद्यार्थिनी आहे. ती अजूनही ऋतुमती झालेली नाही मात्र धैर्य - आत्मसंयम – इंद्रियनिग्रह हे तिच्या जीवनाचे ध्येय-धोरण आहे. **देवी चंद्रघंटा (अग्नि तत्व)** ऋतुमती झालेली तरुणी आहे मात्र अविवाहित आहे. आता तिला तिच्या स्त्रीत्वाचा परिचय झाला आहे. **देवी कुष्माण्डा (वायु तत्व)** आता मातृत्व अनुभवते आहे. मातृत्त्वानंतर स्त्रीची निसर्गदत्त वत्सलता आणि परोपकारी करूण भाव ती व्यक्त करते आहे.

**देवी स्कंदमाता (आकाश - तेज तत्व)** हिने आता आपल्या बाळाला जन्म दिला आहे. आपल्या बाळाला दूध पाजण्यासाठी हिचा पान्हा आतुरला आहे. ही या ब्रम्हांडाची जन्मदात्री आहे. कुटुंबातील कुटुंबवत्सल स्त्री आहे. आई झाली असली तरी ती तरुण आहे. आपल्या पतीवर अवलंबून न रहाता ती मुलांचा आणि कुटुंबाचा सांभाळ करते आहे. ती समर्थ आणि स्वावलंबी आहे.

मानवी मन हे हे सर्वात वेगवान आहे. **प्रेम–आशा–आकांक्षा–आनंद–निराशा–द्वेष–राग-असूया** अशा सर्व भावना, आपल्या **मानस** म्हणजे **मनाचे** खेळ आहेत. या मानवी संवेदनशील मनाचे नियंत्रण **देवी कात्यायनी** रूपात देवी दुर्गा करते. प्रत्येक वेळी आपल्या मनातील भावना-विचार हे दयाळू आणि परोपकारी वृत्तीचेच असतील असे नाही. **द्वेष – राग अशा भावनासुद्धा याच मनाचे खेळ आहेत. तारकासुर – शुंभ – निशुंभ – दुर्गम (दुर्गा) – महिषासुर या दानवांचे वध करणारी हीच आपली देवी दुर्गा, नेहमीच कात्यायनी रूपात असते.** लोककल्याणासाठी अशा हिंसक दुर्गा देवीला, आपण देवत्व देतच असतो. आज आपल्या देशाच्या सीमेवर लढणारा प्रत्येक सैनिक, आपल्या रक्षणासाठी अतिरेक्यांना मारण्यासाठी हिंसाच करतो आहे, **मात्र ते शौर्य आहे क्रौर्य नव्हे**. यातला विवेकभाव आपल्याला समजत असतोच. **देवी कात्यायनी रूपात देवी दुर्गा** आपल्या मनाचे, विवेकबुद्धीने असे नियंत्रण करते.

**देवी कालरात्री (मानवी बुद्धीची नियंत्रक)** आता मध्यम वयाकडे झुकली आहे. तिची मातृत्वाची क्षमता आता कमी झाली आहे. ती रजोनिवृत्तीच्या कळा सहन करते आहे. तिची मुले आता मोठी होऊन स्वावलंबी झाली आहेत. **देवी महागौरी चित्ततत्त्वाची प्रतीक** आहे कारण ती स्त्रीच्या दैनंदिन वैयक्तिक आणि खाजगी जीवनातील अनेक भावना – धारणा -- घटना यावर सकारात्मक व्यक्त भाष्य करते. ही रजोनिवृत्ती नंतरची स्त्री आहे. आता ती पुन्हा आपले बाल्य अनुभवते आहे. आता ती तिच्या आवडत्या कामात आणि छंदात रमते आहे. **देवी सिद्धीदात्री (अहंकार - अस्तित्वाचे रूपक)** म्हणजे अध्यात्मिक आनंदाच्या दिशेने निघालेली वृद्धा आहे. समाजातील गरजूना मदत आणि सल्ला हे तिचे दैनंदिन काम आहे.

**आनंदी दांपत्यजीवन – सुखी कुटुंब – संतुलित समाज असे तर्कशुध्द आणि नैसर्गिक सुसंगती आणि सर्वसमावेशक मार्गदर्शन करणाऱ्या अशा प्राचीन संहिता फक्त आपल्या संस्कृतीतच उपलब्ध आहेत.** या देवी दुर्गेचे सगळे अविष्कार, प्रत्येक महिलेने सूक्ष्मपणाने समजून घेणे आवश्यक आहे.




वर्ष २०२० च्या नावरात्री उत्सवात माझे **नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रुपके** हे देवी दुर्गेच्या नऊ विग्रहांचा परिचय करून देणारे ई पुस्तक, ई साहित्य प्रतिष्ठान यांच्यातर्फे प्रकाशित झाले आहे. खालील लिंकवर हे पुस्तक विनामूल्य डाउनलोड करता येईल.

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/navdurga_psr_arun_phadke.pdf

--००--

# सप्तमातृका

**सप्तमातृका** या मातृदेवतांचा उल्लेख, ख्रिस्तपश्चात चवथ्या शतकातील मार्कंडेय पुराणात प्रथम विस्ताराने केला गेला आहे. त्यानंतरच्या पुराणिक काळांत **वराह पुराण** आणि **मत्स्य पुराणातही** उपलब्ध झाला. पुरुष देवतांच्या शक्तिरूपी म्हणजे (स्त्रीरूपी देवता) असे या **सप्तमातृका** प्रतीक देवतांचे एक रुपकमूल्य आहे. या सात देवता युद्धसज्ज रक्षणकर्त्या आहेत आणि असुरांबरोबर युद्ध करण्यासाठी या पुरुषदेवतांच्या शक्तिरूप देवता आहेत. असे खूप वेगळे परिचय, मातृदेवतांसंदर्भात उपलब्ध झाले आहेत. **चामुंडा – ब्राह्मणी – वैष्णवी – महेश्वरी – कौमारी – वाराही – इंद्राणी** या सात देवतांशीवाय काही ठिकाणी **योगेश्वरीसह** या मातृका आठ आहेत असाही संकेत मिळतो.

**देवी चामुंडा** हीचा अपवाद वगळता यातिल सहा मातृदेवतांची रुपके त्यांच्या पुरुष देवतांशी जोडली आहेत. श्री ब्रह्माचे शक्तिरूप **ब्रह्माणी** – श्री विष्णूचे शक्तिरूप **वैष्णवी** – शिव अर्थात महेषाचे शक्तिरूप **महेश्वरी** – देवांचा सेनापति कार्तिकेय अर्थात कुमार यांचे शक्तिरूप **कौमारी (कुमारी)** – श्री विष्णूच्या वराह अवतारातील शक्तिरूप **वाराही** – इंद्राचे शक्तिरूप **इंद्राणी.. ..** या मातृदेवतांचा असा हा वेगळा परिचय. या सात मातृदेवतांच्या व्यक्तिमत्वात त्यांचे विशेष स्वभावधर्म आहेत. अंधकासुराबरोबर झालेल्या युद्धात घडलेल्या प्रसंगाचे वर्णन **इशानशिवगुरुदेवअपद्धाती** या संहितेत विस्ताराने केले आहे. शिवाने त्याला जखमी करताच त्याचे रक्त वाहू लागले आणि त्याला मिळालेल्या वरानुसार, त्याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून नवा असूर निर्माण झाला. शिवाने देवी योगेश्वरीचे सहाय्य मागितले. अन्य देवतांनी आपली शक्तिरुपे सहाय्यासाठी पाठवली. या सर्व विक्राळ देवतांनी रक्ताचा एकही थेंब खाली पडू दिला

नाही आणि अंधकासुरांचे सर्व रक्त पिऊन टाकले आणि त्याच्यावर विजय मिळवला. **वामन पुराण** (भाग ५६) संहितेनुसार, **चंड – मुंड** आणि **रक्तबीज** या तीन असूरांच्या बरोबर झालेल्या संघर्षात शिवाने या मातृकांना सहाय्य करण्यासाठी आवाहन केले होते.



**^** चित्र क्र १ सप्तमातृका आणि सर्वात उजवीकडे महादेव




**^** चित्र क्र २ आठ सप्तमातृका

आख्यायिका आणि दंतकथांशिवाय कुठलाही इतिहास पूर्ण होत नाही. समाज व्यवस्था स्वीकारली जाण्याआधीच्या अगदी आदिम काळांत म्हणजे टोळीने रहाणाऱ्या आणि मातृसत्ताक व्यवस्थेतील मातृदेवता, या संकल्पनेचा संदर्भ काही अभ्यासकांनी या सप्तमातृका देवतांशी जोडला आहे. या देवतांचा उल्लेख असंख्य क्रिया-कर्म (काहीवेळा अघोरी) यांच्याशी जोडला गेला आहे. अग्नी देवाच्या माता

किंवा बहिणी – अग्नी देवाच्या सात जिव्हा, असाही उल्लेख काही संहितात सापडतो. **देवता आणि असुरांच्यातिल नियमित होणारे संघर्ष** या मूळ विषयवस्तूला पूरक अशा या देवतांच्या व्यक्तिमत्व संकल्पना आहेत. काही सहस्त्र वर्षांच्या प्रगतीमधे, प्रत्येक संहिता लेखकाने काढलेला अर्थ – केलेले अनुमान वेगळे असणे साहजिक आहे.






^ चित्र क्र ३ सप्तमातृका ^ चित्र क्र ४ त्यांचा परिचय

**तमिळनाडू**मध्ये अश्विन नवरात्री उत्सवात, **बोम्माई कोलू** या नावाने एक पारंपरिक समारंभ कुटुंबातील मुली आणि महिला साजरा करतात. घरातील एखाद्या कोनाड्यात अथवा मांडणीत देवी-देवतांच्या बाहुल्या मांडल्या जातात. अनेक मुली त्यांच्या आवडीच्या देवींच्या बाहुल्या किंवा खेळातल्या बाहुल्या बनवतात आणि त्याची सजावट आणि आरास केली जाते. कुटुंबातील आणि परिचयातील मुली - महिलाना निमंत्रित केले जाते आणि तांबुल समारंभ साजरा होतो. यावेळी **सुन्दल** हा पारंपरिक गोड पदार्थ बनवला जातो. यावेळी कुमारिकांना (ब्रह्मचारिणी) निमंत्रित केले जाते आणि त्यांना खाऊ आणि कपडे भेट दिले जातात. मराठी हळदी-कुंकू

समारंभासारखाच हा समारंभ असतो. चित्र क्र ३ आणि चित्र क्र ४ मधील सप्तमातृकांच्या बाहुल्यांची आरास **बोम्माई कोलू** समारंभातील आहे.

सोम अर्थात एक प्रकारचे औषध अथवा एक प्रकारचे मद्य बनवणाऱ्या देवता असाही सप्तमातृका संदर्भातला वेगळा उल्लेख उपलब्ध आहे. काही अभ्यासकांच्या मते, या गावाच्या संरक्षक देवता आहेत. सर्पदंश आणि विषबाधेवर उपचार करणाऱ्या देवता असाही उल्लेख केला गेला आहे. आदिम कालीन मातृसत्ताक व्यवस्थेत, स्त्रीला मुलाच्या जन्माचे वेळी मदत करणाऱ्या अनुभवी सुइणी असाही यांचा परिचय दिला गेला आहे. सप्तमातृकांचे हे सर्व परिचय लोकश्रुती – लोकापवाद – लोकश्रद्धा अशा स्वरूपाचे आहेत हे नक्की. वेदकालीन गणितात **सात** या संख्येला फार महत्व होते. **सप्तलोक – सप्तपाताळ – सप्तस्वर – सात दिवस – सूर्याचे सात घोडे, अशाच या सप्तमातृका असाही एक संकेत यातून मिळतो.**



**^** चित्र क्र ५ ब्रम्हाणी



**^** चित्र क्र ६ चंडिका

**चित्र क्र ५ देवी ब्रह्माणी** चार मुख – चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा – दोन हातांत कमंडलू आणि अक्षमाला – वाहन हंस. **चित्र क्र ६ चंडिका (चामुंडा)** - चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा – दोन हात कवटी आणि त्रिशूळ – तीन डोळे आणि गळ्यात कवटीमाला – वाहन सिंह (घुबड - कुत्रा-गिधाड-प्रेत अन्य वाहने),

प्रथमतः हे समजून घ्यायला हवे की पालक – शिक्षक – संरक्षक असलेल्या देवी-देवता आणि यांच्याबरोबरच उपद्रवी असलेल्या पिशाच्च आणि भूतयोनीतील, पारलौकिक – अतींद्रिय शक्ति आणि क्षमता असलेल्या सर्व देवी-देवतांना, मातृदेवतांचा मान दिला गेला आहे. सप्तमातृका यांचा संदर्भ काही वेळा असा आही की अशा पिशाच्च आणि भूतयोनीतील स्त्रीया, लहान बालकांवर प्रतिकूल – विपरीत संस्कार करतात. लोकश्रुती आणि लोकश्रद्धे मध्ये याला **मुलांना दृष्ट लागते** असे संबोधन वापरले जाते. **श्रद्धा** आणि **भक्ति** या दोन प्राथमिक भावना, भारतीय समाजाची मूलभूत गुणवत्ता आहे. आपल्या अपत्यावरील प्रेम आणि लोकश्रुती आणि श्रद्धा यांच्या दबावामुळे यांत मुलाच्या आईच्या, **करुणा** आणि **वात्सल्य** या दोन भावना सुद्धा अशावेळी प्रभावी ठरतात. लहान बालकाची आई अशावेळी तर्कसंगत विचार न करता, श्रद्धा भावनेने विचार करते. यामुळेच पिशाच्च आणि भूतयोनीतील उपद्रवी स्त्रीयांनांसुद्धा मातृदेवतेचा दर्जा दिला गेला. वैदिक – पुराणिक – आगम – ब्राह्मणके या सर्व साहित्यातील कालानुरूप नव्याने जोडलेले संदर्भ आणि भारतातील प्रदेशागणिक बदलणाऱ्या लोकश्रुती – लोकश्रद्धा, यामुळे प्रभावित झालेली मातृदेवता ही संकल्पना, सतत उत्क्रांत होत राहिली आहे.



^ चित्र क्र ७ इंद्राणी



^ चित्र क्र ८ कौमारी

**चित्र क्र ७ इंद्राणी** तीन डोळे - चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा – दोन हात वज्र आणि पाश – वाहन ऐरावत, **चित्र क्र ८ कौमारी** चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा – दोन हात आयुध आणि पाश – वाहन मोर,

भागवत पुराणात महादेवाच्या सोबत असलेल्या त्याच्या सहकारी भूतगणांच्या परिचयात या सप्तमातृकांचा उल्लेख उग्र – राक्षसी – पिशाच्च – भूतगण – डाकिणी – वेताळ अशा द्वेषपूर्ण, भयकारी रूपातील उपद्रवी देवता असा केला गेला आहे. (भागवत पुराण २.१०.३७-३९ आणि १०.८३.६.*ff*)

**स्वच्छंद तंत्र** आणि **योगिनी हृदय** या दोन तंत्रशास्त्र विषयक (वैदिक नव्हे) संहितांमध्ये त्यांच्या शरीरमुद्रा – हस्तमुद्रा – आसन मुद्रा – आयुधे – शस्त्रे – अवजारे – वाहने यांचे विस्ताराने केलेले वर्णन वाचता येते. या सर्व मातृका ललितासन मुद्रेत आसनस्थ आहेत. त्यांच्या गळ्यात हार आणि कंठी – हातांत अनेक कंकणे – कानांत वर्तुळाकार कर्ण आभूषणे अशा सर्व देवता अलंकृत आहेत.


^ चित्र क्र ९ महेश्वरी


^ चित्र क्र १० वैष्णवी


^ चित्र क्र ११ वाराही

**चित्र क्र ९ महेश्वरी** तीन डोळे - चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा – दोन हात त्रिशूळ आणि अक्षमाला – वाहन नंदी, **चित्र क्र १० वैष्णवी** चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा - दोन हात चक्र आणि शंख – वाहन गरुड, **चित्र क्र ११ वाराही** तोंड वराहाचे - चतुर्भुज मुद्रा दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रा – दोन हात नांगर आणि दंड – वाहन रेडा.

सप्तमातृका या संकल्पनेचा अभ्यास करतांना एका बहुआयामी मूलभूत मांडणीचा परिचय होतो. आपल्या विद्वान पूर्वजांनी **मानवी शरीर – मन – बुद्धी** या सर्वांचा सखोल अभ्यास केला होतं. देवी-देवतांना आणि त्यांच्या व्यष्टिनां मानवी शिल्प – मूर्ती – चित्र प्रतिमा या रूपात साकार करतांना त्यांचा मानवी शरीर आणि निसर्गाचा अभ्यास प्रतीत होतो. मात्र या देवतांची मानवी रूपातील व्यक्तिमत्व संकल्पना मांडतांना, आपल्या पूर्वजांनी केलेल्या, **मानवी बुद्धीचे अगणित आयाम आणि अमर्याद क्षमतेचा केलेला अभ्यास** आपल्याला अचंबित करतो. या देवतांच्या

स्वभाव व्यष्टिच्या संकल्पना साकारताना, **मानवी मन आणि अहंकार (अस्तित्व) भावनेचा, मनोव्यापार आणि मनोविज्ञानाचा** केलेला अभ्यास असाच प्रगत आणि प्रगल्भ आहे. या सप्तमातृकांच्या अमूर्त संकल्पनेचा आणि शिल्प – मूर्ती – चित्र प्रतिमा यांचा संदर्भ समजून घेताना, पूर्वजांच्या या अभ्यासाचा प्रभाव जाणवतो. यातील प्रत्येक देवतेच्या व्यक्तिमत्वाला एक स्वभाव वैशिष्ट्य जोडले आहे.

यातील प्रत्येकीची भावना वेगळी आहे. खरे म्हणजे हे मानवी स्वभावातले षड्रिपू किंवा अवगुण आहेत. **योगेश्वरीची काम भावना – महेश्वरीची क्रोध भावना – वैष्णवीची लोभ भावना – ब्रह्माणीची मद भावना – कौमारीची मोह भावना – इंद्राणीची मत्सर भावना – चामुंडा देवीची अफवा पसरवणे भावना – वाराहीची असूया भावना .. .. असे या देवतांचे अवगुण आहेत.** मातेसमान मानल्या गेलेल्या आपल्या देवता नेहेमीच सज्जन – शांत – प्रेमळ – आकर्षक – उपकारक हव्या ही आपल्या मनाची आणि बुद्धीची अपेक्षा असते. मात्र आधी वर्णन केलेल्या देवी महाकाली – महिषासुरमर्दिनी – देवी चामुंडा आणि या सप्तमातृका यांच्या मानवी रूपातील संकल्पना आणि त्यातील मानवी शरीर – मन – बुद्धी याच्या अभ्यासाचा सर्वसमावेशक मूर्त आणि अमूर्त अंतिम परिणाम, या संकल्पना पूर्ण असल्याची जाणीव आपल्याला देतो.

या विषयाच्या सगळ्या अभ्यासात इथे आपला एक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. आपली प्राचीन भारतीय प्रादेशिक विविधता असलेली समाजजीवनशैली, व्यक्तिनिष्ठ कुटुंबव्यवस्था, असंख्य भाषा आणि परकोटीची विषम भौगोलिक परिस्थिति, प्रमाणसिद्ध आणि सत्याधारीत नोंदी आणि संदर्भ साहित्य याची काहीशी कमतरता, हे वास्तव आपल्याला स्वीकारायलाच हवे. या बरोबरच या सर्वांचा भाग असलेली वरकरणी बहूईश्वरवादी असल्यासारखे वाटणारी मात्र प्रत्यक्षात एकेश्वरवादी

आणि बहुआयामी हिंदू धर्म प्रणाली, अशा या सर्व परिस्थितीत, विषयाची आपली समजूत आणि ज्ञान कमी पडते आहे याची निश्चित जाणीव आपल्याला हवी.

या सप्तमातृकांचा आपल्या संस्कृत – हिन्दी – मराठी वर्णमालेचा एक खूपच तर्कनिष्ठ आणि प्रगत संदर्भ भाषाविज्ञानाशी जोडला गेला आहे अशी एक लोकश्रद्धा आहे. **क – च – ट – त – प – य – ष** असे आपल्या देवनागरी वर्णमालेतिल **व्यंजनांचे सात गट** आहेत. या सप्तमातृका **व्यंजनांच्या सात गटाची** प्रतीके आहेत. या व्यंजनांत जेंव्हा आपल्या **आवाजासह स्वर** जोडले जातात तेंव्हा त्या उच्चारातून सप्तमातृकांसह योगेश्वरी अशा आठ मातृकांची ऊर्जा प्राप्त होते.

वर्तमानातील आपल्याला उपलब्ध संपर्क व्यवस्था – आपले शिक्षण आणि शिक्षण व्यवस्था आणि त्यातून तयार झालेल्या आपल्या समजुती – आपल्यावर अनाहूतपणे प्रभाव टाकणाऱ्या राजकीय विचारसरणी .. .. या सर्वांचा परिणाम आपल्या तार्किक विवेकबुद्धीवर नक्कीच होतो. प्राचीन पौराणिक साहित्यातील वर वर्णन केलेले संदर्भ आपल्याला अतार्किक वाटू शकतात. प्रत्यक्षात वर वर्णन केलेल्या सप्तमातृकांच्या प्रत्येक संदर्भामध्ये, कमी-जास्त प्रमाणात नक्कीच काही सत्य आणि तथ्य आहे. हे वर्णन काही सहस्त्र वर्षांपूर्वी प्रचलित असलेल्या समाज आणि त्यातील कुटुंबव्यवस्थेचे आहे, जो इतिहास आपल्याला ज्ञात नाही. या लिखित साहित्यावर – लोकश्रुती – लोकश्रद्धा – परंपरा यांच्यावर सुद्धा प्रतीके – रुपके – चिह्न यासर्वांचा निश्चित प्रभाव आहे ज्याची योग्य पडताळणी आज आपण करू शकत नाही. या विषयात अनेक विद्वान अभ्यासकांनी संशोधन – लेखन केले. मात्र प्रत्येकाच्या अनुमानात फरक आहे कारण **प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र आणि चिह्नसंकेतांचा अभ्यास नेहेमीच तात्विक आणि सैद्धांतिक असतो. (Speculative)**.

# चौसष्ट योगिनी

वेदीक साहित्य आणि त्यानंतर उपनिषदे या प्राचीन लिखित संहितानी, नागरिक आणि समाजासाठी, वैदिक नितीमत्तांचे आणि दैनंदिन व्यवहारांचे मार्गदर्शन करणारे साहित्य निर्माण केले. हे साहित्य प्रज्ञता – विज्ञान – तत्वज्ञान या भारतीय विद्वत्तेच्या तीन स्तंभांवर रचले होते. नंतरच्या काळातील धर्म संकल्पनेचे, हे साहित्य मूलाधार होते यालाच **निगम** म्हटले गेले. कर्म – ज्ञान – उपासना यांचे मार्गदर्शन या निगमामध्ये (वैदिक साहित्य – उपनिषदे) विस्ताराने केले गेले. या वैदिक **निगम** साहित्यातिल संकल्पनांना उपायभूत साधने सुचवणारे मार्ग आणि त्यांचे साहित्य याला **आगम – आगमिक साहित्य - आगमिक तंत्र** असे संबोधित केले गेले. समाजातील काही पंथ – उपपंथ – संप्रदायांना, वैदिक साहित्यातील मार्गदर्शन स्वीकृत नव्हते. त्यांनी **आगम – आगमिक साहित्य - आगमिक तंत्र** प्रमाण मानले आणि वेगळा संप्रदाय स्थापन केला ज्याला **आगमिक तंत्र** किंवा **तांत्रिक संप्रदाय** म्हणून संबोधित केले गेले.

वैदिक धर्म संप्रदाय आणि त्यातील तत्वज्ञान स्वीकृत असूनही त्यात **वैष्णव आगम – शैव आगम – शाक्त आगम** असे **तांत्रिक** उपपंथ आहेतच. जैन धर्म संप्रदायानेही **आगमिक तंत्र पूजेचा** पर्याय स्वीकारला आहे. बौद्ध धर्माच्या **वज्रयान** पंथामधेही **आगमिक तंत्र पूजेसारखाच उपासना** उपचार प्रचलित आहे**. चौसष्ट योगिनी मातृदेवता** हा आपला आजचा विषय आहे. हे **वैदिक धर्म संप्रदाय** आणि **तंत्र अथवा तांत्रिक संप्रदाय** अशा हिंदू धर्म प्रणालीच्या निश्चित वेगळ्या दोन संप्रदायांच संक्षिप्त परिचय देण्याचे प्रयोजन, म्हणजे आपला आजचा विषय आहे.

**मातृदेवता म्हणून मान्यताप्राप्त असल्या तरी या चौसष्ट योगिनी, सर्वसामान्य उपासक – साधक – दर्शकांना फारशा परिचित नाहीत हे वास्तव आहे.**

आराध्य देवी-देवतांची उंच कळस असलेली भव्य मंदिरे – देखणे प्रवेशद्वार – मोठे सभामंडप – मात्र छोटे प्रवेशद्वार असलेली गर्भगृहे – त्यात छोट्या अंधाऱ्या जागेत स्थापित मुर्ती....हे आपल्या हिंदू धर्मप्रणालीतिल प्रार्थना स्थळांच्या वास्तु स्थापत्याचे वैशिष्ट्य आहे. **चौसष्ट योगिनिंची** मंदिरे मात्र पूर्ण वेगळ्या स्थापत्यशैलीमधे निर्माण झाली आहेत. सुबक वर्तुळाकार तरीही भव्य परीघ असलेले उंचीला ठेंगणे बांधकाम – भरपूर प्रकाश – प्रत्येक मूर्तीचे सहज दर्शन – कुठलेही छत नसलेली ही मंदिरे, ख्रिस्तपश्चात आठव्या – नवव्या शतकात बांधली गेली आहेत. हिंदू देवी देवतांची मंदिरे नेहेमी शहराच्या मध्यवर्ती गजबजलेल्या ठिकाणी असतात. मात्र चौसष्ट योगिनींची मंदिरे, अडचणीची वाट असलेल्या, फारशी वर्दळ नसलेल्या उंच डोंगरावर आहेत, हे त्यांचे दुसरे वैशिष्ट्य आहे. वर्ष १९५३ मधे ओडिशा राज्य संग्रहालयाच्या श्री केदारनाथ महापात्रा यांनी या मंदिराचा विस्ताराने अभ्यास केला.



^ चित्र क्र १ योगिनी मंदिर हरिपूर बाह्य रचना



^ चित्र क्र २ योगिनी मंदिर हरिपूर अंतर्गत रचना




^ चित्र क्र ३ योगिनी मंदिर प्रवेश द्वार




^ चित्र क्र ४ अंतर्गत रचनेत मध्यभागी भैरव मुर्ती मंडप

या मंदिराच्या भिंती आयताकृति दगडाच्या आहेत, त्यांना कुठलेही नक्षीकाम – कोरीवकाम केलेले नाही. मंदिरात प्रवेश करण्यासाठी दरवाजा इतका चिंचोळा आहे की एका वेळी एकच व्यक्ति कमरेत वाकूनच आत प्रवेश करू शकते. आत गेल्यावर मात्र या वर्तुळाकार मंदिराची भव्यता अचंबित करते. या मंदिराच्या वर्तुळाकार स्थापत्यशैलीचे काही निश्चित चिह्नसंकेत आणि संकेतमूल्य आहेत. (चित्र क्र ५ आणि ६) यातला **चिह्नसंकेत** असा की हे भूमितीय वर्तुळ ब्रह्मांडाचे आणि आपल्याला डोळ्यांनी दिसतो त्या सूर्याचे रुपक आहे. वर्तुळाच्या आत पूर्णत्व मूर्त स्वरूपाचे म्हणजे डोळ्यांना दिसणारे आहे आणि त्याचवेळी वर्तुळाबाहेरचे विश्व आणि त्याचे अपूर्णत्व अमूर्त आहे, आपल्या जाणिवांपलिकडचे आहे. वर्तुळाच्या मध्यभागी स्थापित असलेल्या भैरवाचे या विश्वाच्या निसर्गचक्र व्यवाहारांवर पूर्ण नियंत्रण आहे. दर्शकासाठी यांचे **संकेतमूल्य** असे की या विश्वाच्या केंद्रस्थानी आपण आहोत आणि त्या विश्वाची पूर्ण ऊर्जा आपल्याला मिळते आहे. विश्वाची ऊर्जा वर्तुळाच्या केंद्रस्थानी संकलित होणाऱ्या या वर्तुळाकार संकल्पनेचा चतुर वापर, आपल्या देशाच्या व्यवहारांचे नियंत्रण करणाऱ्या आपल्या माननीय संसदेच्या इमारतीच्या स्थापत्यामधे केला गेला आहे. अगदी रामायण काळापासून (ख्रिस्तपूर्व साधारण बारा हजार वर्ष) आपल्यासाठी पवित्र असलेल्या जागा अथवा विषयवस्तु भोवती वर्तुळ आखले जात असे. या वर्तुळामुळे ती पवित्र जागा अथवा व्यक्ति सुरक्षित होत असे. **सीतामाई एकटी**

**असतांना बंधु लक्ष्मणाने आपल्या बाणाने काढलेल्या लक्ष्मणरेषेचा संदर्भ प्रत्येक हिंदू धर्मबांधवाच्या चित्त+वृत्तीमधे चिरंतन स्मरणबद्ध झाला आहे.** आपण देवाला नेवेद्य दाखवतांना आधी पाण्याने छोटे वर्तुळ काढतो आणि मगच नेवेद्याची वाटी – ताट देवासमोर ठेवतो. जेवण सुरू करायच्या आधी आपण आपल्या ताटाभोवती पाण्याचे वर्तुळ काढतो. हे सर्व उपचार तंत्र साधनेची वैशिष्ट्ये आहेत.



^ चित्र क्र ५ वर्तुळ




^ चित्र क्र ६ वर्तुळमध्यावर बिंदु

योगिनींचा उल्लेख करताना नेहमी चक्राचा (वर्तुळ हे भूमितीय चिह्न) वापर केला जातो. चौसष्ट योगिनींची मंदिरे ओडिशा – मध्यप्रदेश – उत्तरप्रदेश या मध्य भारतातील तीन राज्यात स्थापित आहेत. दिल्ली शहर, पूर्वी **योगिनीपुर** या नावाने ओळखली जात असे. आजही दिल्ली शहरात **योगिनीमाया** हे पुरातन मंदिर स्थापित आहे. चौसष्ट योगिनींची उपासना - साधना सामान्यतः मध्यरात्रीच होते. तंत्र संप्रदायातील तांत्रिक गुरु, साधकांना या उपासनेसाठी मार्गदर्शन करतात. समाजातील मुख्य धारेपासून या साधकांचे अस्तित्व दूर असल्यामुळे याची निश्चित जाणीव सामान्य भक्तिमार्गी दर्शकाला होत नाही.

या मंदिराच्या अंतर्भागात मध्यभागी, महादेवाच्या भैरव विग्रहातली चार मूर्ती आणि चार योगिनींच्या मूर्ती स्थापित होत्या. त्यातील चार योगिनींच्या मूर्ती नष्ट केल्या गेल्या. पूर्ण वर्तुळाकृती मंदिरांच्या आतल्या बाजूला सहा-सात फुट उंचीच्या साठ

कोनाड्यात साठ योगिनींच्या मूर्ती स्थापित आहेत. मंदिराच्या अंतर्भागात कुठल्याही प्रकारचे नक्षीकाम – कोरीवकाम नाही मात्र भैरव आणि चौसष्ट योगिनींच्या काळ्या पाषाणातील साधारण दोन फुट उंचीच्या मूर्ती खूप सुंदर आहेत. या सर्व शृंगारिक मुद्राधारी मुर्ती,  कान, गळा, हात कंबर आणि पाय अशा पूर्ण शरीरावर अलंकाराने नटलेल्या आहेत. मात्र काहींचे तोंड घोड्याचे, काहींचे सशाचे, काहींचे मोठी आयाळ असलेल्या हिंस्त्र पशूचे आहे. यातील सर्व मुर्ती  वेगवेगळ्या मृत अथवा जीवंत पशू आणि मानवी देहांवर उभ्या आहेत. (चित्र क्र ७–८–९–१०–११)






**^** योगिनी चित्र क्र ७ **^** चित्र क्र ८ **^** चित्र क्र ९ **^** चित्र क्र १०

काही साधकांसाठी मातृदेवता म्हणून आराध्य असलेल्या मात्र सामान्य उपासक – साधक – दर्शकाला फारशा परिचित नसलेल्या या मूर्ती आणि या चौसष्ट योगिनी नेमक्या कोण आहेत..?.. श्रद्धावान आणि भक्तिमार्गी दर्शकांसाठी यांचे प्रयोजन नेमके काय आहे..?.. या देवतांना आराध्य मानणारे साधक कुठल्या पंथ-संप्रदायातील आहेत..?.. असे प्रश्न आपल्याला नक्कीच पडतात..! वात्स्यायन कृत कामशास्त्र ग्रंथातील चौसष्ट कामक्रीडांच्या तंत्रातील या रुपक देवता आहेत असाही एक संकेत मिळतो.

हिंदू धर्मप्रणालीमधील **शाक्त संप्रदाय** हा वर वर्णन केल्यानुसार **तंत्र किंवा तांत्रिक संप्रदाय** म्हणून आपल्याला परिचित आहे. स्त्री + पुरुष अर्थात शक्तितत्व + शिवतत्व या अर्धनारीनटेश्वर नटराजाचे नादांतनृत्य शैलीतील हे नृत्य, पृथ्वीच्या हृदयस्थानातील अणुरेणुनां पूर्णत्व देणारे नृत्य आहे. नटराजाच्या या मुद्रेतिल त्याच्या शक्तितत्वाची अर्थात देवी महाकालीची उपासना – आराधना – साधना, ही **शाक्त संप्रदायाची परंपरा आहे.** बंगाल – ओडिशा – बिहार – आसाम या पूर्वेकडील राज्यात, देवी महाकालीची उपासना आश्विन महिन्यातील नवरात्रात केली जाते.

याच शाक्त संप्रदायामधे एक **वाममार्गी** उपपंथ आहे. **सुंदर – सरस – रोचक उपासना मार्ग** असा यातील **वाममार्गी** या संबोधनाचा अर्थ आहे. **वाममार्गी** या **अवैदीक (वैदिक तत्वज्ञान न मानणारे) उपपंथामधे मत्स्य-मांस भक्षण, मद्य सेवन – धान्यप्राप्ती – मुक्त लैंगिक व्यवहार ही या पंथाची स्वीकृत संस्कृति आहे.** यालाच शाक्त संप्रदायाचा **मधुर मार्गी पंथ** म्हटले जाते. याच शाक्त संप्रदायाचा **दक्षिणमार्गी वैदिक** असा वेगळा उपपंथ आहे. यामधे **कालीमाता – शिव – विष्णु यांची उपासना – साधना, वेगळ्या तांत्रिक उपासना पद्धतीने होते.** याला शाक्त संप्रदायाचा **सरल मार्गी पंथ** म्हटले जाते. सामान्य श्रद्धावान आणि भक्तिमार्गी साधक आणि दर्शकांना यांचा विशेष परिचय नाही कारण हे सर्व तंत्र मार्गी – तांत्रिक संप्रदायातील साधक नेहेमीच समाजप्रवाहापासून दूर, पडद्याआड राहिले आहेत.



^ योगिनी चित्र क्र ११

काही लोकश्रुतीनुसार या योगिनी, श्रीकृष्णाच्या नासिकेतून त्याच्या उच्छवासातून निर्माण झाल्या आहेत. अन्य लोकश्रुतीनुसार शिवतत्व म्हणजे प्रत्येक पुरुष ३२ विद्या आणि कला आणि शक्तितत्व म्हणजे प्रत्येक स्त्री ३२ विद्या आणि कला धारण करतात. म्हणजेच दोघेही अपूर्ण आहेत म्हणून त्यांचा संयोग होऊन चौसष्ट योगिनी संपन्न होतात.

सामान्यतः अभिजन समाजात, **योगिनी** या शब्दाचा अर्थ योगविद्या पारंगत अथवा योग अभ्यास शिकवणारी महिला असा घेतला जातो. मात्र या चौसष्ट योगिनींना यक्षिणी असेही संबोधले जाते. हरिपूर मधील या मंदिरांच्या आसपासच्या परिसरात, योगिनीं संदर्भात अनेक लोकश्रुती आणि लोकश्रद्धा प्रचलित आहेत. या सर्व विद्या देवता आहेत आणि चार मुख्य दिशांना आठ आणि चार उपदिशांना आठ अशा एकूण आठ दिशांच्या चौसष्ट योगिनी क्षितिजावर निवास करतात म्हणून त्यांची मंदिरे वर्तुळाकार आहेत आणि त्यावर छत नसल्याने क्षितिजावर त्यांचे दर्शन नियमित होते. तंत्रविद्या आणि त्याचे योग यांचे सोळा प्रकार असून, प्रत्येक तंत्रविद्येचे चार प्रकार

आहेत, म्हणून योगिनींची संख्या चौसष्ट आहे अशी एक लोकश्रद्धा आहे. दुसऱ्या लोकश्रद्धे नुसार, रक्तबीज आणि अंधकासुर या दोन असुरांच्या संघर्षाचे वेळी या योगिनींनी त्या असुरांच्या रक्ताचा प्रत्येक थेंब पिऊन टाकला आणि तो जमिनीवर पडू दिला नाही म्हणून यासर्व देवी महाकालीच्या चौसष्ट विग्रह प्रतिमा आहेत. या प्रत्येक योगिनीला **जारण – मारण – उच्चाटन – वशीकरण – जादू – इंद्रजाल** या अघोरी तंत्र विद्या अवगत असतात. **सुर सुंदरी – कनकवती – मनोहरा – कामेश्वरी – रतीसुंदरी – पद्मिनी – नंदिनी – मधुवंती या यातील प्रमुख योगिनी आहेत.**

तंत्र ज्योतिषशास्त्रामधे योगिनी दशा असा एक उल्लेख आहे. यातिल **मंगला – पिंगला – भद्रीका – भ्रामरि – धान्या – संकटा – सिद्धा – उल्का** या आठ योगिनींच्या अनुक्रमे १ – २ – ३ – ४ – ५ – ६ – ७ – ८ वर्ष, अशा एकूण ३६ वर्षांच्या दशांचा हा उल्लेख आहे. विशिष्ट नक्षत्रात जन्माला आलेल्या व्यक्तींना या दशा प्राप्त होतात. यातिल काही दशा अपायकारक तर काही उपकारक समजल्या जातात. या संकल्पनेवर श्रद्धा असणाऱ्या साधकांना, तांत्रिकाकडून या दशांवर काही साधनांनी उपचार करण्याची प्रथा आहे.

आधीच्या लेखांत विस्ताराने परिचय झालेल्या मातृदेवता, चौसष्ट योगिनींपेक्षा खूपच वेगळया व्यक्तिमत्वाच्या आहेत. त्या मातृदेवतांना देवतेचा दिलेला दर्जा, **श्रद्धा आणि भक्ति** या उपासकाच्या आणि अर्थात समाजमनाच्या दोन धारणा याच्या निश्चित प्रभावामुळे परंपरेने दिला गेला आहे. **सप्तमातृका – चौसष्ट योगिनी** यांना देवत्व देताना, **श्रद्धा आणि भक्ति** या **परंपरांपेक्षा, अज्ञान – अचंबा – भीती आणि अंधश्रद्धा** या धारणा जास्त प्रभावी झाल्या आहेत याची अस्पष्ट जाणीव होते...!

--००--

# शैव आणि शाक्त

मातृदेवतांचा अभ्यास मांडतांना एक सत्य प्रथम स्वीकारले जाते की ही देवता जननी आहे – जन्मदात्री आहे – आई आहे. आणि मातृत्व प्राप्तीसाठी या स्त्रीतत्वाला पुरुषतत्वाशी संयोग होणे आवश्यक असते. आपल्या वेद आणि उपनिषदांत यांचा उपासना आणि साधना अभ्यास, विस्ताराने मांडला गेला आहे. उपासनेची साधने निर्माण करणाऱ्या भिन्न संप्रदायांच्या भिन्न कालखंडात लिहिलेल्या तंत्र आणि तांत्रिक साहित्यामधील **शिव आणि शक्ति** अर्थात **शिवतत्व आणि शक्तितत्वाचा** आढावा घेणे फार रंजक आहे. प्रामुख्याने या तांत्रिक साहित्यात **शिव** आणि **शक्ति** संदर्भात तीन वेगळ्या संकल्पना मांडलेल्या आहेत. या नात्यातूनच **मातृदेवता** संकल्पनेचा विस्तार कसा झाला त्याचा आलेख चित्रित होतो.

मानव जन्म मिळाल्यानंतर, या सृष्टीचे आणि आपल्या मानवजन्माचे प्रयोजन आणि त्याचे **अंतिम सत्य** काय आहे याचा, प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे शोध घेत असतो. ही परंपरेने आलेली तत्वनिष्ठ समाजातील लोकधारणा आहे. **शिवतत्व आणि शक्तितत्वाचा** या **अंतिम सत्य संकल्पनेत कुठलाही सहभाग नाही** हा, प्रामुख्याने तंत्र साहित्यातील **पहीला दृष्टिकोन** आहे. या पहिल्या संकल्पनेतील अंतिम वास्तव असे आहे की, शिव आणि शक्ति, **यमल स्थितित** अथवा युग्मधर्मात पूर्ण तटस्थ आहेत. (**यमल स्थिति** म्हणजे कायम एकत्र असलेली, परस्पर अवलंबीत असलेली जोडी). यालाच शिव – शक्ति तत्वाची **समरस्य युग्म** मानले गेले – जे एकमेकांना समर्पित आहेत, एकमेकांचे समर्थक आहेत – एकमेकांत समरस आहेत – फक्त एकमेकांना समागमीत आहेत. जसे .. एकाच परिस्थितीच्या पूरक दोन बाजू

आहेत. एक स्थिर – अचल तर दुसरे गतिशील – चेतनादायी, एक नकारात्मक तर दुसरे सकारात्मक, एक अमूर्त तर दुसरे मूर्त, अंतिमतः एक पुरुषतत्व तर दुसरे स्त्रीतत्व. **महायान बौद्ध संप्रदाय तंत्रात याला अद्वय बोधिचित्त असे संबोधित केले गेले आहे.**

ही अंतिम सत्याच्या शोधकार्यातील **शून्य स्थिति** आणि **करुणेची अनुभूति** आहे. बौद्ध तंत्रात यालाच **प्रज्ञा** म्हणजे **अंतिम ज्ञान प्राप्ती** आणि **उपाय** म्हणजे अंतिम **सत्याची सुलभ जाणीव** असे म्हटले आहे. बौद्ध तंत्रातील **प्रज्ञा** आणि **उपाय**, हे हिंदू तंत्र संप्रदायाच्या अंतिम सत्यचा शोध घेणाऱ्या **शिव** आणि **शक्ति** या संकल्पनांची अगदी समान रुपके आहेत.

शिवदेवता आणि शिव तत्व हेच अंतिम सत्य आहे. शक्ति आणि शक्तितत्व हे निरंतर काळ याच शिवतत्वाचा एक भाग आहे, हा हिंदू तंत्र संप्रदाय साहित्यातील **दुसरा दृष्टिकोन** आहे. मात्र शिव आणि शक्ति एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. शिवाने धारण केले तरच शक्तिला शक्ति म्हणून स्वीकारले जाते. आणि शक्तिला धारण केल्याशिवाय शिव, शवासारखा निष्प्राण होतो. हिंदू धर्म प्रणालीतील **शैव संप्रदाय** साधकांना हा **दुसरा दृष्टिकोन** स्वीकृत आहे. या संप्रदायातील साधक, **योनिस्थीत लिंग** या शिवशक्तीच्या प्रतिकाची आणि मानवी रूपातील शिव अर्थात महादेवाची उपासना – साधना – पूजा करतात. वर्तमानात, **सदगुरु श्री जग्गी वासुदेव** हे विद्वान शिवभक्त, कोईमतूर मधील त्यांच्या भव्य आश्रमात, शैव संप्रदायाच्या शिवतत्वाचा– शिवभक्तिचा विज्ञाननिष्ठ परिचय, त्यांच्या व्याख्यानातून, शैव साधकांना करून देतात. महाशिवरात्रीच्या निमित्ताने, आगमीक तंत्र उपासना साधनांच्या, श्राव्य – दृश्य – नृत्य – संगीत यांच्या पारंपरिक रंजक सादरीकरणातून, सामान्य साधक आणि

दर्शकाला या उपासना साधनांचा योग्य परिचय होतो आणि त्या उपासना पद्धतींचा अंतिम परिणाम याची अनुभूति होते. (चित्र क्र १ आणि २).





**^**चित्र क्र१ शैव साधक **^** चित्र क्र२ आदियोगी, सदगुरु आश्रम, कोईमतूर

हिंदू तंत्र संप्रदाय साहित्यातील **तिसरा दृष्टिकोन**, शक्ति आणि शक्तितत्वाला अंतिम सत्याचा मार्ग म्हणून स्वीकारतो आणि शिव आणि शिवतत्वाला, याच शक्तितत्वाचा एक अविभाज्य भाग मानतो. या **तिसऱ्या दृष्टीकोनानुसार,** धारण केली जाते म्हणून शक्ति आणि शक्तितत्व प्राथमिक महत्वाचे आहे. धारणकर्ता शिव आणि त्यांचे शिवतत्व शक्तिचा भाग आहे. कारण या धारणकर्त्या शिवाची ऊर्जा आणि चेतना देणारी हीच **शक्ति** आहे. नेमक्या याच दृष्टीकोनातून **मातृदेवता** संकल्पना स्वीकृत असलेले **शाक्त संप्रदाय** साधक **मातृदेवता** म्हणून शक्ति आणि शक्तितत्वाला, स्त्रीतत्वाला प्रमुख देवता म्हणून स्वीकारतात आणि शिवदेवता आणि शिवतत्वाला दुय्यम देवतेचे स्थान देतात. नादांतनृत्य शैलीतील नटराज विग्रहात, शिवदेवता अर्धनारीनटेश्वराच्या विग्रहात अवतीर्ण झाले. आज वर्तमानकाळात सुद्धा नटराजाच्या अद्वैताचा अनुभव निश्चितच सहज उपलब्ध आहे. बंगाल मधील **शाक्तपंथीय** परंपरेनुसार, नटराजाच्या डाव्या शरीरातील **मातृभाव** अवस्थेतील देवी महाकालीची उपासना – आराधना – साधना – पूजा आजही मोठ्या उत्साहात केली जाते. (चित्र क्र ३).

^ चित्र क्र ३ बंगाल काली महोत्सव ^ चित्र क्र४ बंगाल पारंपरिक ^सिंदूर खेला चित्र क्र ५

शाक्तपंथिय धारणेनुसार, शिवतत्व म्हणजे पुरुषतत्व पांढरा रंग धारण करते तर शक्तितत्व म्हणजे स्त्रीतत्व लाल रंग धारण करते. या नवरात्रि उत्सवात बंगाली महिला लाल काठाची पांढरी साडी नेसतात आणि एकमकींना लाल सिंदूर (कुंकू) लावून आपले सौभाग्य साजरे करतात. विसर्जनाच्या दिवशी पुरुष पांढरे कपडे घालतात. (चित्र क्र ४ आणि ५).

**शिवाच्या या नटराज विग्रहाचा थोडासा विस्तारीत परिचय करून देणे आवश्यक आहे**.

प्राचीन भारतीय **शैव संप्रदायानुसार**, शिवाची नटराज नृत्यमुद्रा ही विश्वाच्या अव्याहत निर्मिती आणि लय या प्रक्रियेचे नृत्य आहे. नटराजाची ही नृत्यमुद्रा विश्वाच्या अविरत – चिरंतन – शाश्वत गतीची उर्जा आहे, भौतिक भूमितीद्वारे त्याने केलेली विश्वाची संरचना आहे, विश्वाच्या अमर्याद सौंदर्याचे तालबद्ध तत्वज्ञान आहे आणि अंतिमत: सामान्य सजीवांच्या ज्ञानबोधासाठी त्याने केलेली नृत्यमय कलाधीष्टीत आणि कालातीत अभिव्यक्ती आहे.

**THE DANCE OF SIVA** या १९१८ सालात लिहिलेल्या निबंधात, आनंद के कुमारस्वामी लिहितात.... ***कलास्वामी नटराज, अगणित – अनंत – अक्षय***

***कलागुण सौंदर्याचा निर्माता आणि या वैश्विक रंगमंचाचा स्वामी आहे. या सृष्टीतील महोत्तम नर्तक आणि सर्वश्रेष्ठ अभिनेता आहे आणि तोच स्वतः प्रेक्षकही आहे***







**^** चित्र क्र ६ **आनंद के कुमारस्वामी** **^** चित्र क्र ७ **CERN नटराज** **^** चित्र क्र ८ **नटराज**

**GOD PARTICLE** म्हणजेच देवतत्वाच्या अभ्यासातील श्रेष्ठ आंतरराष्ट्रीय अणु – परमाणु वैज्ञानिक डॉ फ्रीटोर काप्रा यांच्या १९७२ सालातील एका लेखात, त्यांनी **GOD PARTICLE** म्हणजेच देवतत्व आणि नटराजाच्या या नृत्य प्रतिमेतील प्रतीके – रुपके - चिह्नसंकेत आणि चिह्नार्थ यांचा जगाला नव्याने परिचय करून दिला. त्यानंतर प्राचीन भारतीय विज्ञान आणि विद्वत्तेचा परिचय आणि महत्व, आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक समुदायाने स्वीकारले असे म्हणायला हरकत नाही.

**चित्र क्र ७** मधे डावीकडून डॉ अनिल काकोडकर – डॉ रॉबर्ट आयमार – श्री के एन चंद्रशेखर, नटराज प्रतिमा अवतरण, १८ जून, २००४, **CERN**, जिनिवा, स्विझरलँड.

**CERN European Center for Research in Particle Physics – Geneva,** या स्विझर्लंड मधील जागतिक संशोधन केंद्रामधे नटराजाच्या दोन मीटर

उंच ब्राँझ मधील प्रतिमेची स्थापना झाली आहे. या प्रतिमेच्या बाजूला असलेल्या संगमरवरी फलकावर आनंद कुमारस्वामींच्या वर उल्लेख केलेल्या निबंधातील एक वाक्य कोरलेले आहे. (चित्र क्र ६).

***Ananda K. Coomaraswamy, seeing beyond the unsurpassed rhythm, beauty, power and grace of the Nataraja, once wrote of it "It is the clearest image of the activity of God which any art or religion can boast of."***

एक लक्षात घ्यायला हवे की लांब कुरळ्या केसांच्या स्मशान योग्यालाच शोभणाऱ्या अस्ताव्यस्त बटा, ताज्या हिरव्या पानांचा हार, ब्रम्हाचे प्रतिक असलेली कवटी, मस्तकावरून वाहणारी गंगा, गळ्यातला नाग, दोन्ही कानातील वेगवेगळी कर्णभूषणे आणि वरच्या उजव्या हातातला डमरू **ही सगळी या नृत्यातील वैशिष्ट्ये, खास शिवाची स्वतःची ओळख आहे,** ही या नृत्याची ओळख नव्हे. एका बैरागी आदियोग्याच्या नृत्यात त्याच्या सन्निध असलेली ही सर्व सजीव आणि निर्जीव चिह्ने, काही सूक्ष्म अर्थसंकेत देतात. या नृत्याला नादांतनृत्य असे संबोधित केले गेले. या बद्दल शिवभक्तांचे म्हणणे असे...की शिवा त्याची प्रेरणाशक्ती वापरून सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टीमधे चैतन्य निर्माण करतात.

तीरुवातावरूर पुराणम, शिवज्ञानबोधम, तीरुकुट्टु दर्शन, तिरूमंत्रम, उन्मयी विलक्कम अशा नवव्या शतकापासून लिहिल्या गेलेल्या अनेक तमिळ संहिता, शिवाच्या नटराज नृत्याचे सविस्तर वर्णन करतात. त्यामागील चिह्नसंकेतांचे

स्पष्टीकरण देतात. नटराजाचे हे चार हात, प्रत्येक सजीवाच्या मूलतत्व किंवा मूळ घटकांची प्रतीके आहेत.

शिवाचा अर्थात नटराजाचा उंच उचलून धरलेला डावा पाय, त्यानेच निर्माण केलेल्या सृष्टीचा योग्य परिचय करून देतो, मानावी सदभावनांचे महत्व आणि त्यानेच रचलेले निर्मिती आणि लय हे तत्व समजाऊन सांगतो. डाव्या हाताने शरीराच्या मृत्यूपेक्षा अज्ञान आणि दुष्ट-संहारक विचारांचा आणि अहंकाराचा मृत्यू आणि त्याचे नवजीवन किती महत्वाचे आहे त्याकडे म्हणजे मायावी असुराच्या निर्जीव शरीराकडे अंगुलीदर्शन करतो. शिवाचा अभयमुद्रेतील उजवा हात, जिवनातील सत्य स्वीकारा, घाबरू नका असे आश्वासक संकेत देतो. पुढचे दोन्ही हात देत असलेलेचिह्नसंकेत सामान्य मानवी बुद्धीलाही आकलन होऊ शकतात.

वरवर पहाता बुद्धीभ्रम करणारी शिवाच्या वरच्या दोन हातातील चिह्न आणि त्यांचे चिह्नसंकेत फार सखोल आहेत, त्यातील संकेतमुल्य फार समृद्ध आहेत. याच प्राचीन मूर्तिशास्त्र  संकेतानुसार चार हातांपैकी वरचे दोन हात हे देवतेच्या सार्वभौम वैश्विक ज्ञानसंचयाचे प्रतिक मानले जातात आणि अशा मूर्ती आणि प्रतिमांच्या माध्यमातून दर्शकाला ज्ञानसंपन्न करत असतात.

शिवाच्या वरच्या उजव्या हातात डमरू तर खालचा उजवा हात अभयमुद्रेत. वरच्या डाव्या हातात अग्नी तर खालचा डावा हात, उजव्या पायाखाली दाबलेल्या मुयालक आसुराकडे अर्थात सृष्टीतील सजीवांच्या अज्ञानाकडे अंगुलीनिर्देश करतोय.

शिवाने आपल्या उजव्या पायाच्या अंगठ्याखाली मुयालक या मायावी ठेंगू असुराला दाबून धरले आहे. नृत्याच्या सुरुवातीलाच मानवाचे अज्ञान आपण नष्ट करीत असल्याचे संकेत उजव्या पायाच्या या मुद्रेत शिवा देतो आहे. हा असुर मानवाच्या अज्ञानाचे प्रतिक आहे. या मायावी असुराच्या हातात एक जहरी सर्प आहे जो मानवाच्या विषय वासना आणि दुष्ट-संहारक प्रवृत्तींचे आणि विचारांचे प्रतिक आहे. तो असुर मायावी आहे कारण तो मानवाच्या मनातील अशाच अज्ञान आणि अदृष्य मायावी दुष्ट भावनांचे प्रतिक आहे आणि वैश्विक ज्ञानसंचया समोर हे अज्ञान किती क्षुद्र आहे ते त्याच्या ठेंगूपणाच्या संकेतातून दर्शकाला जाणवते. शिवाचा डावा पाय गुढग्यात ऊंच मुडपलेला आहे. त्या पायाच्या अंगठ्याने, महादेव विश्वाच्या मध्यावरील सांकेतिक हृदयाला स्पर्श करतो आहेत. डाव्या पायाच्या मुद्रेच्या या विलक्षण चिह्नसंकेताचे वर्णन **कोयिल पुराणम** संहिता करते.

नटराजाचा डमरू धारण केलेला वरचा उजवा हात, निसर्गातील शिव म्हणजेच पुरुषतत्व आहे आणि तो सजीवाच्या चेतना – ज्ञान – बुद्धी यांचे नियंत्रण करतो. म्हणून नटराजाच्या उजव्या कानात पुरुषाची कर्णभूषणे आहेत. उजव्या हातातील डमरू हा विश्वाच्या निर्मितीच्या क्षणी केलेला प्रथम नाद याचे संकेत देतो आणि सृष्टीतील प्रत्येक सजीवाला चेतना – ज्ञान – बुद्धी स्वीकारण्यासाठी जागृत करतो. नटराजाच्या डाव्या वरच्या हातात अग्निशिखा आहे. हे स्त्रीच्या गर्भाशयातील अग्नीतत्वाचे प्रतीक आहे. त्याचा हा डावा हात, निसर्गातील शक्तीतत्व म्हणजे स्त्रीतत्व आहे, जे निसर्गातील निर्मितीचे प्रतिक आहे आणि सजीवाच्या मनाचे नियंत्रण करते. म्हणूनच नटराजाच्या डाव्या कानात स्त्रीची कर्णभूषणे आहेत. या हातातील अग्निशिखा मनातील अज्ञान आणि संहारक विचार अग्नीच्या स्वाधीन करून नष्ट करते आणि सजीवाचा पुनर्जन्म झाल्याचे संकेत देते. संपूर्ण नृत्यमुद्रे भोवताली असलेली अग्निशिखांची प्रभावळ शुद्धता आणि पावित्र्याचे संकेत देते.

शिव आणि महाकालीच्या स्मशानातील तांडव नृत्यातील संकेत आणि नटराज विग्रहांतील डाव्या हातातील अग्निशिखेचे संकेत, यातिल साधर्म्य विलक्षण सुंदर आहे. स्मशानातील तांडव नृत्याचा सूक्ष्मार्थ– गूढार्थ असा आहे की महादेव आणि देवी महाकाली, आपल्याला निष्क्रिय बनवणाऱ्या निष्फळ संकल्पना आणि मनोबल उध्वस्त करणारी आपली नकारात्मक मनस्थिती, (नृत्यात सहभागी भूत आणि पिशाच्चगण हे त्याचे रुपक आहे) स्मशानातील अग्नीच्या स्वाधीन करतात, जणू पुनर्जन्म देऊन आपल्याला पुन्हा उत्साही आणि सक्रीय बनवतात. निरोगी मन - शरीर, निकोप जीवनशैली प्राप्त होण्यासाठी अडसर ठरणारा आपला अहंकार, अहंभाव, गर्वभावना, वासना आणि कामना, इथे अग्नीच्या स्वाधीन करून नष्ट केल्या जातात. म्हणजेच सृष्टी-स्थिती-संहार-विलय-अनुग्रह या सर्वशक्तिमान विश्वनियंता त्रीमुर्तींच्या पंचक्रिया, तांडवनृत्यामधे अभिनित झाल्या आहेत. नटराजाच्या नादांतनृत्यात स्त्रीच्या गर्भाशयातील अग्नीतत्व, मनातील अज्ञान आणि संहारक विचार अग्नीच्या स्वाधीन करून नष्ट करते आणि तिच्या गर्भाशयात सजीवाचा पुनर्जन्म झाल्याचे संकेत देते. **ही सर्व प्रतीके – रूपके – चिह्न आणि चिह्नसंकेत, वैश्विक दर्जाचे आहेत आणि कुठल्याही धर्मसंकल्पनेच्या पलीकडे जाऊन सृष्टीतील प्रत्येक मानवाला संबोधित करणारे मार्गदर्शक संकेत आहेत.**



< चित्र क्र ९ नटराज प्रतिमा

चिदंबरम देवालयाच्या चार गोपुरांमधे महादेवाच्या नादांतनृत्याची, भरतनाट्यम शैलीतील १०८ शिल्पे, भिंतीवर कोरलेली आहेत. मात्र यात नटराज नृत्यमुद्रा अंकित झालेली नाही. देवालयाच्या मुख्य गाभाऱ्यातच नटराजाची ही मुर्ती स्थापन केलेली आहे. तमिळनाडू मधे शिवाच्या या पंचकृत्य नृत्याशी निगडीत पांच देवालय स्थाने महत्वाची मानली गेली. चिदंबरम देवालयातील **कनकसभा**, मदुराई देवालयातील **रजतसभा**, तीरुवलंगडू देवालयातील **रत्नसभा**, तिरुनवेली देवालयातील **ताम्रसभा** आणि कुत्रालम देवालयातील **चित्रसभा** अशी ही पांच सभागृहे.

खरे म्हणजे या नादांतनृत्यातून, महादेवाने विश्वासाठी योजलेली पांच मुलभूत तत्वे व्यक्त होतात. सृष्टी – स्थिती – संहार – तीरोभाव – अनुग्रह या महादेवाच्या पाच वैश्विक कार्यकक्षा आहेत. यातले पहिले प्राथमिक तत्व **सृष्टी** म्हणजेच ब्रह्मदेवाने केलेली सृष्टीची निर्मिती-उत्क्रांती-विकास. दुसरे श्री विष्णूचे **स्थिती** तत्व म्हणजेच या निर्माण झालेल्या सृष्टीचे पालन आणि आधार. तिसरे रुद्राचे तत्व सृष्टीचा **संहार** आणि पुनर्निर्मिती. महेश्वराचे चवथे तत्व **तीरोभाव** म्हणजे निर्गुण-निराकार स्वरूप दर्शन आणि भ्रम. सदाशिवाचे पांचवे तत्व **अनुग्रह** म्हणजे कृपाछत्र, समस्या निवारण आणि अंतिम मुक्ती. महादेवाच्या म्हणजेच शिवाच्या पाच वैश्विक कार्यकक्षा नटराजाच्या नादांतनृत्य मुद्रेत शिल्पबद्ध झाल्या आहेत.

*चार वर्षांपूर्वी नटराज या विषयाचा अभ्यास करतांना, ठाणे येथील माझ्या स्नेही **श्रीमती लक्ष्मी अय्यर येवलेकर,** (मूळ तमिळ भाषिक) यांच्या परिचयाने, सहकार्याने आणि सौजन्याने मला, चिदंबरम इथल्या तिल्लै नटराज मंदिराच्या **कोयिल पुराणम** मधील नोंदी उपलब्ध झाल्या होत्या. त्यांचे मनःपूर्वक आभार. **कोयिल पुराणम** या तमिळ संज्ञेचा अर्थ, त्या*

*देवालयाचा स्थापनेपासूनचा समग्र लिखित इतिहास. दक्षिण भारतातील प्रत्येक प्राचीन देवालयाचे स्वतःचे **कोयिल पुराणम**, अभ्यासकाला उपलब्ध असते. तिल्लै आणि चिदंबरम ही दोन्ही देवालयाची स्थळदर्शक नावे आहेत.*


आदिदेवता शिव आणि विश्वाची निर्माती देवी पार्वती यांच्या प्रतीके – रुपके – चिह्न यांचा अभ्यास, अंतिमतः आपल्याला आपल्या लेखमालेतील मूळ, **मातृदेवता** या विषयाचा विस्तार करायला सहाय्यभूत होतो. यासाठी आपल्या अनामिक विद्वान पूर्वजांना वंदन करूया...!

--००--


# शिव आणि शक्ति

प्राचीन भारतामध्ये देव देवता यांच्या संकल्पनांचा अभ्यास दोन माध्यमातून झाला होता. प्रज्ञता – विज्ञान – तत्वज्ञान या तीन स्तंभांवर रचलेला हा अभ्यास, दीर्घकाळ होत राहिलेल्या संशोधनावरूनच सिद्ध झाला होता. **विश्वाचा आरंभ आणि विकास याचा अभ्यास** हे या संशोधनाचे मूलभूत ध्येय होते आणि त्या ध्येयाचा पाठपुरावा, काही सहस्त्र वर्षांच्या गुरु+शिष्य परंपरेत अखंडित होत राहील होता. हे संशोधन दोन माध्यमातून किंवा दोन नियमबद्ध आणि तर्कनिष्ठ पद्धतीने प्रगत झाले हे निश्चित. **प्रत्यक्ष अनुभव आणि प्रयोगसिद्ध निष्कर्ष ही संशोधनाची पहिली पद्धत होती. या निष्कर्षाला प्रतीके – रुपके – चिह्न – भाषा याची जोड देऊन, तात्विक आणि सैद्धांतिक अनुमान ग्रंथीत झाले, संशोधनाची ही दुसरी पद्धत होती.**


या सर्व संशोधनान आणि अभ्यास यांचे मूळ स्त्रोत, लेखन कलेच्या आधी **मौखिक परंपरेने** आणि कालांतराने, **वैदिक – उपनिषद – आगम – तंत्र** या लिखित साहित्यात ग्रंथीत झाले होते आणि आजही अभ्यासकाला हे साहित्य उपलब्ध आहे. नियमित तत्वावर, **स्मृति – श्रुती – शिल्प – मुर्ती – चित्र** या सर्व अभिजात माध्यमांतून, या मूळ स्त्रोतातील संशोधन, सगुण – साकार होत राहिले. आपण मानव आहोत आणि सृष्टीतील अन्य सजीवांपेक्षा आपण वेगळे आहोत याची जाणीव – जागृती, ही **मानवतेची नवी पहाट** नेमकी केंव्हा झाली याची नोंद उपलब्ध नाही. मात्र मानव जातीची व्युत्पत्ती आणि वंशवृद्धी, पुरुष आणि स्त्रीच्या युगूलधर्म मैथुन क्रियेतून होते याची खात्री, आपल्या पूर्वजांना तेंव्हापासून झाली होती. (खालील चित्रांच्या विषय विस्तारासाठी लेख क्र ११ पहावा).



< स्त्री - शक्तितत्वाचे प्रतीक



< स्त्री – शिवतत्वाचे प्रतीक



< शिवशक्तीचे प्रतीक



< भूमितीय तांत्रिक मंडल

मानवी शरीरात जो लिंगभेद आहे तो निसर्गातही असायला हवा अशा धारणेने, सृष्टीच्या निर्मितीकाळापासून असलेल्या ब्रह्मांडाला जन्म देणाऱ्या माता आणि पित्याचा शोध सुरू झाला. समाज व्यवस्था निर्माण होण्याआधीच्या आदिम काळांत, जन्मदात्या स्त्रीला कुटुंबात देवत्व कसे प्राप्त झाले त्याचा संदर्भ आपण आधीच्या लेखांतून घेतलाच आहे. (लेख क्र २ आणि ३) अगदी त्याच धोरणाने ब्रह्मांडाच्या जननीला म्हणे वैश्विक मातृदेवतेला – शक्तिला – शक्तितत्वाला मुख्य देवतेचा मान दिला गेला.

वेदांच्या निर्मिती काळापासून, साधारण पंचवीस हजार वर्षांपासून, पुरुषतत्व – शिवतत्वासाठी,  मानवी पुरुष लिंगाचे प्रतीक वापरले गेले आणि स्त्रीतत्व – शक्तितत्वासाठी मानवी स्त्री योनीचे प्रतीक वापरले गेले. युगुलधर्मातील मैथुन क्रिया पवित्र – निरोगी – आनंददायी – उत्कट – शुद्ध  – सर्जनशील – निरामय असावी यासाठी त्या मैथुन क्रियेला देवत्वाचा दर्जा दिला गेला आणि योनिस्थित लिंग हे शिव+शक्ति यांच्या युगुलधर्माचे प्रतीक, उपासनेसाठि प्रत्येक शिव मंदिराच्या गर्भगृहांत आदराने स्थापन झाले. या सर्व प्रथा समाजाच्या स्वीकृतीने परंपरा बनल्या व काही सहस्त्र वर्षांच्या विकास आणि नियमित उपासनेतून त्यांनी संस्कृतीचे रूप घेतले.







**^**शिव + शक्ति **^** शिवलिंग

शिव आणि शक्ति या संयुगाचे योनिस्थित लिंग हे दृश्य स्वरूपातील **शिल्पबद्ध** प्रतीक स्वीकृत झाले. आगमीक तंत्र आणि बौद्ध तंत्रात, वेगळ्या स्वरूपाची अन्य रुपके आणि चिह्न या संयुगासाठी योजली गेली. युगुलधर्म मैथुन क्रियेतील पुरुष आणि शक्तितत्वाच्या निर्मितीक्षम विर्याच्या निसर्गदत्त पांढऱ्या रंगावरून, **श्वेतबिंदु** या नावाने पांढऱ्या रंगाचे रुपक चिह्न शिवतत्वा साठी स्वीकृत झाले. विवाहित ऋतुमती स्त्रीच्या, मासिक चार दिवसांच्या **शशिकला प्रभाव** काळांत होणाऱ्या स्त्रावाच्या लाल रंगावरून स्त्री आणि शक्तितत्वाला **शोनबिंदु** या नावाने लाल रंगाचे रुपक चिह्न स्वीकृत झाले. रजस्वला स्त्रीसाठी **शशिकला प्रभाव काळ** असे संबोधन वापरले गेले कारण त्या चार दिवसांत ऋतुमती स्त्रीच्या शरीरावर, चंद्राच्या (शशी) कलांचा प्रभाव असतो. **दुर्गा सप्तशती** या तांत्रिक संहितेत (मूळ संस्कृत – हिन्दी भाषांतर उपलब्ध), देवी दुर्गेच्या नऊ विग्रहात, बाल्यावस्थे पासून वृद्धावस्थेपर्यन्त प्रत्येक स्त्रीच्या शरीर – मन – बुद्धी याच्या विकास आणि प्रगतीचा परिचय विस्ताराने करून दिला गेला आहे.

^बंगाली स्त्रीयांचे पारंपरिक परिधान ^ बंगाली पुरूषांचे पारंपरिक परिधान

शाक्त संप्रदायाचा प्रभाव असलेल्या बंगाल मधे काली महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. विसर्जन विधीच्या वेळी **देवी भरण** विधी साजरा होतो. विवाहित महिला देवीच्या कपाळावर आणि पायावर (कुंकू) सिंदूर वहातात आणि तिला निरोप देतात. त्यानंतर या महिला एकमेकींच्या कपाळावर आणि गालावर हलकासा (कुंकू) सिंदूर लावतात. असा **सिंदूर खेला** हा महिलांचा खेळ साजरा होतो. स्वतःला आणि अन्य महिलांना दीर्घ काळ सौभाग्य मिळावे - आपला पती -मुले आणि सर्व कुटुंबियांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य मिळावे यासाठी या महिला एकमेकींना शुभेच्छा देतात. विशेषतः बंगालमध्ये विजयादशमीच्या दिवशी या खेळाचे फार महत्त्व आहे. यावेळी महिला लाल किनार असलेली पांढरी साडी नेसतात आणि पारंपरिक अलंकार घालतात. पुरुष पारंपरिक पांढरा कुर्ता आणि धोतर अशा परिधानात असतात. प्रतीके, रुपकांचा आणि चिह्न यांचा प्रभाव शाक्त संप्रदायातील उपासना आणि साधनेत (काली पूजा) दिसतो तसाच समाजातील दीर्घ परंपरेचे अधिष्ठान असलेल्या परिधान – आभूषणे – अलंकार – स्त्रीयांच्या शृंगार साधनेत असा प्रतीत होतो.

बंगालमधील **सिंदूर खेला** ही जमीनदारी आणि सामंतशाहीच्या काळात सुरू झालेली, विवाहित महिलांच्या खेळाची परंपरा, साधारण पाचशे वर्षें जुनी आहे. अलीकडच्या काळात, विवाहित महिलांसह सर्वच महिलांना यात सहभागी होता यावे अशी सामाजिक चळवळ सुरू झाली. परिणामी, अविवाहित महिला – विधवा – घटस्फोटिता – तृतीयपंथी – वेश्या व्यवसायातील महिला अशा सर्वांना या सिंदूर खेलामध्ये सहभागी करून घेतले जाते.

***वर उल्लेख केल्या नुसार: प्रत्यक्ष अनुभव आणि प्रयोगसिद्ध निष्कर्ष*** *ही आपल्या पूर्वजांच्या संशोधनाची* ***पहिली पद्धत*** *होती. या निष्कर्षाला प्रतीके – रुपके – चिह्न – भाषा याची जोड देऊन,* ***तात्विक आणि सैद्धांतिक अनुमान*** *ग्रंथीत झाले, ही संशोधनाची* ***दुसरी पद्धत*** *होती. या दोन पद्धतींचा, आज आपण अनुभवत असलेला, थोडासा वेगळा संदर्भ असलेला दृष्टान्त इथे देणे उचित राहील.* ***तो संदर्भ असा:***


देवी सरस्वतीचे वाहन असलेल्या मोर आणि हंस या दोन सजीवांच्या नैसर्गिक गुणवत्तांचे आणि त्यांच्या संकेतमूल्यांचे विश्लेषण आपण मागील लेखात पाहिले. (लेख क्र ९). यातील हंस हा पक्षी पाण्याखाली मान घालून किंवा पाण्यात पूर्ण बुडी मारून कमळाच्या देठाला छेद देऊन त्यातील पांढरे तंतु आपले अन्न म्हणून खातो असा हा अभ्यास. पाण्याखाली घडणाऱ्या या घटनेचे निरीक्षण करण्यासाठी त्या चिखलाच्या पाण्यात, ज्या काळांत स्कूबा डायव्हिंगची साधने उपलब्ध नव्हती त्या काळांत, किती वेळ बसावे लागले असेल..!..हंसासाठी पक्षीशास्त्राचा अभ्यास – कमळाच्या देठातील तंतुसाठी वनस्पति शास्त्राचा अभ्यास, त्यातील कॅल्शियमसाठी रसायनशास्त्राचा अभ्यास, असे हंसाच्या लौकिक आणि भौतिक गुणवत्तेचे संशोधन झाले असावे. ***प्रत्यक्ष अनुभव आणि प्रयोगसिद्ध निष्कर्ष*** *ही संशोधनाची* ***पहिली पद्धत होती.***

त्याचे पाण्यातील कमळाच्या देठातील हे पांढरे तंतु खाणे याला **नीरक्षीर विवेकाचे रुपक** बनविण्यासाठी, **तर्कशास्त्र, न्यायशास्त्र, नीतीशास्त्र, भाषाशास्त्र** यांचा अभ्यास. *या निष्कर्षाला प्रतीके – रुपके – चिह्न – भाषा याची जोड देऊन,* ***तात्विक आणि सैद्धांतिक अनुमान*** *ग्रंथीत झाले, ही संशोधनाची* ***दुसरी पद्धत*** *होती.* काही सहस्त्र वर्षांपूर्वी, संशोधन आणि अभ्यासाच्या या पद्धती आणि हे मार्ग किती विलक्षण प्रगत होते, त्याचा हा अगदी अल्प परिचय. **मातृदेवता संकल्पनेची उत्क्रांती आणि शक्तितत्वाच्या असंख्य संकल्पनांचा विकास, प्राचीन प्रज्ञतेच्या अशाच दीर्घ संशोधनाचे फलित आहे.**

**देव** - **GOD** ही संकल्पना खरे म्हणजे वैश्विक आहे आणि **देवाची शक्ति** – **Power of GOD** ही त्याला जोडून येणारी संकल्पना सुद्धा जगभरातील समाजमनांत खोलवर रूजली आहे. मात्र आपली प्राचीन भारतीय संस्कृति आणि समाज, हे जगभरातील एकमेव उदाहरण आहे की जिथे ही वैश्विक – अलौकिक शक्ति, स्त्रीस्वरूप आणि माते समान मानली गेली आहे. यांचे दुसरे वैशिष्ट्य असे की ही वैश्विक – अलौकिक शक्ति, तिच्या युगुलधर्मातील पुरुष सहचऱ्याच्या व्यक्तिमत्वात निवास करते किंवा तो पुरुष म्हणजे शिवा या शक्तिचा धारणकर्ता आहे. थोडक्यात याचा मथितार्थ इतकाच की स्त्रीशक्ति एक पुरुषशक्ति धारण करतो आणि ही स्त्रीशक्ति आणि तो धारणकर्ता, हे दोघे युगुलधर्मातील पती + पत्नी आहेत. शाक्त संप्रदायासह – शैव संप्रदाय – वैष्णव संप्रदाय – गाणपत्य संप्रदाय (श्री गणेशाला सर्वश्रेष्ठ देवता मानणारे साधक) – सौरस संप्रदाय ( सूर्याला सर्वश्रेष्ठ देवता मानणारे साधक) या सर्व संप्रदाय आणि यातील पंथ – उपपंथ साधकांनी शिव+शक्ति युगुलधर्माची ही संकल्पना, काही सहस्त्र वर्षांपासून स्वीकारली आहे. या प्रत्येकाच्या उपासना – साधना – पूजा –

आराधना पद्धतीत फरक आहे इतकेच यातील वेगळेपण आहे. आणि म्हणूनच या प्रत्येक संप्रदाय आणि पंथातील **मातृदेवता** ही संकल्पना अबाधित राहिली आहे.

**मातृदेवता** आणि शक्तितत्व – शिवतत्व यांच्या युगुलधर्म संकल्पनेच्या सांप्रदायिक साधक समाजाच्या सर्वंकष स्वीकृतीमुळे, विविध धर्म तत्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या पंथांमध्येहि संयोग किंवा समन्वय निर्माण झाला आहे. **सांख्य तत्वज्ञान दर्शन प्रणाली** नुसार पुरुष आणि प्रकृती या दोन स्वतंत्र शक्ति मानल्या गेल्या आहेत. पुराणिक साहित्यात, शिव आणि शक्ति या दोन तांत्रिक साहित्यातील शक्तींशी – पुरुष आणि प्रकृतीचे साम्य असल्याचा उल्लेख केला गेला आहे. **वेदान्त तत्वज्ञानातील माया** अथवा **भ्रम** या तत्वज्ञानानुसार, शक्ति ही ब्रह्माशी जोडली गेली आहे. श्री विष्णु आणि त्यांच्या श्री लक्ष्मी आणि श्री या दोन भार्या – श्री राम आणि सीतामाई – श्रीकृष्ण आणि राधा ही सर्व युगुलं, याच शिव आणि शक्तीची विग्रह रुपे आहेत.




वर्ष २०२० च्या नवरात्री उत्सवात माझे **नवदुर्गा: प्राचीन संकल्पना रूपके** हे **दुर्गा सप्तशती या तंत्र संहितेतील देवी दुर्गेच्या नऊ विग्रहांचा** परिचय करून देणारे ई पुस्तक, ई साहित्य प्रतिष्ठान यांच्यातर्फे प्रकाशित झाले आहे. खालील लिंकवर हे पुस्तक विनामूल्य डाउनलोड करता येईल.

नवदुर्गा: प्राचीन संकल्पना आणि रुपके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/navdurga_psr_arun_phadke.pdf

# साधक दृष्टिकोन

आधीच्या लेखात आपण पाहिले की आपली प्राचीन भारतीय संस्कृति आणि समाज, यांचे पहिले वैशिष्ट्य आहे की वैश्विक – अलौकिक शक्ति, स्त्रीस्वरूप आणि माते समान मानली गेली आहे. यालाच अन्य संस्कृतीत **Power of GOD** असे संबोधित केले गेले आहे. यांचे दुसरे वैशिष्ट्य असे की ही वैश्विक – अलौकिक शक्ति, तिच्या युगुलधर्मातील पुरुष सहचऱ्याच्या व्यक्तिमत्वात निवास करते किंवा तो पुरुष म्हणजे शिवा या शक्तिचा धारणकर्ता आहे. थोडक्यात याचा मथितार्थ इतकाच की स्त्रीशक्ति एक पुरुषशक्ति धारण करतो आणि ही स्त्रीशक्ति आणि तो धारणकर्ता, हे दोघे युगुलधर्मातील पती + पत्नी आहेत. जगद्गुरु शंकरांचाऱ्यांच्या **ब्रह्म सत्य जगत मिथ्या** या अद्वैत दर्शन संकल्पनेत, हीच शक्ति (ब्रह्म) प्रत्येक सजीवात निवास करते आणि त्याला प्रेरित करते. मात्र सजीव मिथ्या जगातच वावरत असतो.

हिमालयाच्या काश्मीर घाटीतील राजा दक्ष आणि राणी प्रसुतीची सती ही कन्या. वडिलांच्या इच्छेविरुद्ध तिने रुद्राशी म्हणजे आदियोगी महादेवांशी विवाह केला होता. आपले वडील, दक्ष राजाने, यज्ञाच्या वेळी महादेवाच्या केलेल्या आपमानामुळे क्रोधित होऊन सतीने त्याच यज्ञकुंडात उडी घेतली अशी कथा आपल्या सर्वांनी कधीतरी वाचली आणि ऐकलिहि असेल. खरे म्हणजे याला आख्यायिका आणि दंतकथा म्हणायला हवे. **सतीचा क्रोध व्यक्त करण्यासाठी आणि तिची मानसिकता साधकाला आणि दर्शकाला समजावी म्हणून तिने यज्ञकुंडात उडी घेतली हे प्रतीक - रुपक योजले गेले आहे.** हे तिच्या मनातला व्यक्तिनिष्ठ आंतरिक क्रोध अग्नी इतका ज्वलंत होता तो व्यक्त करण्यासाठी योजलेले **अग्नीकुंड** हे काल्पनिक **प्रतीक** आहे. अग्नीकुंडात घेतलेली **उडी** भौतिक विश्वातील लौकिक क्रियेचे **रुपक** आहे.

**देवी भागवत पुराण** आणि **चंडी सप्तशती** या दोन पुराणिक संहितांमध्ये आपल्याला याचा विस्ताराने परिचय होतो.





^ सती आणि रुद्र

^ महादेव आणि पार्वती

कालांतराने सतीने, हिमालयाचा राजा हीमवान आणि राणी मैनावतीच्या पोटी जन्म घेतला आणि पर्वताची कन्या म्हणून ती पार्वती या नावाने परिचित झाली. **हीच सती, प्रत्यक्षात शक्तिस्वरूप आदि महामाया होती आणि त्या अपमानाने क्रोधित होऊन तिने योगमुद्रा धारण केली होती.** सतीला झालेल्या दु:खाने संतप्त होऊन महादेवाने योगमुद्रेतिल सतीला खांद्यावर घेतले आणि विश्वाच्या रंगमंचावर त्याचा नृत्यपदन्यास सुरू झाला. **सृष्टी – स्थिती – संहार – तीरोभाव – अनुग्रह** या महादेवाच्या पाच वैश्विक कार्यकक्षा आहेत. त्यापैकी, महेश्वराचे चवथे तत्व **तीरोभाव** म्हणजे **निर्गुण-निराकार स्वरूप दर्शन आणि भ्रम** आणि सदाशिवाचे पांचवे तत्व **अनुग्रह** म्हणजे **कृपाछत्र, समस्या निवारण आणि अंतिम मुक्ती**. या दोन कार्यकक्षांमधे, ही शक्ति म्हणजे सती योगमुद्रेत असेपर्यन्त महादेवाचे नृत्य सुरू राहिले

होते. त्यावेळी पृथ्वीवर तिचे अलंकार जिथे जिथे पडले तिथे शक्तिपिठे निर्माण झाली. **देवी भागवत** संहितेत १०८ शक्तिपीठांचा – **देवी गीता** संहितेत ७२ शक्तिपीठांचा आणि **देवी पुराण** संहितेत ५१ शक्तिपीठांचा उल्लेख आहे. वर्तमानात, देशभरांत आपल्याला ५१ शक्तिपिठे उपलब्ध आहेत.

या सर्व संहितातील कथा आणि त्यातील वर्णन, आधुनिक वाचकाला निश्चितच **अतार्किक** आणि **अतिरंजित** वाटेल. या वर्णनातले प्रतीके – रुपके – चिह्न यांचे संकेत, **आपल्या विचारांना एक दिशा देतात, रंजकतेने उत्सुकता निर्माण करतात. वाचक – दर्शक – श्रोता यांच्या कल्पनाशक्तिला प्रभावित करून त्याना दृश्यकल्पनेत (visual imagination) विचार करण्यासाठी प्रेरित करतात.** ब्रह्मांडाला जन्म देणाऱ्या, या सर्वव्यापी – सर्वशक्तिमान – अविनाशी मातृदेवतेचे व्यक्तिमत्व आणि महत्व, तत्कालीन शैलीमधे व्यक्त केले गेले आहे. **भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाण भारती** अशा अत्यंत प्रगत संस्कृत भाषेने अलंकृत झालेले आहे. अद्वैत दर्शनात आपल्याला मिथ्या सृष्टीत अडकवून ठेवणारी ही **महामाया (Illusion)** आहे. सर्वश्रेष्ठ – सर्वज्ञानी **महाविद्या (Knowledge & Wisdom)** आहे. काळ आणि वेळेचे **(Space & Time)** नियंत्रण करणारी ही **महाकाली** आहे.

चंडी सप्तशती संहितेत देवीला महिषासुरमर्दिनी म्हटले आहे. कार्तिकेय आणि गणपती हे तिचे दोन पुत्र आणि जया आणि विजया (अनुक्रमे लक्ष्मी आणि सरस्वतीच्या विग्रह प्रतिमा) या हिच्या दोन मुली आहेत. या देवतेला सुद्धा **काली** असेच संबोधित केले आहे. बंगाल मधील मंदिरात देवीची दैनंदिन पूजा आराधना होत असली तरीही हिचा वार्षिक उत्सव शारदीय नवरात्री नंतरच्या अमावस्येच्या रात्री आयोजित केला जातो.




**^** मातृदेवता मुर्ती

प्रत्येक सजीवाची **अपरा** प्रकृती म्हणजे बाह्य पंचमहाभूते आणि आपले अंतःकरण चतुष्टय अशी **जड प्रकृती**. आपला **जीवात्मा** आणि **चेतना** ही आपली **परा** प्रकृती आहे. ही **मातृदेवता** स्वरूप शक्ति सर्वव्यापी आहे – प्रत्येक सजीवाच्या, विशेषतः मानवाच्या **अपरा** आणि **परा** प्रकृतीमधे ती निवास करते. कुठलाही भेदभाव न करता ती प्रत्येकाला तीच चेतना देते. या सर्व कथा – कथानके आणि त्यातील प्रतीके – रुपके – चिह्न – चिह्नसंकेत – चिह्नमूल्य यांच्याकडे पहाण्याची प्रत्येक साधकाची समजूत – रुचि – प्रकृती – स्वभाव आणि मानसिकता नक्कीच भिन्न असते. त्यामुळे साधकाच्या मातृदेवतेकडे बघण्याच्या दृष्टीकोनातील लघुत्तम सामान्य विभाजक काढता येत नाही.

आधी सतत उल्लेख केलेली सर्वव्यापी शक्तिची जाणीव आणि संवेदना होण्याचे प्रत्येक साधकाचे स्वतःचे शरीर – मन – बुद्धी – आत्मा, एक साधन आहे. त्याचे हे साधन एक उत्कृष्ट – सर्वश्रेष्ठ – अचल – स्थायी – निरंतर – अंतस्थ आहे, त्याचे स्वतःचे आहे. ही आंतरबाह्य उपस्थित असलेली **मातृशक्ति** आणि स्वतःच्या

समरसतेची अनुभूति, नियमित उपासना आणि साधनेने, साधकाला नियमित होत रहाते.

मानवाच्या अंतर्मनातही कायमच दुष्ट – सुष्ट, सुर – असूर, होकारार्थी – नकारार्थी असा परस्पर विरोधी विचारांचा खेळ सुरू असतो. आपल्या अतिशय आवडत्या भावना आणि सहज प्रवृत्ती आणि अंतःप्रेरणा, अनेकदा पूर्ण होऊ शकत नाहीत किंवा कुठल्यातरी प्रभावाने टाळल्या – नाकारल्या जातात आणि त्याचा आनंद मिळू शकत नाही. मग आपण त्या भावना – प्रेरणा – प्रवृत्तींनां वेगळे रूप आणि रंग देऊन कसेही करून तो आनंद मिळवायचा प्रयत्न करतो. **आधुनिक मनोविकारांच्या विश्लेषणांमध्ये या निष्कर्षाला वैज्ञानिक आधार मिळाला आहे.** आधुनिक काळातील उदाहरण द्यायचे म्हटले तर.. .. एखाद्या किशोर वयीन मुलाला सायकल हवी आहे, मात्र कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्याला सायकल मिळू शकणार नसेल तर तो मुलगा सायकल तासाभरासाठी भाड्याने घेईल – दुसरा मुलगा मित्राकडून घेईल – तिसरा मुलगा सायकल चोरून आणेल. चवथा मुलगा अन्य काही मार्ग शोधेल. **पिंडे पिंडे मतिरभिन्न:** या न्यायाने प्रत्येक मुलगा आपल्या गरजेला वेगळे रूप आणि रंग देईल.

देवीशी युद्धाचे वेळी महिषासुर, मधेच रेडयाचे रूप घेतो, पुन्हा मानवी रूप घेतो किंवा रक्तबीज असूर, सांडणाऱ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून नवे रूप घेतो, ही या कथांमधली रुपके, त्या त्या असूर आणि दैत्यांच्या मधील तीच **शक्ति** आहे जी प्रत्येक सजीवाला ऊर्जा आणि चैतन्य देत असते. आपल्या भावना – प्रेरणा – प्रवृत्ती नेहेमीच अक्षय असतात आणि रक्तबीज असुरासारख्या प्रत्येक नकारागणिक वेगळे रूप आणि रंग धारण करत असतात.

तंत्र साहित्य आणि तांत्रिक साधनेमधे, **मातृदेवता आणि शक्ति** यांचे, मानवाच्या अंतःकरण चतुष्टी बरोबर, त्याच्या अपरा आणि परा प्रकृतीबरोबर जोडलेले हे संदर्भ तर्कसंगत आणि विज्ञाननिष्ठ आहेत. या पुराणिक कथांमधील प्राचीन शैलीतील कल्पनाविलास – रंजकता – भौतिक संदर्भ आणि चिह्न – चिह्नसंकेत यांचा अभ्यास, आपल्याला आपल्या प्राचीन प्रज्ञतेची – विज्ञाननिष्ठेची – तत्वज्ञान समृद्धीची ओळख करून देतो.

--००--

# महान शाक्त साधक

**मातृदेवता** आणि **शक्ति** या दोन्ही प्राचीन भारतीय संकल्पना आणि त्याच्या रुपकांचा आपण धावता आढावा घेतला. मूलतः हा विषय खूप विशाल आहे. मिथके – आख्यायिका – दंतकथा – प्रतीके – रुपके – रुपकमूल्य – चिह्न – चिह्नसंकेत या सर्व अलंकारांनी समृद्ध आहे. काही सहस्त्र वर्षांपासून निर्माण झालेल्या लिखित साहित्यात – शिल्प – मुर्ती – चित्र प्रतिमा अशा अभिजात माध्यमात तो ग्रंथीत आणि चित्रित झाला आहे म्हणून या काही हजार शब्दांच्या लेखमालेला धावता आढावा म्हणावे.

मूळ संस्कृत भाषेत आणि आता अस्तंगत झालेल्या ब्राह्मी – पाली – अर्धमागधी – शारदा – खरोष्टी – कलिंग – कदंब अशा भाषा आणि लिपि मधील असे साहित्य आणि संहिता, अभ्यासकांना संदर्भासाठी आजही उपलब्ध आहेत. या भाषा आणि लिपि माझ्या अभ्यासाचा विषय नाही, मात्र भारतातील अनेक राष्ट्रीय आणि खाजगी मालकीच्या वस्तुसंग्रहालयात आणि ग्रंथालयात अशा प्राचीन संहिता काळजीपूर्वक जपल्या आहेत याची जाणीव मला या अभ्यासा दरम्यान झाली. ग्वाल्हेर येतील सिंदिया कुटुंबाच्या संग्रहालयात शारदा लिपीतील अनेक संहिता जपून ठेवल्या आहेत.

**थोडेसे विषयांतर झाले तरी, अभ्यासासाठी माहिती संकलित करतांना केलेल्या प्रयत्नातिल मला आलेला दुसरा एक सुखद अनुभव वाचकांना आवर्जून सांगावासा वाटतो.** वर्ष २०१२ मधे, **फ्रीमेसनरी (Freemasonry) या प्राचीन जागतिक संघटनेच्या भारतातील इतिहासाचा अभ्यास मी करत होतो.** तीनशे वर्ष

जुन्या इंग्लिश फ्रीमेसनरीच्या लंडनमधील **Masonic Museum** मधे उपलब्ध असलेल्या, लोणावळ्यातील सव्वाशे वर्ष जुन्या **Freemason's Hall** या इमारतीचा, काही कागदपत्रांतिल नोंदीचा संदर्भ मला अभ्यासासाठी हवा होता. ते कागद निश्चित उपलब्ध आहेत याची मला खात्री होती. भारतातील फ्रीमेसनरी संघटनेचा सदस्य असा माझा परिचय देऊन मी म्युझियमच्या क्युरेटरना ईमेलद्वारे ते कागदपत्र इमेज स्वरूपात अभ्यासासाठी हवे असल्याची विनंती केली. निव्वळ एका ईमेलच्या विनंतीवरून, दोन आठवड्यात, त्या दहा कागदांच्या संचाच्या झेरॉक्स प्रती, मला घरपोच पाठवण्यात आल्या. शेकडो मैल दूर रहाणाऱ्या एका अपरिचित अभ्यासकाच्या प्रयत्नांची घेतलेली दाखल आणि यातिल सौजन्यशील तत्परता, हा अनुभव अचंबित करणारा होता. माझे इंग्लिश भाषेतील ते इंटरनॅशनल कॉफी टेबल बूक, ८ फेब्रुवारी, २०१३ या दिवशी भोपाळ येथे प्रकाशित झाले. वर्ष २००८ पासून, मी काही विषयांचा अभ्यास करतो आहे. यासाठी **Authentic** आणि **Validated** नोंदी आणि संदर्भांची आवश्यकता असते. अलीकडच्या काळातील प्रगत संपर्क साधनांचा योग्य उपयोग करून, देशातील आणि परदेशांतील संग्रहालये आणि ग्रंथालयातील असे संदर्भ अभ्यासकाला निश्चित उपलब्ध होतात. अशा काही संदर्भांचा वापर या लेखमालेत केला आहे.

प्राचीन भारतीय समाजात हिंदू धर्म प्रणालीचे, **स्मार्त – वैष्णव – शैव – शाक्त** हे चार प्राथमिक आणि महत्वाचे साधक संप्रदाय मानले गेले आहेत. यातही अनेक पंथ आणि उपपंथ आहेतच. आधुनिक काळातही हे संप्रदाय आणि त्यातील साधकांचे उपासना – आराधना – साधना यांचे व्यक्त व्यवहार आणि त्याचे वैविध्य आपल्या सर्वांना परिचित आहे. या संप्रदाय आणि पंथातील भिन्नता, **त्यांची आराध्य दैवते आणि उपासना – साधना पद्धती** या दोन ठिकाणी स्पष्ट दिसते.

**स्मार्त** हे नाम, संस्कृत **स्मृति** या शब्दाचे रूप आहे. **स्मार्त** संप्रदायातील अनुयायी, **स्मृति** अशा संबोधनाने परिचित प्राचीन साहित्याला प्रमाण मानतात आणि त्यानुसार त्यांची उपासना – साधना केली जाते. प्राचीन हिंदू धर्म प्रणालीतिल **सर्व देवी-देवता** यांची उपासना – आराधना – पूजा – साधना हे या संप्रदायातिल साधकांचे वैशिष्ट्य आहे. **महादेव – महालक्ष्मी – सरस्वती – महाकाली – श्रीराम – श्रीकृष्ण – विठ्ठल – श्रीगणेश** यासर्व देवी – देवतांच्या मुर्ती आणि प्रतिमा यांची त्यांच्या देवघरांत स्थापना केलेली असते. **बद्रिनाथ विष्णु – श्रीराम – श्रीकृष्ण – तिरूपति बालाजी – श्रीनाथ – द्वारकाधीश – विठ्ठल** हे श्री विष्णूचे विग्रह **वैष्णव संप्रदाय** साधकांसाठी आराध्य दैवते आहेत. **शैव संप्रदायातील** साधक फक्त महादेवाच्या **लिंग या प्रतिकाची** उपासना – आराधना – पूजा – साधना करतात. **देवी महाकाली** हे देवी पार्वतीचे उग्र मुद्रेतिल विग्रह रूप हे **शाक्त संप्रदायाच्या** साधकांचे आराध्य दैवत आहे.

आता आपल्या लक्षांत येईल की प्रामुख्याने, पूर्व भारतातील **शाक्त संप्रदायाच्या** साधकांचे आराध्य दैवत, शक्ति स्वरूपातील स्त्रीदेवता देवी महाकाली आहे. **श्री रामप्रसाद सेन – श्री रामकृष्ण परमहंस** आणि **योगी श्री अरविंद घोष** या बंगाल मधील तीन **शक्तितत्व मातृदेवता कालीमातेच्या** प्रमुख साधकांचा, त्यांच्या तत्वज्ञानाचा आणि कार्याचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील **वैष्णव संप्रदाय परंपरेतील** आणि **नाथ संप्रदायातिल** सर्वच संत कवींनी, **जगतजननी – महामाया – आदिशक्ती – देवी शारदा** अशा संबोधनांनी या स्त्रीशक्तिला, त्यांच्या रचनांच्या प्रथमपदावर नमन – वंदन करून, **मातृदेवता** म्हणून तिचे ऋण मान्य केले आहे. मात्र बंगाल मधील **शाक्त संप्रदायातील** या साधकांनी

पूर्णतः फक्त या स्त्रीशक्तीची उपासना – आराधना – साधना केली आहे हे त्यांच्या काव्यातून आणि कार्यातून प्रतीत होते.



< रामप्रसाद सेन यांची आराध्य देवता कालीमाता

बाराव्या आणि तेराव्या शतकात बंगालमधे **शाक्त संप्रदायाचा** प्रचार – प्रसार आणि विस्तार झाला. पंधराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत **मुकुंदराम – कमलाकांत भट्टाचार्य – रसिकचन्द्र राय – रामचंद्र दत्त** या नामवंत कवींनी **श्यामासंगीत** शैलीमधे कालीमातेची स्तुतिकवने लिहिली. **श्यामा** हा शब्द कालीमातेच्या कांतीच्या **श्यामल** वर्णाशी नाते सांगतो म्हणून या गीतांना **श्यामासंगीत** असे संबोधित केले गेले. यांत **अध्यात्मिक संदेश देणारी** गीते आणि **दुर्गास्तुति** गीते असे दोन प्रकार आहेत. **दुर्गास्तुतिच्या गीतांना पदावली – उमासंगीत – आगमनी गीत – विजय गीत** अशी स्थानिक नावे प्रचलित आहेत.

अठराव्या शतकातील कालीमातेचे साधक **श्री रामप्रदास सेन** (१७२३ - १७७५) यांची श्यामासंगीत शैलीतील गीते सर्वाधिक लोकप्रिय आहे आणि आजही बंगालमधे नियमित गायली जातात. **शाक्त संप्रदायातिल** भक्ति मार्गाचे प्रवर्तक असा

लौकिक **रामप्रसादांना** प्राप्त झाला. एकतारी वाद्याच उपयोग आणि शास्त्रीय रागांवर आधारित मधुर संगीत रचना याची मानवतावादी कीर्तन शैली हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांचा दिवसाचा पूर्ण वेळ दक्षिणेश्वर मंदिरातील पंचवटीमधे कालीमातेची साधना – ध्यान – प्रार्थना यातच व्यतीत होत असे. कालीमातेच्या तांत्रिक साधनेतील ते एक नामवंत तांत्रिक होते. त्यांचे **विद्यासुंदर** हे कालिमातेच्या ज्ञान विशेषावरचे पुस्तक त्यांनी बंगालचे तत्कालीन जमीनदार महाराज कृष्ण चंद्र यांना अर्पण केले होते. महाराजांनी त्यांना **कविरंजन** असा किताब दिला होता. एकोणिसाव्या शतकातील कालीचे महान साधक **श्री रामकृष्ण परमहंस**, रामप्रसादांची श्यामसंगीत शैलीतील काली स्तुतिगीते नेहेमी गात असत.



^ काली साधक श्री रामप्रसाद सेन



^ काली साधक श्री रामकृष्ण परमहंस

बंगालमधील कालीमातेचे महान **शाक्त संप्रदाय साधक श्री रामकृष्ण परमहंस** (१८३६- १८८६) मानवता मूल्यांचे पुरस्कर्ते होते. मोठ्या भावाच्या अकाली मृत्यूनंतर ते कोलकाता शहरातील कालीमातेच्या दक्षिणेश्वर मंदिराचे पुजारी म्हणून

नियुक्त झाले. देवीची पूजा आणि मुर्तीचे अलंकरण करताना ते मूर्तीच्या तेजाने प्रभावित झाले. देवी कृपेने ते सतत अध्यात्मिक चिंतनात असत. त्या पारतंत्र्याच्या काळांत त्यांनी बंगाल मधील बुद्धीजीवी समाजामध्ये, जातीयवादाला विरोध करून, राष्ट्रवादी विचारांचा प्रचार – प्रसार – पुरस्कार केला होता. आत्मज्ञान मिळवायचे असेल तर अहंभावाचा त्याग करा कारण अहंभावाच्या पडद्यातून ज्ञानाचा प्रवेश होत नाही. तपस्या – सत्संग – स्वाध्याय यामुळे अहंकार दूर होतो. लोभ – स्वार्थ – लालच – क्रौर्य या अविद्या नकारात्मक शक्ति आहेत. दया – प्रेम – भक्ति – पवित्र विचार या विद्या सकारात्मक आहेत. याच्या स्वीकाराने ईश्वरप्राप्तीचा मार्ग सापडतो. असे मार्गदर्शन श्री रामकृष्णांनी समाजातिल साधकांना केले होते. अध्यात्मिक विचारातील आदर्श – धार्मिक बंधुभाव – प्राचीन हिंदू शाक्त तत्वज्ञानाचा नव्या पिढीला करून दिलेला परिचय – समाजातील नैतिक वर्तनाचा पुरस्कार – प्रेम, वात्सल्य मानवता मूल्यांची वृद्धी .. .. हे **श्री रामकृष्ण परमहंस** यांचे जीवन कार्य आहे.




^ श्री रामकृष्ण परमहंस



^ श्री रामकृष्ण परमहंस बेलूर मठातील प्रतिमा

**मानवतेचे ध्येय – मानवी जन्माचे अंतिम सत्य – मनातील शुद्ध विचार – अध्यात्म सराव – धार्मिक बंधुभाव – आपल्यातिल परमेश्वराचे अस्तित्व आणि**

**त्याची अनुभूति – गरजूंना मदत – अहंकाराचे विसर्जन – शक्तितत्वाला पूर्ण शरण जाणे ..** .. या विषयांवर त्यांची प्रवचने संकलित झाली आहेत. बेलूर येथील रामकृष्ण आश्रमात आजही त्यांचे अनुयायी, त्यांच्या विचारांना समाजात प्रसारित करत असतात. **वर्ष १८८१ मधे नरेंद्र दत्त अर्थात नंतरच्या काळातील स्वामी विवेकानंद यांनी श्री परमहंसांना गुरुस्थानी मानून त्यांचे शिष्यत्व स्वीकारले होते.**





**^** योगी अरविंद

योगी अरविन्द (१८७२ – १९५०). आधुनिक भारतातील स्वातंत्र्यसेनानी – तत्वचिंतक – महान योगी – लेखक – कवि असा बहूआयामी परिचय असलेले योगी अरविंद हे त्यांच्या तरुण वयात जहाल क्रांतिकारक होते. भारतीय क्रांतिकारकांच्या इतिहासात पहिला बॉम्ब योगी अरविन्द यांनी बनवला होता. त्याच्या स्फोटानंतर **खुदिराम बोस** आणि **प्रफुलकुमार चाकी** या दोन तरुणांना फाशी देण्यात आले होते. त्यासाठी योगी अरविंद यांना एक वर्षाचा तुरुंगवास झाला होता. बिपिनचंद्र पाल

यांच्या वंदेमातरम या दैनिकात ते लिहू लागले. त्यांच्या जहाल राष्ट्रवादी लिखाणामुळे त्यांच्यावर पुन्हा खटला भरण्यात आला मात्र पुरव्या अभावी त्यांना मुक्त करण्यात आले.

**संस्कृत – हिन्दी – बंगाली – गुजराती – मराठी – इंग्लिश – लॅटिन – ग्रीक – फ्रेंच – जर्मन – स्पॅनिश – इटालियन** या भाषांवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. भारतीय तत्वज्ञान – धर्म संकल्पना – योग साधना या विषयातील त्यांची पन्नासच्या वर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यातील अनेक पुस्तके, त्यांनी वेळोवेळी लिहिलेल्या निबंध आणि लेखांचे संकलन आहे. यावर विस्ताराने खूप लिहिता येईल. **मात्र आपल्या लेखमालेच्या संदर्भात, भारतीय स्त्री देवता आणि मातृदेवता या सकल्पनांवर त्यांनी विपुल लिखाण केले.**

देशाच्या पारतंत्र्याच्या काळांत, योगी अरविन्द यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला, आपली **जन्मभूमी भारत** ही आपली माता आहे अशी **भारतमाता** ही संकल्पना आधुनिक स्वरूपात प्रथम मांडली. **राष्ट्रीय स्वयंसेवक संघ** आणि **राष्ट्र सेविका समिति** या दोन्ही देशव्यापी आधुनिक संघटना, संस्कृत – हिन्दी – इंग्लिश या तीन भाषांमध्ये **एकात्मता स्तोत्र ही** आधुनिक रचना आपल्या सभा – संमेलनात नियमित सादर करत असतात. **मातृदेवता मातृभूमी भारतमाता** ही प्राचीन भारतीय संकल्पना, अशा **एकात्मता स्तोत्र** गायनातून वृद्धिंगत होत रहाते. एकात्मता स्तोत्र गायनाचे वेळी खालील प्रतिमा व्यासपीठावर प्रदर्शित केली जाते. ही प्रतिमा, भारतमाता या संकल्पनेचे निर्माते महर्षि योगी अरविंद यांच्या सल्यानुसार चित्रित केली गेली आहे हे या प्रतिमेचे वैशिष्ट्य आहे.



^ चित्र क्र ६ योगी अरविंद यांच्या संकल्पनेतील एकात्मता स्तोत्र भारतमाता प्रतिमा

मातृदेवता आणि स्त्रीशक्ति संदर्भातील.. **सावित्री / माता / वेद रहस्य / ईशोपनिषद / वंदेमातरम** अशी त्यांची निवडक हिन्दी पुस्तके प्रकाशित झाली. **Bande Mataram / Savitri – A legend and Symbol / The Secrets of Veda** ही त्यांच्या ३७ इंग्लिश पुस्तकातील काही निवडक पुस्तके. या पुस्तकातून त्यांनी **मातृदेवता** आणि **भारतीय स्त्री देवतांवर** विस्ताराने लिहिले. यातील **The Secrets of Veda** या पुस्तकांत त्यांनी रोमन आणि ग्रीक देवता आणि भारतीय देवता यातिल साम्यस्थळे दाखवली आणि भारतीय देव - देवता संकल्पनांचा, जागतिक पातळीवर असलेला प्रभाव स्पष्ट केला. आपल्या लेखमालेच्या विषयाच्या संदर्भातिल योगी अरविंद यांचे साहित्य आणि विचार जागतिक स्तरावर पोहोचले हे नक्की.

शाक्त संप्रदायातील या महान साधकांचा परिचय आणि त्यांचे कार्य फार विलक्षण आहे.

# अंतिम लेख

**मातृदेवता प्राचीन भारतीय संकल्पना आणि रूपके** या पुस्तकातील हा अंतिम लेख आहे. कित्येक सहस्त्र वर्षांपासून प्राचीन भारतीय संस्कृतीत, प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनात खोलवर रुजलेली मातृदेवता ही संकल्पना. या संकल्पनेचा परिचय करून देतांना त्याचा विस्तार किती व्यापक आहे त्यांची मांडणी प्रथम करणे आवश्यक होते. देवत्व दिलेल्या आणि विशेषतः मातृदेवता म्हणून स्वीकारलेल्या सर्वच देवता, स्त्रीदेवता आहेत याची निश्चित बांधणी समाजमनांत काही सहस्त्र वर्षांपासून झालेली आहे. लिखित संहितांतिल कथांमधील घटना – देवतांच्या मुर्ती आणि चित्र प्रतिमा – त्यात व्यक्त होणारी स्त्रीस्वरूप देवतांची व्यक्तिमत्व – असूर आणि दैत्यांशी झालेल्या त्यांच्या लढाया या बरोबरच लोकश्रुती – लोकश्रद्धा – लोकसाहित्य अशा सर्वांचा व्यापक संदर्भ या विषयाच्या विस्तारासाठी घेणे आवश्यक होते.

यातील सूर्याची जन्मदात्री अदिती – पृथ्वी – जन्मभूमी – महासरस्वती – महालक्ष्मी – महाकाली – देवी दुर्गा – रात्रीदेवी – सप्तमातृका – चौसष्ट योगिनी अशा मातृदेवता याबरोबरच शक्तितत्व तत्वज्ञान – हिंदू धर्मप्रणालीतील महत्वाचे संप्रदाय आणि त्यांची आराध्य दैवते – शिव आणि शक्ति संयोग - वैदिक आणि तंत्र संप्रदायाची वैशिष्ट्ये – शाक्त संप्रदायातील महत्वाचे मातृदेवता साधक..... असा मातृदेवता – शक्तितत्व – मातृभक्ति संदर्भातील अभ्यास, या लेखमालेत मांडला गेला.





^ मातृदेवता शिल्प राजस्थान ५ वे – ६ वे शतक ^ मातृदेवता शिल्प हराप्पा

मातृदेवता – शक्तितत्व – मातृभक्ति – कथा – देवतांची व्यष्टि – असूर आणि त्यांची व्यष्टि .. .. या सर्व विषयांचा.. .. प्रतीकशास्त्र – रुपकशास्त्र – रुपकमूल्य – चिह्न – चिह्नार्थ – चिह्नसंकेत.. ..या आणि अशा विश्लेषणशास्त्र आणि वर्गीकरणशास्त्र या तर्कसंगत – तर्काधिष्टित तंत्राचा वापर, अभ्यासाने या लेखमालेत लेखक म्हणून मला करता आला, यांचा मला आनंद वाटतो. मात्र या विश्लेषण आणि वर्गीकरणातील निष्कर्ष – अनुमान नेहेमीच **तात्विक – सैद्धांतिक (Speculative)** असणार आहे, हे वाचकांनी कृपया समजून घ्यावे. माझ्यापेक्षा वेगळ्या पार्श्वभूमीतून आणि वेगळ्या अभ्यासाने आलेला एखादा अभ्यासक याचे वेगळे निष्कर्ष आणि अनुमान मांडू शकतो.

या लेखमालेला वाचकांनी खूप प्रतिसाद दिला. प्रत्येक लेखावर चार-सहा ओळीत आवर्जून अभिप्राय दिले. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. या लेखमालेच्या सर्व संकलित लेखांचे डिजिटल ईपुस्तक, **ईसाहित्य प्रतिष्ठान** यांचेतर्फे, या **दीपावली**

**उत्सवातील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी, गुरुवार, ४ नोव्हेंबर, २०२१ या दिवशी प्रकाशित झाले आहे.** ई पुस्तक **(E Book),** सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.





मातृदेवता शिल्प ६ वे – ७ वे शतक, मूळ मध्यप्रदेश, **^** राष्ट्रीय संग्रहालय, कोरिया – सेऊल

**^** मातृदेवता शिल्प

**ज्ञानेश्वरीच्या वरिष्ठ अभ्यासक, माननीय डॉ मनीषा फडके, यानी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली आहे. माझे स्नेही वरिष्ठ ग्राफीक आर्टिस्ट श्री शैलेश तेंडोलकर या पुस्तकाचे मुखपृष्ठ सिद्ध केले आहे.**

दीपावलीच्या शतशत शुभेच्छा आणि सर्व वाचकांना पुनश्च धन्यवाद...!.. अजूनही खूप काही बाकी आहे याची नम्र जाणीव मनांत आहेच.

मातृदेवता या लेखमालेसाठि गेल्या काही वर्षांच्या अभ्यासात, खूप पुस्तकांचे संदर्भासाठी वाचन झाले. त्याची संदर्भ सूची खाली नोंदवली आहे. वर्ष २००८ पासून, स्वतःचा लॅपटॉप घेतल्यापासून, **Internet Archives** आणि अन्य स्त्रोतातून, आवडत्या विषयातील सॉफ्ट कॉपी पुस्तके संग्रहाचा छंद जोपासला आहे. गेल्या चौदा

वर्षांत, साधारण पासष्ट ज्ञानशाखांतील साडेपांच हजार सॉफ्ट कॉपी पुस्तके संग्रहित झाली आहेत.

**लिहू आनंदे – वाचू आनंदे...!**

अरुण फडके,
M: ७४००१७३६३७,
ईमेल: arunphadke7@gmail.com

--○○—

संदर्भ सूची:

# देवी कोश खंड १, २, ३, ४ – लेखक प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई, १९६७, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ प्रकाशन,
# The Mother Goddess, by S K Dixit, The International Book Service, Pune,
# श्री सूक्तम, हिन्दी अनुवाद श्री राघवाचार्य, १९६१, आचार्यग्रंथमाला प्रकाशन क्र ५४,
# योगिनीतंत्र, हिन्दी अनुवाद श्री कन्हैयालाल मिश्र, गंगाविष्णु श्रीकृष्णदास प्रकाशन,
# भारतीय ज्योतिष, नेमिचंद शास्त्री, १९५२, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दिल्ली,
# Yogini Temples of India, Dr Vidya Dahejia,
# Yogini Cult & Temples, Dr Vidya Dahejia,
# Evolution of Mother Worship in India, 2004, Prof S B Dasgupta, Advait Ashram, Delhi,
# Manifestation of Shiva, 1981, Stella Kramrisch, Philadelphia Museum of Art,
# शैव मत, डॉ यदूवंशी, २०१२, बिहार राष्ट्रभाषा परिषद,
# मराठी विश्वकोश,
# दुर्गा सप्तशती, हिन्दी आवृत्ती,
# INDIA AWAKNING, 1912, Sherwood Eddy,
# नाट्यशास्त्रकी भारतीय परंपरा और दशरूपक, हजारीप्रसाद द्वीवेदि, १९६३, राजकमल प्रकाशन पाटणा,
# शतपथब्राह्मण, हिन्दी विज्ञानभाष्य संहिता, संकलित – संपादित आवृत्ती,
# श्रीतंत्रदुर्गासप्तशती, डॉ रामचंद्र पुरी, हिन्दी अनुवाद, १९९८, चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान,
# मातृदेवता, डॉ अशोक राणा, २०११, प्राजक्त प्रकाशन,
# The Philosophies and Religions of India, Yogi Ramacharak,
# श्री दुर्गासप्तशती, सचित्र, हिन्दी अनुवाद, पंडित रामनारायण शास्त्री, गीता प्रेस, गोरखपुर,
# श्रीमन्ममहाभारताचे सुरस मराठी भाषांतर, १८६७, महादेव हरी मोडक, अप्पाशास्त्री राशीवडेकर,
# The Secret of Veda with Selected Hymns and Hymns of Atris, Yogi Arobindo, 1914,

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**
**श्री. अरुण फडके यांचे ई साहित्यवर हे चवथे पुस्तक.**

श्री. अरूण फडके हे एक अनेक पैलू असलेले लेखक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आहेत. चिन्हे व प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय. मराठी भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या म्हणी, पुरातन इमारतींचे संवर्धन, भव्य कार्यक्रमांचे सौंदर्यशास्त्रीय आयोजन असे त्यांचे अभ्यासाचे विषय आहेत आणि या प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती व अचुक आणि नेमके लिहीण्यासाठी कष्ट घेण्याची तयारी यामुळे त्यांना साहित्यिक वर्तुळांत मानाचे स्थान आहे. सध्याच्या whatsapp युनिव्हर्सिटीच्या काळात त्यांचे मौलिक लेखन ही एक मोठीच बौद्धिक मेजवानी असते.

श्री. अरूण फडके यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(९), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७)

उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१६), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), रामदास खरे(३),असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।